स्वस्त
पूनम मोती नगर, अमरावती.
इलेक्ट्रॉनिक्स & सोफा
सोफा, बेड, अलमारी, कुलर, टीव्ही
फक्त ₹1000* भरून उपलब्ध
फायदा हंव थोडं दुर या, जुंन दया नवीन घ्या !!
COMPANY DEALER
SAMSUNG Panasonic ---TRUSTED NAME---

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वाशीम,मंगळवार १७ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०

couch puffy
Architectural Choice Furniture!
Imported Bedroom Set
Original price 2,00,000/-
Special Price ₹ 1,39,900/-
काउच पफी B5, ड्रिम्ज़लैंड, रहाटगाँव रोड, अमरावती

युद्धभूमीतून बाहेर पडून 'शिवालिक' गुजरातमध्ये

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : युद्ध प्रभावित होर्मुझ सामुद्रधुनी पार करु न शिवालिक एलपीजी टँकर गुजरातच्या मुंद्रा बंदरात दाखल झाला आहे. इराणच्या सरकारने भारताच्या दोन एलपीजी टँकरला होर्मुझच्या सामुद्रधुनी पार करण्याची परवानगी दिली होती. त्यापैकी शिवालिक जहाज गुजरातमध्ये दाखल झाले असून, नंदादेवी जहाजाची भारताच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. होर्मुझच्या सामुद्रधानीतून भारताच्या दोन एलपीजी वहन करणा-या जहाजांनी परवानगी देण्यात आल्याची माहिती जहाजबांधणी मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी शनिवारी दिली होती. शिवालिक आणि नंदा देवी ही जहाजे अनुक्रमे १६ मार्च आणि १७ मार्च रोजी पोहोचतील, असे सिन्हा म्हणाले होते. दोन्ही जहाजांमध्ये ९२ हजार ७०० मेट्रिक टन एलपीजी असल्याचे सिन्हा यांनी सांगितले आहे.

पर्शियन गल्फ भागातील सर्व जहाजे सुरक्षित आहे. पर्शियन गल्फमध्ये एकूण २४ भारतीय जहाजे असून, होर्मुझ सामुद्रधुनीच्या पश्चिमेला आहेत. यापैकी शिवालिक आणि नंदादेवी या दोन जहाजांना सामुद्रधुनी पार करण्याची परवानगी देण्यात आली आहे. दोन्हीमध्ये एलपीजी वायू आहे. दोन्ही जहाजे अनुक्रमे १६ आणि १७ तारखेला भारतात दाखल होतील, असे सिन्हा म्हणाले. तेहरानसोबत संवाद- परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी याबाबत माहिती देतान तेहरानबरोबर थेट संवाद साधल्याची माहिती दिली. मध्य पूर्वेत संघर्ष उफाळला ➪(पान २ वर)

यवतमाळमध्ये ४८ तासांत ५ खून

कुठे महिलेचा मृतदेह जाळला, तर कुठे सख्ख्या भावानेच भावाला संपवले!

यवतमाळ /प्रतिनिधी : शांत मानला जाणारा यवतमाळ जिल्हा गेल्या ४८ तासांत झालेल्या सलग पाच खुनाच्या घटनांनी अक्षरशः हादरून गेला आहे. गुन्हेगारांनी कायद्याचा धाक झुगारून लावल्याचे चित्र असून, अवघ्या दोन दिवसांत पाच निष्पापांचा बळी गेल्याने सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. यामध्ये लाडखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन, तर अवधूतवाडी, कळंब आणि ऊमरखेड परिसरात प्रत्येकी एक अशा खळबळजनक घटनांची नोंद झाली आहे. रविवारी एकाच दिवशी ऊग्रडकीस आलेल्या दोन घटनांनी जिल्ह्याच्या कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पहिली हृदयद्रावक घटना लाडखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लासीना रेल्वे क्रासिंगजवळ घडली. गोविंद नगर येथील रहिवासी आतीष सुभाष देशमुख (३५) याचा छिन्नविछिन्न अवस्थेतील मृतदेह रविवारी आढळून आला. आतीष शनिवारी रात्री जेवणाच्या ताटावरून कामानिमित्त घराबाहेर पडला, मात्र तो परतलाच नाही. चिंतेत असलेल्या कुटुंबीयांनी रात्रभर शोध घेउन अखेर पोलिसांत धाव घेतली. तपासादरम्यान समोर आलेला घटनाक्रम अंगावर शहारे आणणारा आहे. मारेक-यांनी अत्यंत नियोजनबद्धरीत्या आतीष याला गाठले. त्याच्या डोळ्यात मिरची पूड टाकून डोक्यावर जड वस्तूने प्रहार केला आणि धारदार शस्त्राने पोट, मान व गळ्यावर वार करून त्याची करूर हत्या करण्यात आली. विशेष म्हणजे, आतीषच्या अंगावरील सोन्याची साखळी, मोबाईल आणि त्याची दुचाकी सुरक्षित असल्याने हा खून लुटमारीच्या उद्देशाने नसून वैयक्तिक वादातून किंवा जुन्या वैमनस्यातून झाला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. लाडखेड पोलीस ठाण्याचे ठाणेदार विनायक लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस या खुनाचे गूढ उकलण्याचा प्रयत्न करत आहेत.

दुसरी घटना कळंब तालुक्यातील तासलोट शेतशिवारात ऊग्रडकीस आली. येथे एका अंदाजे ३० वर्षीय महिलेची हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने तिचा मृतदेह जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. शेतातून

येणा-या दुर्गंधीमुळे हा प्रकार ऊग्रड झाला. महिलेची ओळख पटू नये म्हणून मारेक-यांनी तिचा चेहरा जाळला होता. घटनास्थळाची पाहणी केली असता, मृतदेहाजवळ जळालेले कपडे आणि चप्पल आढळली.पोलिसांच्या प्राथमिक अंदाजानुसार, हा अत्याचार करून केलेला खून असू शकतो आणि ही घटना ५ ते ७ दिवसांपूर्वी घडलेली असावी. जिल्ह्यात सध्या कोणतीही महिला बेपत्ता असल्याची नोंद नसल्याने या मृतदेहाची ओळख पटवणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान बनले आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि फॉरेन्सिक टीमने घटनास्थळावरून काही नमुने गोळा केले असून, सोशल मीडियाच्या माध्यमातून मृताची ओळख पटवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, यवतमाळच्या बांगर नगरातील एका युवकाचा मृतदेह पिंपळगाव जंगलात आढळला, तर विडूळ येथे घरगुती वादातून भावानेच भावाची हत्या केली. ऊमरसरा येथेही तीन भावांनी मिळून एकाची हत्या केल्याची घटना घडली. तसेच पिंपळगाव येथील शासकीय गोदाम परिसरात एका व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह सापडला आहे. एकामागून एक घडलेल्या या पाच घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

ट्रॅव्हल्स बसचा भीषण अपघात; 25 प्रवासी गंभीर जखमी

बीड /प्रतिनिधी-जळगाववरून लातूरकडे जाणा-या प्रवाशांनी भरलेल्या ट्रॅव्हल्सचा भीषण अपघात झाला आहे. अपघातानंतर या बसने पेट घेतला आणि सगळीकडे आगीने रौद्ररूप धारण केले. या आगीत प्रवाशांच्या सामानाचे नुकसान झाले असून २५ प्रवासी गंभीर

जखमी झाले आहेत. जखमींवर जवळच्या रुग्णालयात ऊपचार सुरु आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, एक खाजगी ट्रॅव्हल्स जळगाववरून लातूरकडे जात होती. ही ट्रॅव्हल्स केज मांजरसुंबा रोडवर पहाटे २.४५ वाजता केजपासून जवळ सांगवी ते पिंपळगाव फाट्यावर पलटी झाली. त्यानंतर बसने अचानक पेट घेतला. काही वेळातच आगीचे लोळ सर्वत्र पसरले.चालकाच्या अतिवेगामुळे हा अपघात घडल्याचं म्हटलं जात आहे. या दुर्घटनेत २५ प्रवासी गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच अपघातस्थळी सहाय्यक पोलिस ➪(पान २ वर)

सरकारकडून पुन्हा कोरोनासारखी परिस्थिती

नाना पटोलेंची सर्वपक्षीय बैठकीची मागणी

मुंबई/प्रतिनिधी : मध्य-पूर्वेतील युद्धजन्य स्थितीमुळे जगभरात तणावाचे वातावरण आहे. अमेरिका-इस्त्रायलने इराणविरोधात युद्ध पुकारले आहे. यामुळे इराणच्या सामुद्रधुनी मार्गे येणारे इंधन आणि गॅसचा पुरवठा ठप्प झाला आहे. याचे पडसाद आता भारतात ऊमटत आहे. सामान्य नागरिकाच्या घरातील एलपीजी गॅस संपला आहे. व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत. राज्यात आणि देशात एलपीजी गॅसची काय परिस्थिती आहे, हे सरकारने सर्वपक्षीय बैठक घेउन स्पष्ट करण्याची मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी विधिमंडळ परिसरात माध्यमांसोबत बोलताना केली.

सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे राज्यातील एलपीजी टंचाईवर सर्व पक्षीय नेत्यांच्या बैठकीची मागणी केली असल्याचे सांगितले. ते म्हणाले, राज्यात आणि देशात गॅस टंचाई आहे. सरकारकडे इंधन आणि गॅस बाबतचे काय धोरण आहे, याची माहिती विरोधी पक्षाला मिळत नाही. सामान्य जनता तर यापासून दूरच आहे. राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांनी अशा कठीण परिस्थितीत सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावली पाहिजे. सर्वपक्षीय बैठक बोलावून या संकटावर कशी मात करता येईल हे मांडलं पाहिजे. मात्र या सरकारच्या काळात कोरोना आपत्तीमध्ये जी परिस्थिती होती आताही तसेच ते वागत आहे, असा आरोप नाना पटोले यांनी केला.

काँग्रेस नेते पटोले म्हणाले की, देशात एलपीजीची अडचण आहे, टंचाईची परिस्थिती आहे, हे सरकार का मान्य करत नाही. राज्यात गॅसचा तुटवडा आहे तसाच राज्य सरकारकडून माहितीचा देखील तुटवडा आहे. गॅसची कमतरता असल्याचे सरकार का कबूल करत नाही? असा सवाल त्यांनी केला. लोक गॅस एजन्सीबाहेर रांगेत ऊभे आहेत. व्यावसायिक गॅसचा पुरवठा बंद आहे. अनेक व्यापार ठप्प झाले आहेत. हॉटेल्समध्ये ➪(पान २ वर)

बिहारमध्ये एनडीएच्या पंचने महाआघाडी घायाळ,

चार आमदारांनी बिघडवले विरोधकांचे गणित

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : आज झालेल्या राज्यसभा निवडणुकीत बिहारमध्ये विरोधी पक्षांच्या महाआघाडीला जबरदस्त धक्का बसला आहे. येथील राज्यसभेच्या पाच पैकी पाचही जागांवर केंद्र आणि राज्यातील सत्ताधारी असलेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)ने बाजी मारली आहे. या निवडणुकीसाठी आज सकाळपासून सुरू असलेल्या मतदानाला महाआघाडीमधील घटकपक्षांच्या चार आमदारांनी दांडी मारल्याने विरोधी पक्षांच्या ऊमेदवाराचं गणित बिघडलं आणि एनडीएच्या पाचव्या ऊमेदवाराच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला.बिहारमध्ये राज्यसभेच्या पाच जागांसाठी निवडणूक झाली. यात विधानसभेतील संख्याबळानुसार एनडीएचे चार तर महाआघाडीचा एक ऊमेदवार विजयी होण्याची शक्यता होती. मात्र एनडीएने येथे पाचवा ऊमेदवार देउन निवडणुकीत रंगत आणली.

तसेच आज झालेल्या मतदानाला महाआघाडीमधील घटक पक्षांचे चार आमदार अनुपस्थित राहिल्याने महाआघाडीचं गणित बिघडलं. तसेच एनडीएचे नितीश कुमार, नितीन नवीन, रामनाथ ठाकूर, ऊंद्रे कुशवाहा या चार ऊमेदवारांसह शिवेश ➪(पान २ वर)

पेट्रोल पंपावर मिळणार केरोसिन

मुंबइ/ प्रतिनिधी- राज्यात घरगुती गॅस अर्थात एलपीजी तुटवड्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर ऊपाय

काढण्यासाठी आता राज्य सरकारकडून बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर केरोसिन आणण्याची योजना आखण्यात आली आहे. जेणेकरुन सामान्य नागरिकांना वेळेवर गॅस सिलेंडर न मिळाल्यास केरोसिनचा वापर करता येईल. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी यासंदर्भात विधिमंडळाच्या अधिवेशनात निवेदन मांडले. छगन भुजबळ यांनी राज्यातील गॅस टंचाईबाबत भाष्य करताना म्हटले की, मी बीपीसीएल, एचपीसीएल आणि

भुजबळांची घोषणा; गॅस तुटवड्यावर राज्य सरकारचा तोडगा

आयओसीएल या पेट्रोलियम कंपन्यांच्या प्रतिनिधींशी सकाळी चर्चा केली. त्यांनी राज्यातील घरगुती गॅसचे दैनंदिन ऊत्पादन ९ हजार वरुन ११ हजार मेट्रिक टनपर्यंत वाढवल्याचे सांगितले. ➪(पान २ वर)

मोदी सरकारने माजी सरन्यायाधीशांना बनविले खासदार

पाच वर्षात राज्यसभेत एकही प्रश्न विचारला नाही

नागपूर/प्रतिनिधी : भारताचे माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांचा राज्यसभेतील नामनिर्देशित सदस्य म्हणून असलेला कार्यकाळ सोमवारी संपला. १६ मार्च २०२० रोजी केंद्र सरकारने गोगोई यांची राज्यसभेवर नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती केली होती. सरन्यायाधीश पदावरून निवृत्त झाल्यानंतर अवघ्या चार महिन्यांतच ही नियुक्ती झाल्याने त्यावेळी मोठी चर्चा आणि टीका झाली होती. काही जणांनी या नियुक्तीकडे कार्यकारिणीला अनुकूल निर्णय दिल्याबद्दलचा परस्पर सौदा म्हणूनही पाहिले होते. त्यावेळी बार कौन्सिल ऑफ इंडिया चे अध्यक्षांनी मात्र या नियुक्तीचे स्वागत केले होते. गोगोई हे न्यायव्यवस्था आणि कार्यकारिणी यांच्यातील दुवा ठरतील, असे त्यांनी म्हटले होते. मात्र, राज्यसभेतील त्यांच्या सहा वर्षांच्या कार्यकाळाचा आढावा घेतल्यास त्यांची संसदीय सक्रियता मर्यादित राहिल्याचे दिसते. संशोधन संस्था पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च यांनी संकलित केलेल्या माहितीनुसार त्यांची ऊपस्थिती सुमारे ५३ टक्के होत. राज्यसभेच्या संकेतस्थळावरील आकडेवारीनुसार सहा

वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी केवळ एका चर्चेत भाग घेतला. ऑगस्ट २०२३ मध्ये झालेल्या दिल्ली सेवा विधेयकावरील चर्चेत त्यांनी सहभाग घेतला होता. दिल्लीतील निवडून आलेल्या सरकारच्या प्रशासकीय अधिकारांवर मर्यादा आणण्याच्या उद्देशाने हे विधेयक मांडण्यात आले होते.

खासगी सदस्य विधेयकही मांडले नाही-या चर्चेत बोलताना गोगोई यांनी मूलभूत रचना सिद्धांत यावरही टीकात्मक भाष्य केले होते. या सिद्धांताचा न्यायशास्त्रीय पाया वादग्रस्त असल्याचे त्यांनी म्हटले होते. विशेष म्हणजे, सरन्यायाधीश असताना त्यांनी दिलेल्या राजर मॅथ्यु वि. साउथ इंडियन बँकया प्रकरणातील निर्णयात त्यांनी मूलभूत रचना सिद्धांताला मान्यता दिली होती आणि न्यायपालिकेच्या स्वातंत्र्याला धक्का देणा-या ट्रिब्युनल नियम २०१७ ला रद्द ठरवले होते. त्यांच्या कार्यकाळात संसदेत शेती कायदे, नवे फौजदारी कायदे, ट्रिब्युनल सुधारणा कायदा, वक्फ दुरुस्ती विधेयक तसेच महिलांना राजकीय आरक्षण देणारे घटनादुरुस्ती विधेयक अशा अनेक महत्त्वाच्या कायद्यांवर चर्चा झाली. मात्र या चर्चांमध्ये गोगोई यांनी सहभाग घेतलेला दिसत नाही. याशिवाय, सहा वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी एकही प्रश्न ऊपस्थित केला नाही किंवा खासगी सदस्य विधेयकही मांडले नाही.

433 सरपंच प्रशासकांना दणका; आर्थिक व्यवहार करण्यास मनाई

मुंबई / प्रतिनिधी- राज्य सरकारकडून मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर सरपंचांना प्रशासक म्हणून नेमण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. याच सरपंच प्रशासकांना कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आर्थिक व्यवहार करण्याचे अधिकार दिले होते. मात्र आता मुंबई हायकोर्टाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने जिल्ह्यातील ४३३ ग्रामपंचायतीवरील सरपंच प्रशासकांना दणका दिला आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकार दिले असताना सर्किट बेंकेकडून आर्थिक व्यवहार करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ४३३ ग्रामपंचायतचे बजेट कोलमडणार आहे.जिल्ह्यातील ४३३ ग्रामपंचायतीची मुदत फेब्रुवारी अखेर संपली आहे. राज्य सरकारकडून ५ जानेवारी रोजी मुदत संपलेल्या राज्यातील ग्रामपंचायतीवर विद्यमान सरपंचांनाच प्रशासक ➪(पान २ वर)

जितेंद्र आव्हाडांचे छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वादग्रस्त वक्तव्य; विधानसभेत एकच गोंधळ

मुंबई/प्रतिनिधी :शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह विधान केलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा ऊल्लेख करत जितेंद्र आव्हाडांनी केलेल्या विधानानंतर सत्ताधारी आमदार आक्रमक झाले होते. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आदेश दिल्यानंतर जितेंद्र आव्हाड यांनी दिलगिरी व्यक्त केली. मात्र सत्ताधारी आमदारांनी त्यांच्या निलंबनाची मागणी केली आहे.

धर्म स्वातंत्र्य विधेयकावरील चर्चेदरम्यान जितेंद्र आव्हाड यांनी आपला विरोध दर्शवला. यादरम्यान इतिहासाचे दाखले देण्यात आले. यादरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांचा ऊल्लेख करताना त्यांनी राज्याभिषेकाचा दाखला दिला. यावेळी शंभूराज देसाई यांनी ऊभे राहत आव्हाडांच्या विधानाचा निषेध करत कोणत्याही पुस्तकाचा ऊल्लेख करु नये असं सांगितलं. तसंच आपण हा दावा पहिल्यांदाच ऐकत असल्याचं म्हटलं. हे वक्तव्य रेकर्डवरुन काढून टाकण्याची मागणी करत सत्ताधारी आमदारांनी गोंधळ घातला. तसंच त्यांनी माफी मागावी अशी मागणी केली. यावेळी तालिका अध्यक्ष संजय केळकर यांनी विधेयकावर चर्चा

करा, इतिहासावर नको असं सांगितलं. मात्र सत्ताधारी आमदार आक्रमक होत गोंधळ घालू लागले आणि माफी मागण्यावर ठाम राहिले.

यावेळी दादा भुसे यांनी म्हटलं की, 'भारताचं, महाराष्ट्राचं आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे. महाराष्ट्रात हे अजिबात चालणार नाही. त्यांना कोणाला लांगुलचालन करायचं असेल तर लखलाभ आहे. प्रत्येक समाजात अनेक चांगल्या, वाईट प्रवृत्ती होत्या. काही समाजात १० बायका करतात, त्यांच्यावर यांचं तोंड ऊघडत नाही. महाराजांचा अपमान क?ण्याचा परवाना कोणी दिला? त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राची माफी मागितली पाहिजे'. यानंतर सभागृह १० मिनिटांसाठी स्थगित करण्यात आलं होतं.

दिलगिरी व्यक्त केल्यानंतरही गदारोळ

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाज सुरु झाल्यानंतर सांगितलं की, 'सभागृहात महत्त्वाच्या विधेयकावर चर्चा सुरु आहे. गांभीर्य राखून त्यात भाग घ्यावा. चर्चा करताना आपले आराध्यदैवत यांच्यासंदर्भात कोणीही अशा शब्दांचा प्रयोग केला, ज्यातून राज्याचं, देशाचं वातावरण बिघडेल असं करु नये अशी सर्वांची प्रामाणिक इच्छा आहे. कोणाच्याही भावना दुखावतील असं भाष्य करु नये. त्यामुळे या देशाच्या आराध्यदैवताविषयी आपल्या तोंडातून काहीही शब्द निघाले असतील, ज्यातून भावना दुखावल्या असतील त्याबद्दल माफी मागायला हरकत नाही'. यानंतर जितेंद्र आव्हाड यांनी जर माझ्या बोलण्याने भावना दुखावल्या असतील तर शब्द मागे घेतो सांगत दिलगिरी व्यक्त केली.

निलंबित करण्याची मागणी

जितेंद्र आव्हाड यांनी केलेलं वक्तव्य अध्यक्षांनी रेकार्ड वरून काढून टाकत असल्याचंही जाहीर केलं. मात्र यानंतर सत्ताधारी आमदार आक्रमक होते आणि त्यांनी जितेंद्र आव्हाड यांच्या निलंबनाची मागणी केली. जितेंद्र आव्हाड यांना निलंबित करण्यात यावे अशी मागणी दादा भुसे यांनी केली. त्यांनी निंदनीय शब्दाचा वापर केला आहे. महाराजांपेक्षा कोणी मोठं होउ शकत नाही. सूचना केल्यानंतर संपूर्ण देश आणि राज्याची माफी मागण्याची संधी होती. तरीही त्यांनी संधी नाकारली आणि निर्देश द्यावे लागले. हे महाराष्ट्र सहन काणार नाही. त्यांना सभागृहातून निलंबित केलं जावं असं दादा भुसे म्हणाले.

तसंच नितेश राणे यांनी औरंगजेब आणि टिपू सुलतानला खुश करण्यासाठी आव्हाड यांनी हे विधान केले आहे का? असा सवाल विचारला. तुम्ही माफी मागायला सांगितली तरी हे हातवारे करत आहेत. ऊमकार केल्यासारखं दाखवत आहेत. आधी यांना निलंबित करा, अन्यथा उद्या काहीबी बोलतील असं नितेश राणे म्हणाले आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संचमान्यता धोरण-समायोजन आणि TET सह अन्य विषय प्रलंबित

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचा शासनाकडे पाठपुरावा सुरु

अमरावती/प्रतिनिधीः- संचमान्यता २०२५-२६ व TET सह अन्य महत्त्वाच्या प्रलंबित विषयांवर ठोस निर्णय घेण्याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती म्हणून शासनाकडे सातत्याने मागणी केली जात आहे. मागणीचे निवेदन शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे व शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याकडे दिले आहे. या निवेदनाव्दारे संचमान्यता धोरण २०२४: समायोजन २०२५-२६, TET आणि TET संबंधित पदोन्नती,अशैक्षणिक कामे, Online/Offline कामे, पदवीधर वेतनश्रेणी, शिक्षण सेवकांची पदे, वस्तीशाळा शिक्षकांच्या सेवा.नपा, मनपा शिक्षकांचे वेतनविषयक प्रश्न, वरिष्ठ वेतनश्रेणी तृटी, शाळांमध्ये आसन पट्टया, डेस्क बेंच उपलब्ध करणे.या अशा प्रकारच्या अन्य प्रश्नांकडे केवळ शिक्षकांच्या आर्थिक मागण्यांच्या दृष्टिकोनातून न पाहता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा टिकविणे, शाळांमध्ये आवश्यक सुविधांची उपलब्धता, वेतन विषयक असमानता/भेदभाव अशा सामाजिक बाजूने सुद्धा या विषयांकडे बघून सकारात्मक निर्णय घेण्याची विनंती केली आहे. शासनाने सुद्धा वारंवार याबाबत अनुकूल निर्णयाची हमी दिलेली आहे. मात्र अजूनही आणि सकारात्मक अशा निर्णयाची वाट आहे. दि.२४ जानेवारी २०२६ रोजी मंत्री महोदयांनी मालेगाव (नाशिक) येथे प्रत्यक्ष भेटीच्या वेळी आणि दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वर्धा जिल्हा कार्यकारिणी सभेमध्ये राज्य मंत्री महोदयांनी संचमान्यता प्रकरणी शासन गंभीर असून अनुकूल कार्यवाहीचे निःसंदिग्ध आश्वासन दिले होते. तसेच TET प्रश्नावर शिक्षकांचे कोणतेती नुकसान होणार नाही याबाबत आपण आश्वस्त केले आहे.तसेच अन्य प्रश्नांच्या संबंधाने नजीकच्या कालावधीत संघटनांची सभा घेऊन प्रश्नांच्या सोडवणूक करू अशी जाहीर भूमिका विषद केली होती.संच मान्यतेमुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमध्ये उच्च प्राथमिक वर्गासाठी एकच शिक्षक राहील आणि त्यामुळे लक्षावधी बालकांचे शिक्षण प्रभावित होईल. याचा दुष्परिणाम बालकांच्या शिक्षणावर होऊन विद्यार्थी शाळा बाह्य होतील. त्यामुळे २०२५-२६ संच मान्यतेनुसार होणाऱ्या समायोजनाच्या सामाजिक, शैक्षणिक दुष्परिणांचा विचार करून तातडीने निर्णय व्हावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे.त्याचप्रमाणे TET प्रश्नावर आणि पदोन्नतीसाठी TET अनिवार्यता या चुकीच्या धोरणाबद्दल सुद्धा शासनाने सर्वसमावेशक शिक्षक हितेशी भूमिका घ्यावी अशी सुद्धा कळकळीची विनंती संघटनेने केली आहे.दोघांनीही मान्य केल्याप्रमाणे या महत्त्वाच्या प्रश्नांवर सकारात्मक निर्णय अपेक्षित असून सोबतच या अन्य प्रश्नांच्या संबंधाने प्राथमिक शिक्षक संघटनांची स्वतंत्र बैठक आयोजित करण्याचीही विनंती केली आहे.अश्या मागणीचे निवेदन दिले आहे असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

'काऊचपफी' शोरूम मध्ये गुढीपाडव्यानिमित्त गृह सजावटीसाठी ग्राहकांची गर्दी

अमरावती/प्रतिनिधीः- आपल्या सर्वोत्तम फर्निचर क्वालिटीने संपूर्ण विदर्भात नावलौकिक असलेल्या काऊच पफीने आर्टिफेक्स डेकोरेटिव्ह आयटम्स या सेगमेंटमध्ये देखील प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे. याच प्रत्यक्ष उदा. म्हणजे रोज शोरूम व्हिजिट करणारे ग्राहकांपैकी बहुतेक ग्राहक व त्यातही खास करून महिलांचे आर्टिफेक्स मधील शेकडो प्रकार पाहताना आम्ही आपल्याकडील गिफ्ट आर्टिफेक्स व त्यातील व्हरायटी पाहून थक्क झालो व यापूर्वी अशी रेज व व्हेरायटी कधीच पाहिली नव्हती असे आवर्जून कबूल करतात व हमखास काही ना काही खरेदी करतात. आपल्या शोरूम मध्ये सतत काहीतरी नवीन वस्तू याव्या त्यामुळे ग्राहकांना प्रत्येक वेळी आल्यावर वेगळेपणा वाटावा यासाठी संचालक किरण अग्रवाल सतत लक्ष ठेवून असतात. तसेच ग्राहकांची काय मागणी आहे याकडे पण त्यांचं लक्ष असतं. शोरूम मध्ये एवढे प्रकार आहेत. यादी ठेवणे देखील कठीण असते. प्रामुख्याने फ्लावर पॉट साठी विविध प्रकारचे स्टॅन्ड वॉटर फाउंटन लाकडाची कोरीव काम असलेली विविध प्रकारची मडकी फ्लावर पॉटमध्ये मेटल सिरंमीक व यूडन फ्लावर पॉट यांच्या ५० हून अधिक व्हरायटी स्टॉक मध्ये आहेत. दुसरा सगळ्यात जास्त डिमांड असलेली आयटम आहे प्लांट्स. अगदी जिवंत वाटणारी हिरवीगार प्लांट्स पाहून मनाला शांत वाटते. त्यामुळे सगळेच आग्रहाने विकत घेत बसतात. या प्लांट्स चे वैशिष्ठ असे की त्याला हात लावून खात्री

couch puffy
1 Lakh sq ft Premium Furniture & Gift Mall

केल्यावरच ते आर्टिफिशियल आहे हे कळते. यात पण भरपूर व्हेरायटी आहेत. शोरूम मध्ये यासाठी खास विभागच आहे. ग्राहकांना आवडणारा आणखी प्रकार म्हणजे मूर्ती, शोरूम मध्ये शिवाजी महाराज पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गणपती, राम सीता, गजानन महाराज, साईबाबा व अनेकांच्या सिरॅमीक व पितळेच्या अनेक मूर्ती साईज मध्ये आहेत. असंख्य सुंदर रंगसंगती व सुंदर कव्हर असलेली लॅम्प शेड्स चे शेकडो प्रकार बघून ग्राहक मंत्रमुग्ध होतात. तरुणांना आवडणारा आणखी एक प्रकार (कॅन्डल स्टॅन्ड) शेकडो प्रकारचे व वेगळ्या उंचीचे व अप्रतिम लुक अमलेले स्टॅन्ड बघून विकत घेण्याचा मोह आवरत नाही. फॉर्नर स्टॅन्ड तेही अत्यंत कोरीव लाकडात व विविध आकारात आहेत तर फोटो फ्रेम व पेंटिंग प्रेमी साठी आनंदाची बातमी म्हणजे काऊच पफी मध्ये १०० पेक्षा जास्त व्हेरायटी उपलब्ध आहे. राधाकृष्ण, बालाजी, महालक्ष्मी यांच्या पितळ्याच्या मूर्ती तसेच झुंबर वॉल हॅगिंग विविध रंगीबेरंगी फुलांचे बुके, घड़पाले, आरसे, भले मोठे पॉट व त्यात ठेवायला अप्रतिम रंगसंगतीचे फुले व अनेक प्रकारचे शो पीस आपल्या आप्त जणांना गिफ्ट साठी शेकडो पर्याय उपलब्ध आहेत. आर्टिफेक्स चा आणखी खास म्हणजे आर्किटेक संपूर्ण विदर्भातील आर्टिफेक्ट एकमताने हे कबूल करतात की काऊच कॉफी सारखी कॉलिटी रेट्स व व्हेरायटी कुठेही नाही. आपले घर, बंगला, दुकान सजवायचे असेल तर आजच काऊच पफीला भेट द्या. सध्या काही निवडक वस्तूवर गुडीपाडव्यानिमित्त १५ टक्के पर्यंत सूट आहे. ज्यांना सजावटीची आवड आहे. त्यांनी एकदा तरी B5, ड्रीमलैंड, रहाटगाव रोड, अमरावती येथे भेट दिलीच पाहिजे.

आरोग्य अधिकारी जाधवांचा पुष्पहार घालून केला निषेध

स्वच्छताच्या समस्येकडे दुर्लक्ष, शेगाव प्रभागातील नगरसेवक आक्रमक

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील स्वच्छतेचा विषय गंभीर झालेला आहे. वारंवार तक्रारी करूनही लक्ष न दिल्याने नागरिक मनपाच्या कार्यप्रणालीमुळे संतापले आहे. अशात प्रभाग क्रमांक १ शेगाव रहाटगाव येथील नगरसेवक आणि नागरिकांनी प्रभागातील स्वच्छतेच्या गंभीर समस्येकडे लक्ष न दिल्याने सहाय्यक आरोग्य अधिकारी अजय जाधव यांचा आज सोमवार १६ मार्च रोजी पुष्पहार घालून निषेध केला. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रभागातील स्वच्छता होणे गरजेचे आहे. स्वच्छतेच्या गंभीर समस्येकडे वारंवार लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही मनपाच्या वतीने केली जात नाही. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. स्वच्छता, आरोग्य व मूलभूत सुविधा

मिळणे हा प्रत्येक नागरिकांचा हक्क आहे. पण याकडे कोणी लक्ष द्यायला तयार नाही. प्रभागातील अस्वच्छतेकडे वारंवार लक्ष वेधले पण याकडे कोणीही लक्ष दिले नाही. यामुळे शेगाव रहाटगांव परिसरातील नगरसेवक गुड्डू धर्माले, चंदू खेडकर, कल्याणी आकाश तायडे,वंदना मडघे यांनी स्वच्छता आरोग्य अधिकारी अजय जाधव यांचा पुष्पहार घालून निषेध केला. या नंतरही जर प्रशासनाने स्वच्छते संदर्भात योग्य कार्यवाही नाही केली तर या तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

oooooooooooooooooooooooo

१ व १० वरिल उर्वरित

युद्धभूमीतून बाहेर पडून

असताना भारतीय जहाजांची सुरक्षा तसेत, उर्जा सुरक्षा महत्वाची असल्याचे जयशंकर म्हणाले. एका मुलाखतील तेहरानबरोबर सुरु असलेला संवाद सकारात्मक असल्याचे दिसून येत आहे. आवश्यक ते सर्व सहकार्य केले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. इराणचे भारताला सहकार्य-भारतीय जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनी पार करण्याची परवानगी देण्यात यावी, असे वक्तव्य इराणी सर्वोच्च नेते यांच्या जवळचे भारतातील प्रतिनिधी अब्दुल माजिद हकीम इलाही यांनी केले. एएनआय या वृत्तसंस्थेशी संवाद साधताना त्यांनी भारतीय जहाजांना परवानगी द्यायला हवी असे वक्तव्य केले. आमच्याकडून भारतीय जहाजांना बाहेर पडण्यासाठी सहकार्य केल्याचेही त्यांनी नमूद केले.

ट्रॅव्हल्स बसचा भीषण अपघात;

ऊमरीक्षक अमिरोद्दीन इनामदार आणि सहाय्यक पोलिस ऊमरिक्षक शंभुदेव दराडे दाखल झाले. अपघातग्रस्त प्रवाशांना ट्रॅव्हल्स मधून बाहेर काढले असून पोलिस प्रशासन व रुग्णवाहिका यांच्या मदतीने ऊमजिल्हा रुग्णालय केज येथे ऊमचारासाठी दाखल करण्यात आले आहे.या अपघातात प्रवाशांचे सामान जळून खाक झाले. काहींची महत्त्वाची कागदपत्र देखील गहाळ झाली. या दुर्घटनेनंतर प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्मण झाले.

सरकारकडून पुन्हा कोरोनासारखी

नाश्ता आणि जेवणाच्या दराता वाढ झाली, कारण त्यांना काळ्या बाजारातून सिलिंडर घ्यावा लागत आहे. कोविड-१९ काळात देशात सर्वकाही सुरळीत आहे, असेच सरकारकडून सांगितले जात होते, मात्र ऑक्सिजन आभावी लोकांचे जीव जात होते. सरकार कोणतीही माहिती देत नाही. तशीच परिस्थिती आता निर्माण झाली आहे, असा आरोप कॉंग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

सरकार वास्तवापासून दूर का पळत आहे : सुप्रिया सुळे

महाविकास आघाडीतील प्रमुख घटक पक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस (शप) कार्याध्यक्ष तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील अशाच प्रकारची मागणी केली. केंद्र आणि राज्य या दोन्ही सरकारांनी वास्तव स्थिती जनतेला सांगावी, असे खासदार सुळे म्हणाल्या. वास्तवापासून सरकार दूर का पळत आहे, हे आम्हाला समजत नाही. मुख्यमंर्त्यांना विनंती आहे की त्यांनी सर्व माध्यमांसमोर येउन गॅस पुरवठ्यात काय अडचण आहे हे सांगावे.

बिहारमध्ये एनडीएच्या पंचने

राम हे पाचवे ऊमेदवारही विजयी झाले. तर महाआघाडीचे अमरेंद्र सिंह धारी हे पराभूत झाले. बिहारमधील राज्यसभा निवडणुकीसाठी सकाळी पाच वाजल्यापासून मतदानाची प्रक्रिया सुरू झाली होती. त्यात विधानसभेतील एकूण २४३ सदस्यांपैकी एनडीएच्या २०२ सदस्यांनी संध्याकाळी ४ वाजेपर्यंत मतदान केलं. तर महाआघाडीच्या केवळ ३७ आमदारांनी निर्धारित वेळेपर्यंत मतजानाचा हक्क बजावला. महाआघाडीचे ४ आमदार मतदानासाठी विधानसभेत पोहोचलेच नाहीत, त्यामुळे महाआघाडीच्या ऊमेदवाराचा पराभव निश्चित झाला आणि अखेरीस तसाच निकाल लागला.

पेट्रोल पंपावर मिळणार

तसेच एलपीजी ऊत्पादनातील सगळ्या अडचणी दूर करण्याचे काम सुरु असल्याचे या कंपन्यांकडून सांगण्यात आले. सध्याच्या गॅस टेंचाईतून मार्ग काढण्यासाठी घरगुती गॅसच्या ऊत्पादनाला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे. यानंतर गॅस ऊरलाच तर रुग्णालये, शैक्षणिक संस्था,वृद्धाश्रम, स्मशानभूमी यांना एलपीजी ऊत्पादनात १०० टक्के प्राधान्य दिले जाईल. औषध ऊद्योगासाठी आणि संरक्षण क्षेत्रातील ऊग्रहारगृहांना एलपीजी वितरणात ५० टक्के प्राधान्य आहे, असेही छगन भुजबळ यांनी सांगितले.यावेळी छगन भुजबळ यांनी केरोसिनच्या वापराबाबत भाष्य केले. त्यांनी म्हटले की, आपल्याकडे राज्यात केरोसिनचा भरपूर साठा आहे. ऊज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना केरोसिन द्यायची गरज नाही, असे निर्देश मध्यंतरी न्यायालयाने दिले होते. मात्र, आता आम्ही सगळ्यांना केरोसिन ऊपलब्ध करण्यासंदर्भात न्यायालयाला कळवले आहे. त्यानुसार केरोसिन डिलर्सही केरोसिन देउ शकतात. मात्र, मध्यंतरी आपण केरोसिन पूर्णपणे बंद केल्याने केरोसिन डिलर्सची साखळी तुटली होती. त्यामुळे बीपीसीएल, एचपीसीएल आणि आयओसीएल या कंपन्यांच्या पंपांवर केरोसिन ऊपलब्ध करु न देउ. जेणेकरु न केरोसिनमध्ये भेसळ होणार नाही. आम्ही केंद्र सरकारच्या सातत्याने संपर्कात आहोत. एलपीजी आणि पेट्रोलियम पदार्थ मिळवण्यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. हा प्रश्न हळूहळू सुटेल, असेही छगन भुजबळ यांनी सांगितले. एलपीजीचा विषय हा केंद्र सरकारचा आहे. त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे की, एलपीजीचा मुबलक साठा ऊपलब्ध आहे. रांगा लावणे, काळाबाजार होणे यावर लक्ष आहे. अधिकार असलेल्या समित्यांची स्थापन करण्यात आली आहे. आतापर्यंत कारवीत १२०८ गॅस सिलेंडर आणि ३३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गॅस सिलेंडरची किंमत एका महिन्यात वाढली आहे. मात्र, एलपीजी ऊत्पादनही वाढल्याची माहिती छगन भुजबळ यांनी सभागृहात दिली.

४३३ सरपंच प्रशासकांना दणका;

म्हणून नेमण्याची आदेश दिले होते. शिवाय प्रशासक म्हणून नियुक्तकेलेल्या सरपंचांना आर्थिक व्यवहाराचे अधिकार सुद्धा दिले होते.

मात्र औरंगाबाद खंडपीठाकडून छत्रपती संभाजी नगर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील सरपंच प्रशासकांना व्यवहार करण्यावर निर्बंध आणले होते. कोल्हापूर जिल्ह्यात देखील या संदर्भात मुंबई हायकोर्टाच्या सर्किट बेंच मध्ये याचिका दाखल केली होती. न्यायालयाने हिम याचिका मान्य करत प्रशासकांच्या आर्थिक व्यवहारावर निर्बंध आणले आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीचे आर्थिक बजेट कोलमडणार आहे.आर्थिक निर्बंधामुळे ग्रामपंचायतचे वीज बिल पाणी बिल पगार दैनंदिन खर्च याशिवाय अनेक खर्चावर अप्रत्यक्षपणे निर्बंध आला आहेत. मार्च अखेर अपंग योजना निधी खर्च करावा लागतो त्यावर देखील निर्बंध येणार आहेत. मार्च अखेर असल्याने राखीव तरतुदीचा निधी देखील यंदा प्रशासकांना करता येणार नाही. पंधराव्या वित्त आयोगाची मुदत ३१ मार्च रोजी संपणार असून या वित्त आयोगाचा अकरचित निधीही खर्च करण्याचे मोठे आव्हान ग्रामपंचायत समोर असणार आहे.

वरुड तालुक्यातील ३१ मजुरांना

याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

दरम्यान एका वाहनात एवढ्या मोठ्या संख्येने मजूर प्रवास करत असल्याने सुरक्षेच्या नियमांकडे होणारे दुर्लक्ष पुन्हा एकदा समोर आले आहे. या घटनेमुळे वरुड तालुक्यातील संबंधित गावांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून जखमी मजुरांच्या प्रकृतीबाबत त्यांच्या नातेवाईकांमध्ये मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन व पोलीस यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली असून पुढील तपास सुरू आहे.

जिल्हा बँकेचे १० संचालक निवडणूक

कुटुंबातील किंवा जवळच्या लोकांना स्थान देण्याची शक्यता आहे. बँकिंग कायदा अधिनियम १९४९ तसेच कलम १० दोन प्रमाणे कोणत्याही सहकारी बँकेत जर दहा वर्ष संचालक पद भोगली असेल तर त्या संचालकाला पुढची निवडणूक लढवता येणार नाही. या सुधारणे मुळे जिल्हा बँकेतील २१ संचालकांपैकी १० संचालक पुढील निवडणुकीसाठी अपात्र राहणार आहे. यामध्ये वर्तमान उपाध्यक्ष अभिजीत ढेपे ,माजी अध्यक्ष बबलू देशमुख ,संचालक सुरेश साबळे ,प्रकाश काळबांडे, सुधाकर भारसाकळे, बाळासाहेब अलोणे, दयाराम काळे, माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे, जयप्रकाश पटेल, रवींद्र गायगोले यांना पुढील निवडणूक लढवता येणार नाहीं. या निर्णयामुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

अं. सुर्जी नवीन बस स्थानक

येणाऱ्या एका बेसिस्त दुचाकी चालकाला वाचवीताना जागीच उलटला व विद्यार्थ्यांनी एकच किंकाळी फोडली. परिसरात असलेल्या लोकांनी धाव घेत ऑटो उचलून काही सेकंदात सरका केला. काही विद्यार्थि ऑटो खाली दबले होते. तेव्हा सकाळ चे तालुका प्रतिनिधी गजेंद्र मंडलिक यांनी तात्काळ १०८ ला फोन केला परंतु अंजनगाव येथील रुग्णवाहीका उपलब्ध नसल्याने दर्यापूर येथील रुग्णवाहीका येत आहे असे सांगताच लोकांनी लगेच एका ऑटो मध्ये विद्यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालयात पोहचवले. लगेच प्राथमिक उपचार होऊन काही गंभीर रुग्णांना अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले. यात सुशांत रमेश दरोई (वय२३अंजनगाव सुर्जी), श्रेयस अनिल डाबरे (वय १५), खुशी प्रमोद धुळे (वय १४), सोहम रमेश नेटकर (वय १५), अक्षय ज्ञानेश्वर करंबे (वय १२) सर्व राहणार पांढरी यांचा समावेश आहे. इतर विद्यार्थ्यांना किरकोड दुखापत असल्याने त्यांना घरी पाठविण्यात आले. या घटनेच्या वेळी सुरक्षित वाहतूक व्यवस्था सांभाळणारे कोणतेही वाहतूक पोलीस मात्र उपस्थित नव्हते.

मोर्शी येथील राज्य उत्पादन शुल्क

अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले. त्यांच्या ताब्यातून १०० नग देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या प्रत्येकी ९० मिली मापाच्या पावट्या किंमत अंदाजे ५०००/- रू.व देशी दारू वाहतुकीसाठी वापरलेला एक काळ्या पिवळ्या रंगाचा महीन्द्रा कंपनीचा इलेक्ट्रॉनीक ऑटो क्र.एम एच २७ बी.डब्ल्यु.९९०७कि.अ. ३,००,०००/- रू.असा एकुण ३ लाख ५ हजार रू.चा.मुद्देमाल जप्त करून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद,अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक राहुल आठवले ठाणेदार पो. स्टे.मोर्शी यांचे नेतृत्वात पो.स्टे.मोर्शी येथील डी.बी.पथकाचे पोउपनि आकाश शिवणकर, पोकॉ छत्रपती करपते, पोकॉ स्वप्निल बायस्कर यांनी केली. मोर्शी शहरासह तालुक्यातील हिवरखेड,पाळा,तरोडा, धानोरा,भिवकुंडी, पिंपळखुटा,दापोरी यासह ग्रामीण भागातील अवैध देशी व हातभट्टी दारूची खुलेआम विक्री सुरू असून राज्य उत्पादन शुल्काचे अधिकारी कुंभकर्णी झोपेत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. काही महिन्यापूर्वी तरोडा धानोरा येथे विषारी अवैध हातभट्टीच्या दारू सेवनाने दोघा आदिवासी बांधवांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असतांना सुद्धा राज्य उत्पादन शुल्क खात्याच्या अधिकाऱ्यांचे डोळे उघडले नाही.गेल्या कित्येक महिन्यापासून कोणत्याही प्रकारची मोठी कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे राज्य उत्पादन शुल्कांच्या अधिकाऱ्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

पोलीस पाटील संघाची

मागणी केली आहे. ग्रामस्तरावर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच जनता व पोलीस प्रशासन मधील महत्त्वपूर्ण दुवा पोलीस पाटलांना समजले जाते. म्हणून सेवानिवृत्तीच्या वयात वाढ केली जावी. तसेच महिला पोलीस पाटलांना व्यवसाय करातून सूट देण्याची मागणी पण करण्यात आली आहे. यावेळी राहुल सावरकर ,रमेश चौखंडे, प्रमोद सावले, सुनील जुवारे ,प्रमोद कोहळे, निलेश भलावी, सुवर्णा गोरडे, संतोष भूसुम, सतीश देशमुख, भगवंत रोहनकर, प्रदीप इतापुरे ,अजय मोहकर, शंकर कापसे ,गणेश हटवार, आदित्य मानकर, विनोद रिठे, शरद श्रीराव, ललित मरस कोल्हे, भारती गावंडे, वंदना दिघडे, सुमित्रा नेमाडे, स्वाती कडू ,मोहना पंधरे सह पोलीस पाटील मोठ्या संख्येमध्ये उपस्थित होते.

शेतकऱ्याची शेतातच विष

फोनव्दारे सांगीतले की माझे वडील नामे विजय महादेवराव अमदरे हे शेतामध्ये विषारी औषध प्राशन करून मृत अवस्थेत पडून असल्याची माहिती दूरध्वनीवरून दिली. सार्थक यांनी लगेच शेतामध्ये जाऊन पाहणी केली असता विषारी औषध प्राशन करून वडील मृत अवस्थेत आढळून आले.लगेच या घटनेची माहिती मोर्शी पोलिसांना देण्यात आली मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पो.कॉ. सुनील गावंडे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला व प्रेत शवविच्छेदनाकरिता उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे हलविण्यात आले.याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास आरंभीला आहे.

सोशल मीडियावर आपत्तीजन

येणाऱ्या उत्सवा दरम्यान शहरात मिरवणुका, शोभायात्रा धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. तसेच विविध संघटनाच्या वतीने आंदोलन निर्देशाने करण्यात येणार. या दरम्यान क्षुल्लक कारणावरून ही वाद अथवा समाजकंटकांकडून खोडसाळपणा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरी सुरक्षा संहिता अन्वये त्यांना प्राप्त अधिकाराचा वापर करून शहरात विशेष आदेश लागू करण्यात आले आहे. या दरम्यान आक्षेपार्ह घोषणाबाजी, फलक लावणे, गाणे वाजवणे, देखावे प्रदर्शित करणे , मनुष्याच्या जीवितास आरोग्यास व सुरक्षतेस धोका होईल किंवा गर्दी हाणामारी होईल किंवा जातीय, धार्मिक, एकोपा आणि सलोखा भंग होण्यासारखी कृत्य करून सोशल मीडियावर प्रचार प्रसार केल्यास कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

भरधाव कारची दुचाकीला

असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी तातडीने कारवाई सुरू केली आहे. कार चालकाविरुद्ध बीएनएस आणि मोटार वाहन कायदा कलम १३४, १८५ अंतर्गत गुन्हा (१७७/२०२६) नोंदवण्यात आला आहे. अपघातग्रस्त कारचा चालक स्वतः पोलिस स्टेशनला हजर झाला असून त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे.

साई झुलेलाल जयंतीनिमित्त

केली जाणार आहे. शोभयात्रा मध्ये सहभागी भाविकांना जागोजागी शरबत व प्रसाद वितरित केले जाणार आहे. यामध्ये मुख्य देखावा झूलेलाल साई यांचा राहणार आहे. अखंड ज्योत प्रज्वलित केली जाणार आहे. या अखंड ज्योत मध्ये प्रत्यक्ष झुलेलाल साई विराजित असतात असे मानले जाते. ट्रॅक्टर वर एक सांस्कृतिक व धार्मिक देखावा राहणार आहे. यात्रे मध्ये वारकरी दिंडी, महाकाल झांज पथक, संदल, ढोल ताशे ,बग्गी, साउंड इत्यादी सहभागी राहणार आहे. शोभा यात्रा समाप्त झाल्यावर अखंड ज्योतची पूजा अर्चना केल्यावर ते पाण्यामध्ये विसर्जित केली जाणार आहे. शोभायात्रा मध्ये सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये राजू राजदेव, बंटी पारवाणी,सुरेश गंगवानी, राजकुमार दुर्गई, रामचंद्र आहुजा ,मोतीराम दलवानी, चंद्रलाल लुल्ला, डेटाराम हरवानी, मनोहर धामेचा, कैलास दलवाणी, नरेश सिरवानी, कमलेश नावानी, दिलीप संभवानी, रवी भोजवानी, अमरला, श्रीचंद फुलवाणी, रामचंद्र संभवानी, राजेश धनकानी, पवन वासवानी, ओम पिंजानी, अनिकेत तारवानी, दिलीप त्रिकोटी, जानू वरणसिंघानी आदि उपस्थित होते. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी पूज्य पंचायत रामपुरी कॅम्पचे अध्यक्ष डॉ. गेमनानी, हरिश जगमलानी, ब्रिजलाल मुलांनी, नगरसेविका स्नेहा आशिष लूल्ला, बंटी बारवानी, सचिन वासवानी, नरेश सिरवानी, कैलाश दलवानी, आदि प्रयत्न करत आहे.

आरोग्य शिबिराचा शेकडोनी घेतला लाभ- साई झुलेलाल वेल्फेअर फाउंडेशन महिला समिती द्वारा उत्सव अंतर्गत रंगोली स्पर्धा घेण्यात आली होती. यामध्ये ३८ महिलांनी सहभाग दर्शविला तसेच बजाज धर्मशाळे मध्ये आरोग्य शिबिर घेण्यात आले होते. या शिबिर मध्ये ५६० नागरिकांनी आरोग्य तपासणी केली. शिबिरामध्ये मध्ये डॉ. विजय बख्तार, डॉ. नीरज राघानी, डॉ .सिकंदर अडवाणी, डॉ श्याम राठी, डॉ. विशाल बाहेकर, डॉ.सुयोग राठी, डॉ.अभिजीत देशमुख डॉ.रोमा बजाज, डॉ.हेमंत मुरके, डॉ. अमित डफले ,डॉ.पूजा सेवानी, डॉ. सोनम हरवाणी, डॉ. दिनेश बरंधानी, डॉ. स्नेहा पिंजानी, डॉ. सोनल दायमा यांनी सेवा दिली.

गाडगेनगर परिसरात प्लास्टिक

व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव आणि सहाय्यक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

मोहिमेदरम्यान एकूण ९ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान काही आस्थापनांमध्ये कापडी व कागदी पिशव्या तसेच ५१ मायक्रॉनपेक्षा अधिक जाडीच्या प्लास्टिक पिशव्या वापरल्या जात असल्याचे आढळून आले. मात्र एका आस्थापनात प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळून आल्याने संबंधित आस्थापना चालक सचिन पालेकर यांच्याकडून ५,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी विनोद टांक, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक राजू डीक्याव, प्लास्टिक स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी तसेच स्वास्थ निरीक्षक निखिल खंगाळे, प्रवीण उसरे आणि रोहित हडाले उपस्थित होते.

राजापेठ क्षेत्रात ६५ धोकादायक

घटना घडल्यास यासाठी मालक जबाबदार राहणार आहे असे स्पष्ट करण्यात आले आहे.या साठी इमारतीचे मालक आणि तिथे राहणाऱ्यांना लोकांना नोटीस देण्यात आल्या आहे. काही प्रकरणात नागरिकांनी मनपाच्या नोटीस ला प्रतिसाद नाही दिला. मनपा प्रशासन कोणत्याही क्षणी या ६५ इमारतीवर कार्यवाही करू शकते. काही प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. इमारत मालकांना याकडे लक्ष देऊन पावसाचे पूर्वी दुरुस्ती करण्याचे आवाहन केले आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, १७ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

एपस्टीन फाइल्समध्ये नाव आल्याच्या पार्श्वभूमीवर मोदींनी राजीनामा द्यावा

काँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रमक आंदोलन

अकोला : *पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव कथित एपस्टीन फाइल्समध्ये समोर आल्याचा आरोप करत काँग्रेस पक्षाने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रमक निदर्शने केली. या प्रकरणाची सखोल चौकशी करून मोदी यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी जोरदार मागणी काँग्रेस कार्यकर्त्यांनी केली. या आंदोलनाचे नेतृत्व माजी महापौर निखिलेश दिवेकर यांनी केले.*

काँग्रेसच्या वतीने करण्यात आलेल्या निदर्शनांदरम्यान केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. जेफरी एपस्टीन या अमेरिकन व्यक्तीने अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण करून त्यांना देहव्यापारासाठी भाग पाडल्याचे प्रकरण जगभर गाजले आहे. या प्रकरणात जगातील अनेक मोठ्या राजकीय नेत्यांशी, उद्योगपती व सेलिब्रिटींशी त्याचे संबंध असल्याचे आरोप समोर आले होते. त्यामध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी तसेच उद्योगपती अनिल अंबानी यांची नावे समोर आल्याचा दावा काँग्रेसकडून करण्यात आला.

यासंदर्भात अमेरिकेचे माजी राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनीही एका मुलाखतीत 'मी नरेंद्र मोदी यांची राजकीय कारकीर्द संपवू शकतो,' असे वक्तव्य केल्याचा उल्लेख करत काँग्रेसने केंद्र सरकारवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. या पार्श्वभूमीवर मोदी सरकार अमेरिकेच्या दबावाखाली येऊन कृषी व्यापार करार करत असल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला.

या करारामुळे देशातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याचा दावा करत आंदोलनकर्त्यांनी कापूस, फळे, भाज्या आणि सोयाबीन तेल यांसारख्या कृषी उत्पादनांवर परिणाम होणार असल्याची भीती व्यक्त केली. स्वस्त आयातीमुळे भारतीय शेतकरी अडचणीत येतील, असा आरोप काँग्रेस नेत्यांनी केला. या प्रकरणामुळे देशाच्या हिताला धोका निर्माण होत असल्याचा आरोप करत मोदी यांनी तात्काळ राजीनामा द्यावा आणि नवीन व्यापार करार करण्यापूर्वी संपूर्ण प्रकरणाची चौकशी व्हावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

या आंदोलनात शहराध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे, डॉ. सुधीर ढोणे, सरदार खान, मनीष मिश्रा, प्रशांत गावंडे, सौरभ चौधरी, विनोद मराठे, राजेश पाटील, पद्माकर वासनिक, सुनील चंदनबटवे, रहमान बाबू, भीमराव खंडारे, बब्बू भाई, राजकुमार परदेशी, जे. के. राजा, प्रशांत कौशल, दत्ता आमले, जितू वानखडे, विशाल इंगळे, महादेव मेहंगे, दीपक ठाकूर, विठ्ठल नाकट, चंद्रशेखर वाघाडे, नितीन पवार, कुंजन शिंदे, निलेश दुधगम, मिलिंद बागडे यांच्यासह कम्युनिस्ट पक्षाच्या महिला कार्यकर्त्यांचीही उपस्थिती होती.

क्रीडा मंडळाच्या आडून तेल्हारा-अकोटात अवैध जुगार अड्डे ?

प्रशासनाची अर्थपूर्ण डोळेझाक; रोज लाखोंची उलाढाल

समीर ठाकूर

अकोला : अकोला जिल्ह्यातील तेल्हारा व अकोट तालुक्यात क्रीडा मंडळ आणि मनोरंजन क्लबच्या नावाखाली अवैध जुगार अड्डे सुरु असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. सामाजिक उपक्रम आणि क्रीडा उपक्रमांच्या नावाचा आडोसा घेत येथे खुलेआम जुगार रंगत असल्याची चर्चा असून, या सर्व प्रकाराकडे प्रशासनाने अर्थपूर्ण डोळेझाक केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याने या जुगार अड्ड्यांमागे कोणाचा आशीर्वाद आहे ? असा सवालही उपस्थित होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, तेल्हारा तालुक्यातील गाडेगाव मार्गावरील एका मंगल कार्यालयात क्रीडा व मनोरंजन मंडळाच्या नावाखाली विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असल्याचा देखावा केला जात आहे. मात्र प्रत्यक्षात येथे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत जुगाराचा अड्डा चालविला जात असल्याची जोरदार चर्चा आहे. दररोज सकाळपासूनच येथे हायप्रोफाइल जुगाऱ्यांची गर्दी उसळत असून, पत्त्यांच्या खेळात लाखो रुपयांची हारजित होत असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

दुसरीकडे अकोट तालुक्यातील अंजनगाव रोडवरील वाई दिवठाना येथेही अशाच प्रकारचा अवैध जुगार अड्डा थाटण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. अमरावती जिल्ह्यातील एका स्पोर्ट्स अँड एंटरटेनमेंट असोसिएशनच्या नावाने परवानगी घेतल्याचे सांगितले जात असले, तरी येथे 'कार्ड रूम' अर्थात पत्ते खेळण्याची अधिकृत परवानगी नसल्याची माहिती आहे. तरीदेखील काही अधिकाऱ्यांना चिरीमिरी देत हा अवैध जुगाराचा व्यवसाय बिनदिक्कतपणे सुरू असल्याची चर्चा रंगली आहे.

दरम्यान, दोन्ही ठिकाणी सुरु असलेल्या या जुगार अड्ड्यांमुळे शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडत असल्याचा आरोप होत आहे. मात्र काही अधिकाऱ्यांच्या 'खाजगी महसुलात' वाढ होत असल्याची कुजबूजही परिसरात ऐकू येत आहे.

शेगावचा माऊली क्लब बंद; तेल्हाराला जुगाऱ्यांची वळण

गेल्या सहा महिन्यांपासून शेगावमधील सर्वात मोठा क्लब म्हणून ओळखला जाणारा 'माऊली क्लब' बंद पडला आहे. या क्लबमध्ये पूर्वी मोठ्या प्रमाणावर हायप्रोफाइल जुगारी एकत्र येत असत. मात्र तो बंद झाल्यानंतर हेच जुगारी आता तेल्हारा येथील सुरु असलेल्या कथित जुगार अड्ड्याकडे वळल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

अमरावती जिल्ह्यातील जुगाऱ्यांची रेलचेल

अकोट तालुक्यातील अंजनगाव रोडवरील वाई दिवठाना येथे सुरु असलेल्या कथित जुगार अड्ड्यावर अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव, परतवाडा आणि दर्यापूर परिसरातील हायप्रोफाइल जुगाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. सकाळपासूनच आलिशान वाहनांची रांग लागत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. त्यामुळे हा अड्डा नेमका कोणाच्या संरक्षणाखाली सुरू आहे ? असा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे.

त्यामुळे या अड्ड्यांना नेमका कोणाचा राजकीय किंवा प्रशासकीय आशीर्वाद आहे ? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.

तर याप्रसंगी तेल्हारा आणि अकोट ग्रामीणचे पोलिस निरीक्षक यांना संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

घरगुती गॅसचा गैरवापर रोखण्यासाठी प्रशासन अलर्ट मोडवर

कारंजा व रिसोड तालुक्यात तहसील पथकाची धडक कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■

घरगुती गॅस सिलिंडरचा अवैधरीत्या व्यावसायिक वापर रोखण्यासाठी कारंजा शहरात तहसील प्रशासनाच्या पथकाने धडक कारवाई करत विविध हॉटेल्स, चहा-नास्ता केंद्रांची तपासणी केली. या मोहिमेत एकूण २६ ठिकाणांची तपासणी करण्यात आली. अचानक टाकलेल्या छाप्यांमध्ये तीन ठिकाणी घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापर होत असल्याचे उघड झाले असून संबंधितांकडून सिलिंडर जप्त करण्यात आले.

तपासणीदरम्यान हॉटेल अखंड अमृततुल्य (मानोरा रोड, कारंजा), चहा आणि मी (झाशी राणी चौक, कारंजा) आणि कुटुंब हॉटेल (मंगरूळपीर रोड, कारंजा) या तीन ठिकाणी घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापर केला जात असल्याचे आढळून आले. या ठिकाणांवर कारवाई करून संबंधितांकडील सिलिंडर जप्त करण्यात आले असून पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

ही कारवाई तहसीलदार रवी महाले यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षण अधिकारी स्मिता नायगावकर, मंडळ अधिकारी महेश धानोरकर, ग्राम महसूल अधिकारी अर्चना चिकटे, राहुल वरघट तसेच सागर राऊत आणि तुषार श्रीरामे यांच्या पथकाने केली.

दरम्यान, अवैध गॅस सिलिंडरचा वापर रोखण्यासाठी रिसोड तालुक्यातील हॉटेल, धाबे व उपहारगृहांचीही तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान निरीक्षण अधिकारी गणेश तांगडे, हावगीराव गंगनर आणि चेतन जाधव यांनी कारवाई केली. सवड येथील न्यू साई हॉटेल येथे घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापर होत असल्याचे आढळून आल्याने संबंधित ठिकाणाहून सिलिंडर जप्त करण्यात आला. सदर कारवाई तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

घरगुती गॅस सिलिंडरचा वापर केवळ घरगुती कारणांसाठीच करण्याचे नियम असून त्याचा व्यावसायिक वापर करणे कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे अशा प्रकारे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रशासनाकडून पुढील काळातही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

एक्युप्रेशर शिबीराचे थाटात उद्घाटन, लाभ घेण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या भारतीय जैन संघटना वाशिम शाखेच्या वतीने वैकुंठवासी सौ.स्नेहलता पुनमचंद सोमानी यांच्या स्मृती प्रीत्यर्थ एक्युप्रेशर रीसर्च ट्रेनींग व ट्रीटमेंट संस्थान जोधपुर राजस्थानच्या विशेषज्ञ द्वारा स्थानिक जुना जैन स्थानक गुरूवार बाजार येथे सोमवार १६ मार्च ते २१ मार्च पर्यंत आयोजीत एक्युप्रेशर शिबीराचे थाटात उद्घाटन पार पडले.उद्घाटन समारंभाला विशेषज्ञ राजेंद्र सारण,सी.आर चौधरी,माहाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी,सौ.भारती सोमानी,बीजेएस चे जिल्हाध्यक्ष सौरभ लुनावत,समाजसेवक कपील सारडा,ब्रंम्हकुमारीच्या पार्वती दिदि ,विरेंद्र बागरेचा,मनिष संचेती,कल्पेश राउत,प्रा.मिलन संचेती,राजेश मालीया,आनंद सुराना,बालकीसन चांडक,अतुल चांडक उपस्थीत होते. सर्वप्रथम विशेषज्ञ डॉ बी.आर चौधरी,डॉ राजेंद्र सारन यांचे स्वागत व सत्कार करण्यात आले.यावेळी विविध मशीन द्वारे नोंदनी केलेल्या मान्यवरांना सेवा प्रदान करण्यात आली.सर्व प्रकारच्या रोगावर एक्युप्रशरच्या माध्यमातुन उपचार करण्यात आले. यावेळी अजय सुराना,रीतेश सेठ,अतुल संचेती, सागर अलीझार,अमन संचेती,पराग मालीया,पंकज बांडे, अंकज बापना,लवकेश बोरड,सुमीत भुरे,नवीन मालीया,मनीय मालीया,सुमीत बागरेचा,विजया परळकर,संजय चव्हाण आदी उपस्थीत होते.

समाधान महाराज शर्मा यांचे उद्या किर्तन

वाशीम : स्थानिक चंडिका वेश परिसरातील श्री संत सावतामाळी व साईबाबा मंदिराच्या प्रांगणात बुधवार १८ मार्च रोजी रात्री आठ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध किर्तनकार समाधान महाराज शर्मा (केज , बीड) यांच्या किर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे . स्व. श्रीमती नर्मदाबाई पांडूरंग जाधव यांच्या तेरवी निमित्ताने जाधव परिवाराच्या वतीने या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे . तरी वाशीम शहर तथा पंचक्रोशीतील भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा . असे आवाहन प्राचार्य डॉ. सुभाष जाधव , गजानन जाधव , कैलास जाधव , स्वप्नील जाधव व पियुष जाधव यांनी केले आहे .

'विशाल हिंदू संमेलन' सनातन संस्कृती व सामाजिक एकतेचा संदेश

■ प्रतिनिधी | कारंजा ■

हिंदू नववर्षाच्या पार्श्वभूमीवर सनातन संस्कृती, सनातन धर्म आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्यासाठी कारंजा (लाड) शहरात 'विशाल हिंदू संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित या भव्य संमेलनाचा उद्देश हिंदू समाजात जागरूकता, एकता आणि राष्ट्रीय भावनेची जाणीव अधिक दृढ करणे हा आहे.

हे संमेलन गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता पोहा वेश येथील मोठे श्रीराम मंदिर परिसरात आयोजित करण्यात आले असून, शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या संमेलनाचे प्रमुख वक्ते म्हणून दिलीप जोशी उपस्थित राहणार असून ते हिंदू समाजातील संघटन, संस्कृती संवर्धन आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच कार्यक्रमात महिला वक्त्या म्हणून साक्षी वाघमारे या उपस्थित राहून हिंदू समाजातील महिलांची भूमिका, संस्कार आणि समाजजागृती याबाबत विचार मांडणार आहेत.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गजानन कोरडे राहणार असून, संतपरंपरेचे प्रतिनिधित्व करत गुरु अभेदनाथ महाराज व गुरु सेवानाथ महाराज यांचे आशिर्वचन लाभणार आहे.

कार्यक्रमाचे संयोजन नितीन गढवाले, अमोल अघम व नितीन रेवाळे यांनी केले असून, संपूर्ण आयोजन सकल हिंदू समाज, श्रीराम वस्ती कारंजा (लाड) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या संमेलनाद्वारे हिंदू समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सामाजिक ऐक्य, संस्कृतीचे जतन आणि राष्ट्रभक्तीची भावना अधिक दृढ करण्याचा संदेश दिला जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. तसेच या निमित्ताने नागरिकांना हिंदू नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देत कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहून संमेलन यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

श्रीरामजन्मोत्सवानिमित्त जपयज्ञ तथा रघुवंश चिंतनसत्र!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

श्रीमाता अमृतानंदमयी सत्संग समिती वाशिम तथा श्री.गजानन महाराज संस्थान आययूडीपी वाशिम तर्फे वाशिममध्ये विविध अध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. त्यानुसार दरवर्षी प्रमाणे यंदाही गुढीपाडवा ते श्रीरामनवमी म्हणजे गुरुवार दि. १९ मार्च ते गुरुवार दि. २६ मार्च या कालावधीत स्थानिक आययूडीपी स्थित श्री.गजानन महाराज मंदिरात श्रीराम जन्मोत्सव आणि श्रीरामनाम जपयज्ञ आयोजित करण्यात येत आहे.

या अध्यात्मिक साधनेत दररोज सकाळी ६ ते ७ या वेळेत ' श्रीरामप्रहरी श्रीरामनाम जपयज्ञ ' आणि भगवान श्रीरामचरित्रावर चिंतनसत्र होत असते.

यावर्षीच्या चिंतनात महाकवी कालिदास विरचित रघुवंशावर चिंतन होणार असून विख्यात निरूपणकार विद्यावाचस्पती प्रा.दिलीपजी जोशी,वाशिम हे रघुवंशावर निरूपण करणार आहेत. श्रीराम जयराम जयजय राम या सिद्ध मंत्राचा सामूहिक जप देखिल होणार आहे.

अकोला महानगरपालिका, अकोला
सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोला

निविदा सुचना क्र. ३३, (२५-२६)

आयुक्त, अकोला महानगरपालिका, मनपा निधी अंतर्गत १० काम या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

कार्यकारी अभियंता
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/२००८/२०२६,
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : १०/०३/२०२६

हक्कभंग प्रस्तावावरून आमदारांविरोधात पत्रकारांचा संतप्त निषेध मोर्चा

- 'पत्रकारांवरील आरोपांची तात्काळ चौकशी करा'
- विधानसभा अध्यक्षांना निवेदन; राज्यभर आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोला जिल्ह्यातील चार पत्रकारांविरोधात विधानसभेत मांडण्यात आलेल्या हक्कभंग प्रस्तावाच्या निषेधार्थ अकोट येथे पत्रकारांनी आक्रमक भूमिका घेत संतप्त निषेध मोर्चा काढला. आमदार प्रकाश भारसाकळे यांनी सभागृहात केलेल्या वक्तव्यामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात तीव्र नाराजी निर्माण झाली असून, पत्रकारांवरील गंभीर आरोपांची तात्काळ आणि निष्पक्ष चौकशी करावी, अशी जोरदार मागणी पत्रकार संघटनांनी केली आहे.

१२ मार्च रोजी अधिवेशनादरम्यान आमदार भारसाकळे यांनी एबीपी माझाचे प्रतिनिधी उमेश अलोने, साम टीव्हीचे अक्षय गवळी, दैनिक 'वचक लोकशाहीचा'चे संपादक रविराज मोरे आणि महा व्हाईस न्यूजचे संजय आठवले यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्ताव मांडला होता. लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या हस्तकाने आपल्याकडे खंडणी मागितल्याची खोटी बातमी या पत्रकारांनी प्रकाशित केली, असा आरोप त्यांनी सभागृहात केला. तसेच संबंधित पत्रकारांचे लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंध असल्याचा आणि पोलिसांच्या नोंदीवर त्यांचे गुन्हेगारी रेकॉर्ड असल्याचा गंभीर

ठपकाही आमदारांनी ठेवला.

या वक्तव्यामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. पत्रकारांवर गुन्हेगारीचे ठपके ठेवून त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून हा लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर हल्ला असल्याची तीव्र प्रतिक्रिया पत्रकार संघटनांनी व्यक्त केली.

या पार्श्वभूमीवर अकोट येथे विविध पत्रकार संघटना एकत्र येत निषेध मोर्चा काढण्यात आला. शेकडो पत्रकारांनी एकत्र येत आमदार भारसाकळे यांनी सभागृहात केलेल्या आरोपांची तात्काळ चौकशी करावी, अशी मागणी केली. याबाबत उपविभागीय अधिकारी अकोट यांच्या मार्फत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर तसेच सर्व सभागृह सदस्यांना निवेदन सादर करण्यात आले.

'सभागृहाच्या माध्यमातून पत्रकारांवर गुन्हेगारीचे ठपके ठेवणे हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. या प्रकरणाची तात्काळ चौकशी झाली नाही तर पत्रकार संघटना राज्यभर तीव्र आंदोलन उभारतील,' असा इशाराही पत्रकारांनी दिला.

दरम्यान, या प्रकरणाचे पडसाद अकोला जिल्ह्यापुरते मर्यादित राहिले नसून संपूर्ण महाराष्ट्रातील पत्रकार संघटना आक्रमक झाल्या आहेत. मुर्तीजापूर, बाळापूर, दर्यापूर, अमरावतीसह विविध ठिकाणी निषेध आंदोलन उभारण्याची तयारी सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे हा वाद पुढील काही दिवसांत आणखी चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत. या निषेध आंदोलनात चंचल पितांबरवाले, लक्ष्मी गावंडे, अनुरिती गुहे, पुष्पा तिहिले, नरेंद्र कोंडे, अरुण काकड, प्रभाकर बोरकर, मोहम्मद जुनेद, सरफराज अली, गणेश वाकोडे, देवानंद खिरकर, दीपक दाभाडे, अजबराव वानखडे, बाळकृष्ण तळी, सुगत वानखडे, विशाल आग्रे, अभिजीत सोळंके, राजेश साविकार, सुरेंद्र मोरे, राजकुमार वानखडे, धनु बायवार, मेघश्याम महाजन, राजू गावंडे, राजकुमार मुंडाले, अकबर खान, नरेंद्र सुईवाल, सै. शकील, निळकंठ वसु, डॉ. संतोष गायगोले, सुदेश रजाने, संजय बुध, बाळू दामोदर, डॉ. राजुभाऊ सुषिर, दयानंद तेलगोटे, विलास वानखडे आदी पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १०९ ■ मंगळवार, १७ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी प्रशासन ॲक्शन मोडवर

१५००-२००० रुपयांत काळ्या बाजारात सिलिंडरची विक्री; हॉटेल व्यावसायिकांचा धोकादायक नवा फंडा

वर्धा जनमाध्यम : घरगुती गॅस सिलिंडरचा वाढता काळाबाजार, अवैध साठेबाजी आणि व्यावसायिक गैरवापर रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन ?क्शन मोडवर आले आहे. शहरात घरगुती सिलिंडर १५०० ते २००० रुपयांत काळ्या बाजारात विकले जात असल्याची माहिती समोर आली असून धाडसत्र सुरू करण्यात आले आहे.

काही हॉटेल व्यावसायिक लहान सिलिंडर खरेदी करून त्यातील गॅस मोठ्या सिलिंडरमध्ये भरून वापरत असल्याचा धोकादायक प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार बेकायदेशीर तर आहेच, पण स्फोटाचा धोका निर्माण करणारा असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहिले आहे.

९८ ठिकाणी धाडी; २८ सिलिंडर जप्त

साठेबाजी व काळाबाजार रोखण्यासाठी गठित करण्यात आलेल्या ९ विशेष दक्षता पथकांनी आतापर्यंत ९८ ठिकाणी छापे टाकून २८ घरगुती सिलिंडर जप्त केले आहेत. जप्त सिलिंडरचा वापर व्यावसायिक कारणासाठी होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.



जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर इंधन तुटवड्याची शक्यता व्यक्त होत असताना व्यावसायिक गॅस पुरवठ्यावर निर्बंध आल्याने घरगुती सिलिंडरचा गैरवापर वाढल्याचे दिसून येत आहे.

तुटवड्याच्या भीतीने साठेबाजी

प्रशासनाने स्पष्ट केले की जिल्ह्यात एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये, अफवांवर विश्वास ठेवू नये आणि नियमांनुसारच बुकिंग करावे. सिलिंडर मिळाल्यानंतर २८ दिवसांच्या आत पुनर्बुकिंग टाळावी तसेच वितरकांकडे अनावश्यक गर्दी करू नये.

ग्राहकांना महत्त्वाचे आवाहन : सिलिंडर वजन करूनच घ्या

सध्या तुटवड्याच्या वातावरणाचा गैरफायदा घेत काही ठिकाणी कमी गॅस असलेले सिलिंडर पुरवले जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी अत्यंत सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

घरी येणारा सिलिंडर मोजून (वजन करून) घ्यावा

-२ ते ३ किलो कमी असलेला सिलिंडर देण्याचा प्रकार होऊ शकतो

-सिलिंडर वितरकाकडे वजनकाटा असणे आवश्यक आहे

- सिलिंडरचे एकूण वजन सुमारे २९ ते ३० किलो दरम्यान असणे अपेक्षित

-शंका आल्यास सिलिंडर स्वीकारू नये व तक्रार करावी

तालुकानिहाय कारवाई

तालुका	- छापे	- जप्त सिलिंडर
वर्धा	१८ छापे	०४
सेलू	१० छापे	०२
देवळी	१२ छापे	११
हिंगणघाट	१६ छापे	१२
समुद्रपूर	१५ छापे	००
आर्वी	१० छापे	००
आष्टी	०८ छापे	००
कारंजा	०८ छापे	००

कठोर कारवाईचा इशारा

घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर, साठेबाजी, काळाबाजार किंवा कमी गॅस असलेले सिलिंडर पुरवण्याचा प्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

गॅस टंचाईने चुली विझल्या... पण येथे अन्नदानाची ज्योत अखंड प्रज्वलित

१५ वर्षांपूर्वीच्या दूरदृष्टीमुळे टाकरखेड्यातील संत लहानुजी महाराज संस्थान ठरले स्वयंपूर्ण

आर्वी । टाकरखेडा जनमाध्यम : देशभरात गॅस टंचाईचे संकट गडद होत असताना अनेक घरांच्या चुली थंडावल्या, हॉटेल-मेस चहाच्या टपऱ्या बंद पडल्या आणि अन्नाची चिंता अनेकांच्या कपाळावर उमटली. पण या अंधाऱ्या काळात टाकरखेडा येथील संत लहानुजी महाराज संस्थान येथे मात्र अन्नदानाची ज्योत अखंड तेजाने प्रज्वलित आहे. भाविकांच्या पानात महाप्रसादाची उब कायम राहावी, हीच जणू संस्थानची अखंड साधना ठरली आहे.

या सेवेमागे आहे सुमारे १५ वर्षांपूर्वी घेतलेला एक दूरदृष्टीपूर्ण निर्णय. संस्थानच्या विशाल गोशाळेत सध्या सुमारे ५५० गायींचे संगोपन केले जाते. या गायींमधून दररोज निर्माण होणाऱ्या शेणाचा सदुपयोग करून संस्थान व्यवस्थापनाने त्या काळातच १०५ घनमीटर क्षमतेचा गोबरगॅस प्रकल्प उभारला. आज देशात गॅससाठी रांगा लागत असताना हा प्रकल्प संस्थानच्या स्वयंपूर्णतेचा आधार बनला आहे.

या गोबरगॅसवरच दररोज सुमारे एक हजार भाविकांसाठी महाप्रसादाचे जेवण तयार केले जाते. बाहेरच्या जगात टंचाई असली तरी संस्थानमध्ये अन्नदानाची परंपरा खंडित झालेली नाही. उलट, संकटाच्या काळातही सेवा अधिक श्रद्धेने आणि आनंदाने सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळते.

संस्थानचा हा उपक्रम केवळ इंधन निर्मितीपुरता मर्यादित नाही. तो गोसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम ठरला आहे. उद्याचा विचार आज करा या तत्वावर घेतलेला निर्णय आज हजारो भाविकांच्या पोटाला अन्न आणि मनाला समाधान देत आहे.

दरम्यान, संस्थानच्या गोसंवर्धन कार्यालाही विविध स्तरांवर मान्यता मिळाली आहे. नागपूर विभागात प्रथम क्रमांक तर संपूर्ण महाराष्ट्रात तृतीय क्रमांक मिळाल्याने या कार्याची अधिकृत दखल घेतली गेली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक, भाविक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून संस्थानच्या व्यवस्थापनावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

आज जेव्हा टंचाई, महागाई आणि अनिश्चिततेचे ढग सर्वदूर पसरले आहेत, तेव्हा टाकरखेड्यातील हे संस्थान आशेचा दीप ठरले आहे. अन्नदानाची अखंड ज्योत आणि स्वयंपूर्णतेचा संदेश देणारे हे कार्य अनेकांसाठी प्रेरणास्थान बनत आहे.

भरधाव दुचाकीची भीषण धडक; १७ दिवस मृत्यूशी झुंज देऊन अखेर प्राणज्योत मालवली

-रामनगर वॉर्डातील अपघात प्रकरणात चालकावर गुन्हा दाखल

हिंगणघाट जनमाध्यम : रामनगर वॉर्ड परिसरात भरधाव व निष्काळजी दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचा तब्बल १७ दिवस उपचार घेतल्यानंतर मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी निष्काळजी वाहनचालकाविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मृत व्यक्तीचे नाव सुमित उत्तमराव दिवे (वय ४९, रा. वाशी कोरा, ता. समुद्रपूर, जि. वर्धा) असे आहे. ते मुलाच्या उपचारासाठी हिंगणघाट येथे आले होते. ३० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी बहिणीला रामनगर येथील घरी सोडून ते पुन्हा दवाखान्याकडे मोटारसायकलने जात असताना बानमारे यांच्या घराजवळ विरुद्ध दिशेने येणाऱ्या पॅशन प्रो दुचाकीने भरधाव वेगात धडक दिली.

या अपघातात दिवे हे रस्त्यावर फेकले जाऊन त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागला. त्यांना तत्काळ शासकीय रुग्णालयात दाखल करून पुढील उपचारासाठी सेवाग्राम व नंतर नागपूर येथे हलविण्यात आले. काही दिवस उपचारानंतर ते घरी परतले; मात्र १७ जानेवारी रोजी अचानक प्रकृती खालावल्याने त्यांना उपजिल्हा रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

शवविच्छेदन अहवालात डोके व मेंदूला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे रक्तस्त्राव व शॉकमुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रत्यक्षदर्शींच्या साक्षी व तपासाअंती निष्काळजी वाहनचालकामुळे अपघात होऊन मृत्यू झाल्याचे पोलिसांच्या चौकशीत निष्पन्न झाले.

याप्रकरणी संबंधित दुचाकी चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६(१) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

दहा दिवस नळ कोरडे; बोटोणा गावात पाण्यासाठी हाहाकार

-पाईपलाईन फुटल्याने पुरवठा ठप्प; अभियंता परीक्षेला गेल्याने दुरुस्ती रखडली

आष्टी शहीद जनमाध्यम: कारंजा (घा.) तालुक्यातील खडकाळ पट्ट्यातील बोटोणा गावात गेल्या दहा दिवसांपासून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा पूर्णपणे ठप्प झाल्याने ग्रामस्थांवर मोठे संकट ओढवले आहे. नळ कोरडे पडल्याने गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून महिलांना डोक्यावर हंडे घेऊन उन्हात पाण्यासाठी मैलोनमैल भटकंती करावी लागत आहे. स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षांनंतरही पिण्याच्या पाण्यासाठी अशी दारुण परिस्थिती ओढवल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

बोटोणा हे गाव 'ड्राय झोन' म्हणून ओळखले जाते. परिसरातील विहिरींना पाणी लागत नसल्याने उन्हाळ्यात टंचाई तीव्र होते. गावात पर्यायी जलस्रोत नसल्याने नळयोजनेवरच संपूर्ण अवलंबित्व आहे. 'नारा-२२' योजनेअंतर्गत खैरी धरणातून पाईपलाईन टाकून गावात पाणी आणले जाते. मात्र ही पाईपलाईन फुटल्याने गेल्या दहा दिवसांपासून पुरवठा बंद असल्याचे समोर आले आहे. काही ग्रामस्थांच्या मते वीजबिल थकबाकीमुळे वीजजोडणी खंडित झाल्याचीही चर्चा आहे.

दरम्यान, मार्च महिन्यापासून उन्हाचा पारा वाढू लागल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. गावातील विहिरींनी तळ गाठला असून शेतातील उरलेल्या पाण्यावरच ग्रामस्थांची तग धरण्याची वेळ आली आहे. महिला-पुरुष सकाळपासूनच हंडे, बादल्या घेऊन पाण्याच्या शोधात भटकताना दिसतात. पाणीटंचाई आमच्या गावाला पाचवीला पूजलेलीच आहे, अशी हताश प्रतिक्रिया ग्रामस्थ देत आहेत.

गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. देवेंद्र रोकडे, मारोती इरखेडे, स्वप्नील नेहारे, शालिनी नेहारे, रवींद्र काकडे, राधा ठाकरे, सुंदर नेहारे, प्रशांत नेहारे, जोसना नेहारे, रामराव नेहारे, मंगला देहानकर, कमला चमलाटे, अर्चना काकडे, गंगू राऊत, शोभा नेहारे, माया सरीये आदी नागरिकांनी प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

दोन दिवसांत पुरवठा सुरू करण्याचे आश्वासन

नारा-२२ पाणीपुरवठा योजनेचे अभियंता गढवे यांनी सांगितले की, पाईपलाईन फुटल्याने लिकेज दुरुस्तीचे काम सुरू आहे. माझी परीक्षा असल्याने मी काही दिवस बाहेर गेलो होतो. आता कामाला गती देण्यात आली असून आज किंवा उद्यापर्यंत पाणीपुरवठा सुरू केला जाईल,असे त्यांनी सांगितले.

दहेगाव (गोसावी) येथे ग्राहक सेवा केंद्र फोडले

मध्यरात्री चोरट्यांचा डल्ला; सीसीटीव्ही फोडून पुरावे नष्ट

बँक ऑफ महाराष्ट्रच्या मशीनची छेडछाड; परिसरात भीतीचे वातावरण

सेलू जनमाध्यम : सेलू तालुक्यातील दहेगाव (गोसावी) येथे रविवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत हॅ द ईर्ष्ू च्या ग्राहक सेवा केंद्रावर डल्ला मारला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून ग्रामीण भागातील बँकिंग सेवा केंद्रांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

रविवार (दि. १५ मार्च) च्या मध्यरात्री ही घटना घडली. सोमवारी सकाळी केंद्रचालक प्रशांत नारायणे हे नेहमीप्रमाणे केंद्र उघडण्यासाठी आले असता दरवाज्याचे कुलूप तुटलेले आढळले. आत प्रवेश केल्यानंतर साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले आणि चोरी झाल्याचे स्पष्ट झाले.

चोरट्यांनी केंद्रातील सीसीटीव्ही कॅमेरे फोडून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. तसेच व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या मशीनमध्ये मोठ्या प्रमाणावर छेडछाड केल्याचे निदर्शनास आले. चोरीदरम्यान रोख रक्कम किंवा उपकरणांचे नुकसान झाले आहे का, याचा तपशील पोलिस तपासानंतर स्पष्ट होणार आहे. घटनेची माहिती मिळताच दहेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पीएसआय मशाखेत्री यांनी पंचनामा केला असून ठाणेदार यशवंत कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. आरोपींचा माग काढण्यासाठी परिसरातील संशयितांची चौकशी सुरू असून पोलिसांकडून तपासाची चक्रे वेगाने फिरवली जात आहेत.

दरम्यान, ग्रामीण भागातील ग्राहक सेवा केंद्रांना रात्री पुरेशी सुरक्षा नसल्याने ती चोरट्यांसाठी सोपे लक्ष्य ठरत असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रात्रीच्या गस्तीत वाढ करण्याची मागणी होत आहे.

आश्वासनांची रेल्वे रुळावर कधी येणार?

पुलगाव–आर्वी–वरुड ब्रॉडगेज रखडले; संसदेत खा.अमर काळेंचा सरकारवर हल्ला

नवी दिल्ली / वर्धा जनमाध्यम : दशकांपासून रखडलेल्या पुलगाव-आर्वी-वरुड रेल्वेमार्गाच्या ब्रॉडगेज प्रश्नावर अखेर संसदेत संतापाचा स्फोट झाला. खासदार अमर काळे यांनी लोकसभेत आवाज उठवत केंद्र सरकारला थेट धारेवर धरले आणि दिलेल्या आश्वासनांची आठवण करून दिली. जनतेला फक्त घोषणा नव्हे, रेल्वे हवी, असा रोखठोक संदेश त्यांनी दिला. सन २०१७ पासून सुरू असलेली पुलगाव-आर्वी रेल्वे सेवा १९९४-९५ मध्ये बंद झाल्यानंतर आर्वी, आष्टी, कारंजा परिसर अक्षरशः रेल्वेविना अंधारात ढकलला गेला. हा मार्ग ब्रॉडगेज करून वरुडमार्गे दिल्ली लाईनला जोडण्याचे आश्वासन २०२४ च्या प्रचारसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले होते. मात्र निवडणुका संपल्यानंतर या प्रकल्पाची गती शून्यावर आल्याचा आरोप करत काळे यांनी आश्वासनांची रेल्वे धावत आहे, पण प्रत्यक्ष रेल्वे गायब आहे, असा टोला लगावला.हा मार्ग सुरू झाल्यास नागपूरमार्गे वळसा न घालता थेट दिल्लीला जाता येणार असून पुलगाव व मध्यप्रदेशातील आमला येथील लष्करी डेपोदरम्यानचे अंतर तब्बल १४५ किमीने कमी होणार आहे. दारुगोळा वाहतुकीसाठीही हा मार्ग अधिक सुरक्षित असल्याचे लष्करी प्रशासनाचे मत असल्याने राष्ट्रीय सुरक्षेच्याही दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक बळकट करा : रामजी गौतम

वर्धा जनमाध्यम : महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला कांशीराम यांनी राष्ट्रीय स्तरावर नेले. या विचारांचा प्रसार अधिक व्यापक करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करणे आवश्यक आहे. सामाजिक परिवर्तनाची चळवळ मजबूत करणे ही प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन बसपाचे केंद्रीय समन्वयक तथा खासदार रामजी गौतम यांनी केले.

बसपाच्या विदर्भस्तरीय कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. मंचावर महाराष्ट्र प्रदेश बसपाचे अध्यक्ष सुनील डोंगरे, प्रदेश कोषाध्यक्ष अब्दुल रौफभाई, महासचिव नागोराव जयकर, पृथ्वी शेंडे, प्रदेश सचिव दादाराव उईके, मोहन राईकवार, विवेक हाडके, प्रफुल मानके, दीपक पाटील, महेंद्र मुनेश्वर, मोहसीन शेख, स्करमिश खडसे आदी मान्यवर उपस्थित होते.

बहुजन समाज सत्ताधारी व्हावा, ही संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली होती. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी कांशीराम यांनी आयुष्य वाहिले. आज इतर राजकीय पक्षही कांशीराम जयंती साजरी करू लागले आहेत, हे चळवळीचे यश असले तरी अशा राजकीय प्रवाहांपासून सावध राहण्याचे आवाहन प्रदेशाध्यक्ष सुनील डोंगरे यांनी केले.

यावेळी मुकुंद सोनवणे, डॉ. विद्या राईकवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. मोहन राईकवार यांनी केले, संचालन सुरेश दुधे यांनी केले तर आभार अनोमदर्शी भैसारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी किशोर मेंढे, जानराव ठोंबरे, मंदा नाखले, प्रज्ञा दुपट्टे, वैशाली कांबळे, शरद वानखडे आदींनी सहकार्य केले.

मध्यरात्री घराला आग; दोन दुचाकी जळून खाक

करंजी भोगे येथे घटना : ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला

वर्धा जनमाध्यम : तालुक्यातील करंजी भोगे येथे सोमवारी मध्यरात्री एका घराला अचानक आग लागून मोठी धावपळ उडाली. या आगीत घराजवळ उभ्या असलेल्या दोन दुचाकी पूर्णपणे जळून खाक झाल्या. मात्र ग्रामस्थांनी वेळीच धाव घेत आग आटोक्यात आणल्याने मोठी जीवितहानी टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री सुमारे दीड वाजताच्या सुमारास संबंधित घरातून धूर व ज्वाळा बाहेर पडताना दिसताच परिसरातील नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. अनेकजण तात्काळ घटनास्थळी धावले. घरातील सदस्यांनीही प्रसंगावधान राखत बाहेर पडून मदतीसाठी आरडाओरडा केला.

नागरिकांनी तत्काळ पाण्याच्या बादल्या, मोटारी व उपलब्ध साधनांच्या साहाय्याने आगीवर पाण्याचा मारा सुरू केला. काहींनी पोलिसांना व स्थानिक प्रशासनाला घटनेची माहिती दिली. ग्रामस्थांच्या समन्वयाने व शर्थीच्या प्रयत्नांमुळे आग हळूहळू नियंत्रणात आली. मात्र तोपर्यंत घराजवळ उभ्या असलेल्या दोन दुचाकी आगीच्या भक्षस्थानी पडून पूर्णपणे जळून खाक झाल्या. आगीची तीव्रता इतकी होती की दुचाकींचे केवळ लोखंडी सांगाडे शिल्लक राहिले. घरातील काही साहित्यालाही आगीचा फटका बसल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, पोलिस पाटील पूनम मडावी यांनी सेवाग्राम पोलिसांना घटनेची माहिती दिल्यानंतर पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून घटनेची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

आग नेमकी कशामुळे लागली, याबाबत मात्र वृत्त लिहिस्तोवर ठोस माहिती मिळू शकली नाही. शॉर्टसर्किट अथवा इतर कारणांची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना व्यक्त होत आहे.

सामाजिक न्यायासाठी लिंगायत समाजाची निर्णायक चळवळ

उर्वरित १७ जातींना ओबीसी आरक्षणासाठी अंतिम टप्प्यात प्रयत्न: अभय कल्लावार

वर्धा जनमाध्यम : वीरशैव लिंगायत समाजातील विविध घटकांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी सुरू असलेली ओबीसी आरक्षणाची लढाई आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून उर्वरित १७ जातींचा समावेश लवकरच ओबीसी प्रवर्गात होईल, असा विश्वास शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभय कल्लावार यांनी व्यक्त केला.

रामनगर येथील शिवा महिला आघाडी जिल्हा प्रमुख सौ. मेघा हिंगमिरे यांच्या निवासस्थानी १५ मार्च रोजी आयोजित बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. त्यांनी सांगितले की, संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या अभ्यासपूर्ण नेतृत्वाखाली समाजातील २५ जातींना ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळाला आहे. तसेच केंद्र शासनाच्या अधीन सात जातींचाही ओबीसी यादीत समावेश करण्यात आला आहे.

मा. धर्मादाय सह आयुक्त-२, नागपूर यांचे कोर्ट समोर

जाहीर नोटीस

प्रकरण क्रमांक ०११/२०२४

कलम ४७ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०

श्री. शंकर देवस्थान सिंदी (मेघे),
ता.जि. वर्धा ए-१४४ (वर्धा.)
श्री. मधुकर वसंतराव महाडोळे व ईतर ३
विरूध्द
अनुसयाबाई राम मेघे (मय्यत) व इतर ६

प्रति,

१. श्री. रोहनदिप राजदिप मेघे रा. बोरगांव, (मेघे), वर्धा, ता.जि. वर्धा.
२. श्री. विठ्ठलराव गणपत धाबेकर रा.बोरगांव, (मेघे), वर्धा, जि. वर्धा.
३. सौ. राजश्री राजदिप मेघे
रा. बोरगांव, (मेघे), वर्धा, जि. वर्धा.

आपणास या नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, वरील अर्जदारांनी मा. धर्मादाय सह आयुक्त-२, नागपूर यांच्या कार्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये कलम ४७ अंतर्गत प्रकरण दाखल केले असुन आपण त्यात गैरअर्जदार क्र. ५, ६ व ७ आहात. सदर प्रकरण दिनांक १७/०४/२०२६ रोजीच्या कार्यालयीन वेळेपर्यंत आपले लेखी म्हणणे सादर करण्यासाठी ठेवण्यात आलेले आहे. तरी आपण दिनांक १७/०४/२०२६ रोजीच्या कार्यालयीन वेळेपर्यंत व्यक्तीशः वा अधिवक्ता मार्फत धर्मादाय सह आयुक्त-२, कार्यालय नागपूर येथे उपस्थित राहणे गरजेचे आहे.

जर आपण दिनांक १७/०४/२०२६ रोजीच्या कार्यालयीन वेळेपर्यंत सदर प्रकरणात आपले म्हणणे व्यक्तीशः वा अधिवक्त्या मार्फत सादर करून शकले नाही तर सदर प्रकरणात आपले अनुपस्थितीत एकपक्षी आदेश देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

नागपूर
दिनांक :-
०५/०३/२०२६

शिक्का

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यनागप नागपूर

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

आता वार्षिक टोल पास 1 एप्रिलपासून महागणार

नवी दिल्ली/ वृत्तसंस्था -वार्षिक टोल पाससाठी नवीन दर २०२६-२७ आर्थिक वर्षासाठी लागू असतील. हा पास फक्त खाजगी वाहनांसाठी आहे आणि त्यासाठी सक्रिय फास्टॅग आवश्यक आहे. राष्ट्रीय महामार्गांवर प्रवास

करणा-या प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीस्कर करण्यासाठी १५ ऑगस्ट २०२५ पासून फास्टॅगचा वार्षिक पास घेण्याची सुविधा सुरू केली होती. यामुळे टोल भरण्याच्या वेळेत बचत होउन प्रवास अधिक जलद झाला. यापूर्वी या पासची किंमत ३ हजार रु पये होती. आता यामध्ये २.५ टक्क्यांची वाढ झाली असून प्रवाशांना ३,०७५ रु पयांत पास विकत घ्यावा लागणार आहे. हा पास केवळ खासगी (न?न-कमर्शियल) वाहनांसाठी उपलब्ध असणार आहे. ३,०७५ रु पयांचा वार्षिक पास घेतल्यावर हा पास एका वर्षासाठी किंवा २०० वेळा टोलनाका ओलांडेपर्यंत वैध असेल. या दोन्हीपैकी जे आधी पूर्ण होईल, त्यानुसार पासची वैधता समाप्त होईल. जर प्रवासी एक वर्ष पूर्ण होण्याआधीच २०० वेळा टोल नाका ओलांडतील तर त्या पासची मुदत संपेल. प्रवासी वर्षभर कधीही पासचा रिचार्ज करू शकतात. १ एप्रिलपासून देशभरातील सर्व राष्ट्रीय महामार्गांवरील टोल नाक्यावर हे नवीन दर लागू होणार आहेत. टोल दरांचा दरवर्षी आढावा आणि सुधारणा केली जाते. या प्रक्रियेचा एक भाग म्हणून, यावेळी वार्षिक पासच्या किमतीत थोडीशी वाढ करण्यात आली आहे, असे सांगण्यात आले. राष्ट्रीय महामार्गांवर वारंवार प्रवास करणा-या वाहनचालकांना वार्षिक टोल पास सहज मिळू शकतो. ही सुविधा एनएचएआयद्वारे प्रदान केली जाते आणि त्यांच्या वाहनात सक्रिय फास्टॅग आवश्यक आहे. वाहन मालक एनएचएआय पोर्टलवर किंवा त्यांचा फास्टॅग जारी करणा-या बँके/अॅपवर लॉग इन करू न वार्षिक पाससाठी अर्ज करू शकतात. १५ ऑगस्टपासून सुरू केलेल्या या योजनेला प्रवाशांची मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे. सध्या भारतातील ५० लाखांहून अधिक वाहनचालक टोल भरण्यासाठी वार्षिक पासची खरेदी करतात. त्यामुळे या दरवाढीचा फटका ब-याच प्रवाशांना बसणार आहे. सध्या किरकोळ दरवाढीमुळे फारसा फरक पडणार नाही. राष्ट्रीय महामार्गावर खासगी वाहनांकडून घेतलेल्या टोलपैकी २८ टक्के व्यवहार फास्टॅगच्या वार्षिक पासद्वारे होतो.

फार्महाउसवरील ड्रग्ज पार्टीत पोलिसांवर गोळीबार

रंगारेड्डी : तेलंगणातील रंगारेड्डी जिल्ह्यातील एका फार्महाउसवर आयोजित करण्यात आलेल्या पार्टीवर पोलिसांच्या पथकाने छापा टाकला. छापा टाकताना पोलिस पथकावर गोळीबारही करण्यात आला. मात्र, पोलिसांनी घटनास्थळी उपस्थित असलेल्या सर्वांना ताब्यात घेतले. या पार्टीत टीडीपीचे एक खासदारही उपस्थित होते. त्यांच्यासह एका माजी आमदारासह अनेक प्रमुख व्यक्ती उपस्थित असल्याचे समोर आले आहे. पोलिसांना घटनास्थळी अंमली पदार्थांची पावडरही आढळली. तसेच संबंधित खासदाराचा ड्रग्ज चाचणी अहवाल प?झिटिव्ह आल्याचेही समोर आले आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. चेवेल्ला विभागाचे डीसीपी योगेश गौतम म्हणाले, आम्हाला माहिती मिळाली होती की एका फार्महाउसमध्ये परवानगीशिवाय पार्टी आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार पोलिसांनी रात्री सुमारे ९.३० वाजता घटनास्थळी छापा टाकला. पोलिस पथक तेथे पोहोचताच दिल्लीतील रिअल इस्टेट व्यावसायिक नमित शर्मा यांनी बंदुकीतून गोळीबार केला. ही बंदूक रोहित रेड्डी यांचा धाकटा भाउ रितेश रेड्डी यांची होती आणि तिचा परवाना वैध होता; मात्र गोळीबार नमित शर्मा यांनी केला. पार्टीदरम्यान पोलिसांना दोन ग्रॅम पांढरी अंमली पदार्थांची पावडरही आढळली. या पार्टीत लोकप्रतिनिधी, रिअल इस्टेट व्यावसायिक आणि इतर व्यावसायिक उपस्थित होते. डीसीपी योगेश गौतम पुढे म्हणाले या पार्टीत माजी आमदार पायलट रोहित रेड्डी, टीडीपीचे एलुरूचे खासदार पुट्टा महेश कुमार, रितेश रेड्डी, नमित मिश्रा, एम. रमेश, श्रवण कुमार, विजय कृष्णा, रवी आणि अर्जुन रेड्डी यांचा समावेश होता. पुढील तपासासाठी उपस्थित सर्वांचे अतिरिक्त नमुने चाचणीसाठी पाठवण्यात आले आहेत. संपूर्ण अहवाल आल्यानंतर योग्य कायदेशीर कारवाई केली जाईल.

ठाकरेंचे विधानसभा अध्यक्षांना पत्र

शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज विधिमंडळ अधिवेशन सुरू असताना सभागृहात हजेरी लावली. यावेळी, त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली. विधानसभा विरोधी पक्षनेते पदाचा विचार व्हावा, विधान भवनात ठाकरेंच्या शिवसेनेला पक्ष कार्यालय मिळावं,

यासाठी उद्धव ठाकरे आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदारांनी राहुल नार्वेकर यांची भेट घेत पत्र दिले उद्धव ठाकरे यांच्यासोबत आदित्य ठाकरे भास्कर जाधव अनिल परब वरूण सरदेसाई, कैलास पाटील महेश सावंत व इतर आमदार उपस्थित होते. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे आणि राहुल नार्वेकर यांच्यात मनमोकळा संवाद झाला. आमदार निवासाची नवीन बिल्डिंग तयार होत आहे, त्याचं प्रेझेंटेशन आपण पाहावं असं विधानसभा अध्यक्षांनी उद्धव ठाकरे यांना म्हटले. विरोधी पक्षनेतेपदासंदर्भातील पत्र देताना राहुल नार्वेकर आणि उद्धव ठाकरे यांच्यात संवाद झाला, नव्या आमदार निवासाचं प्रेझेंटेशन मला तुम्हाला दाखवायचा आहे, असे नार्वेकर यांनी म्हटलं. उद्धव ठाकरेंनीही त्यावर, बघेल, तसं मी आता मोकळाच आहे असे उत्तर दिलं. तर, आम्ही असे तुम्हाला मोकळं होउ देणार नाही, तुम्ही मोकळे होणार नाही, असे नार्वेकर यांनी म्हटलं. त्यावर एकच हशा पिकला. दरम्यान, उद्धव ठाकरेंनी सभागृहाबाहेर पत्रकारांशी संवाद साधताना विरोधी पक्षनेतेपद आणि गॅस टंचाईवरु न सरकारवर हल्लाबोल केलाय. गॅस टंचाई नाही तर मग रांगा रस्त्यावर का दिसतात? असा सवाल केला.

राजू बाविस्कर यांच्या काळ्यानिळ्या रेषाला साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर

नवी दिल्ली : साहित्य अकादमीतर्फे देण्यात येणा-या २०२५ या वर्षासाठी प्रतिष्ठेच्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. देशातील मान्यताप्राप्त २४ भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींना यंदाचे साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाले असून मराठी भाषेतील काळ्यानिळ्या रेषा या आत्मकथेसाठी लेखक राजू बाविस्कर यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. साहित्य अकादमी ही भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत स्वायत्त राष्ट्रीय संस्था असून भारतीय भाषांमधील साहित्याच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविते. दरवर्षी अकादमीकडून विविध भाषांतील उत्कृष्ट साहित्यकृतींची निवड करून त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात येतो. मराठी साहित्यविश्वात महत्त्वपूर्ण ठरलेल्या काळ्यानिळ्या रेषा या आत्मकथेत लेखकाने आपल्या आयुष्यातील अनुभव, सामाजिक वास्तव, संघर्ष आणि वैचारिक प्रवास यांचे प्रभावी चित्रण केले आहे. या साहित्यकृतीला मिळालेल्या पुरस्कारामुळे मराठी साहित्यविश्वाचा गौरव वाढला आहे. यंदाच्या पुरस्कारांमध्ये काव्यसंग्रह, कादंबरी, कथासंग्रह, निबंध, साहित्यिक समीक्षा, आत्मकथा आणि संस्मरण अशा विविध साहित्य प्रकारांतील विविध पुस्तकांची निवड करण्यात आली आहे. देशातील विविध भाषांमधील साहित्यिक परंपरेचे प्रतिनिधित्व करणा-या या साहित्यकृतींना तज्ज्ञांच्या समितीद्वारे निवडण्यात आले आहे. मराठी भाषेच्या पुरस्कारासाठी नियुक्त परीक्षक मंडळामध्ये ज्येष्ठ साहित्यिक मंगला गोडबोले, नागोराव तम्माजी उटकर आणि राजन गवस यांचा समावेश होता. साहित्य अकादमी पुरस्कारामध्ये मानचिन्ह, शाल आणि एक लाख रु पये रोख रक्कम देण्यात येते. २०२५ च्या साहित्य अकादमी पुरस्कारांचे वितरण ३१ मार्च २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित विशेष समारंभात करण्यात येणार आहे.

साहित्य संघाचा नवा 'गांधी मार्ग' !

विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदी गिरीश गांधी

नागपूर/प्रतिनिधी :तकभराच्या प्रवासात विदर्भ साहित्य संघाने अनेक चढउतार अनुभवले. साहित्यिक चळवळीचे केंद्र म्हणून या संस्थेने विदर्भाच्या वैचारिक आयुष्याला दिशा दिली. मात्र, यंदाची निवडणूक संघाच्या इतिहासातील आणखी एका निर्णायक वळणाची नोंद करून गेली. शब्दांशी खेळ करणा-या साहित्यिकांच्या नेतृत्वासाठीची ही निवडणूक असली, तरी प्रत्यक्षात 'शब्द फसवे असतात, आकडे खरे बोलतात' या वास्तवाचीच पुनरावृत्ती झाली. त्या आकड्यांच्या खेळात गिरीश गांधी यांनी बाजी मारली. प्रतिस्पर्ध्यापेक्षा मिळालेल्या मतांचे अंतर पाहता, मतदारांनी त्यांचे नेतृत्व जणू काही डोक्यावर घेतल्याचे चित्र दिसते. 'लोकशाही बाहेरून लादता येत नाही; ती लोकांच्या अंतःकरणातून निर्माण झाली पाहिजे', असे महात्मा गांधी म्हणायचे. गिरीश गांधीच्या या विजयी आकड्यांमध्ये मतदारांच्या अंतःकरणातून उमटलेली साद किती आणि राजकारणाच्या सावल्यांचा प्रभाव किती, हा प्रश्न पुढील काळातही चर्चेचा विषय राहणार हे नाकारता येणार नाही.

मावळते अध्यक्ष प्रदीप दाते यांनी शांतपणे केलेला संयमी प्रचार, रोज नवे आरोप करत निवडणूक ढवळून काढणारे श्रीपाद भालचंद्र जोशी व साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष असूनही रिंगणात उतरलेले रवींद्र शोभणे, रंजन दारव्हेकर हे प्रमुख दावेदार होते; पण या सगळ्यां दिग्गजांना मागे टाकत गिरीश गांधी यांनी बाजी मारली. विदर्भभर असलेला त्यांचा वैयक्तिक संपर्क आणि सुसंवादाची परंपरा हे त्यांच्या विजयाचे महत्त्वाचे भांडवल होते. मात्र, त्याचबरोबर राजकीय पाठबळावर त्यांनी ठेवलेल्या अधिक विश्वासाचा आरोप त्यांना टीकेचे धनीही करून गेला. प्रचारादरम्यान झालेल्या आरोपांवर एकही प्रतिक्रिया न देण्याचा संयम पाळून आणखी कटुता निर्माण होणार नाही याची काळजी घेतली,

वाद टाळला हे त्यांच्या 'गांधी' असण्याला साजेसेच झाले, परंतु निवडणुकीचे साध्य साधताना वापरलेल्या साधनांची 'शुचिता' कितपत जपली गेली, हा प्रश्न विजयानंतरही चर्चेत आहेच.

असो, या सगळ्या घडामोडींनंतर गिरीश गांधी यांच्या नेतृत्वाखाली साहित्य संघाचा एक नवा अध्याय सुरू होत आहे. गांधी हे साहित्यिक नसले तरी साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रात त्यांचा असलेला वावर, विविध पुरस्कारांनी साहित्यिकांच्या पाठीवर देत असलेली शाबासकीची थाप, अनेक संस्थांचे संचलन करण्याचा मोठा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. त्यामुळे आता प्रश्न असा आहे की हा 'गांधी मार्ग' नेमका कसा असेल? संस्थेचे व्यवस्थापन, विस्तार आणि आधुनिकतेकडे वाटचाल हाच मार्ग प्राधान्याने राहील की साहित्यिक मूल्यांना पुन्हा केंद्रस्थानी आणण्याचा मार्ग निवडला जाईल. नवीन नेतृत्वाने निवडणुकीतील वादांवर पडदा टाकलाच आहे, आता पारदर्शकता, विश्वास आणि साहित्यसेवेचा ध्यास जपला, तरच हा 'नवा गांधी मार्ग' साहित्य संघाच्या परंपरेला साजेसा ठरेल. शिवाय या निवडणुकीभोवती निर्माण झालेल्या 'सावल्यांचा' खेळ थांबवून आता दीर्घकाळ साहित्य संघाच्या प्रतिमेवर गिरीश 'गांधी' मार्गाचा ठसा उमटला पाहिजे अन्यथा 'सावल्या' मोठ्या झाल्या की नेतृत्व खुजे होते हे नव्याने सांगण्याची गरज नाही. अखेर विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत गिरीश गांधी यांचा विजय झाला आणि या संस्थेला नवे नेतृत्व लाभले. मात्र, हा निकाल जाहीर होताच एक गोष्ट स्पष्ट झाली. या निवडणुकीची चर्चा विजयापेक्षा तिच्याभोवती उभ्या राहिलेल्या वादांमुळेच अधिक रंगली. आरोप-प्रत्यारोप, राजकीय सावल्या आणि मतदान प्रक्रियेवर उपस्थित झालेले प्रश्न यामुळे ही निवडणूक केवळ नेतृत्व बदलण्यापुरती मर्यादित राहिली नाही; तर साहित्यिक संस्थांच्या लोकशाही प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह उभे करून गेली.

कीर्तनकाराचा अल्पवयीन मुलीवर अत्याचार

अहिल्यानगर/प्रतिनिधी-जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ढवळीपूर गावात वारकरी संप्रदायाला काळिमा फासणारी घटना घडली आहे. येथील एका कीर्तनकार यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ याने अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे पारनेरसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आणि कीर्तनकार यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ हा स्वतःला महाराज म्हणवून घेतो. ३८ वर्षांच्या या नराधमाने एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर मागील पाच वर्षांपासून लैंगिक अत्याचार केले. अल्पवयीन मुलीला धाक दाखवून एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ याने युवतीवर वारंवार अत्याचार केल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. पीडित मुलीला गरम लोखंडी पकडने चटके देउन अमानुष मारहाण केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ हा पाच वर्षांपासून अल्पवयीन पीडितेवर अत्याचार करत होता.

मुलीवरील अत्याचाराची तक्रार तिच्या भावाने पारनेर पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी तक्रार दाखल केल्यानंतर तातडीने कारवाई करत अण्णासाहेब गुंजाळ या नराधमाला रविवारी पहाटे चार वाजता बेड्या ठोकल्या. त्याच्याविरोधात पास्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला रविवारी सुट्टीच्या कोर्टात हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने नराधम अण्णासाहेब गुंजाळला २० मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.पीडितेच्या भावाने दिलेल्या तक्रारीनुसार, पीडित मुलगी इयत्ता आठवीत असल्यापासून अण्णासाहेब गुंजाळची तिच्यावर वाकडी नजर होती. आरोपी यशवंत थोरात उर्फ अण्णा गुंजाळ हा पीडितेच्या शेजारीच राहत असल्याने दोन्ही कुटुंबांचे कौटुंबिक संबंध होते. पीडितेचा भाउ आरोपीच्या वारकरी शिक्षण संस्थेत सचिव म्हणून कार्यरत आहे. याचाच फायदा घेउन आरोपीने २०२१पासून पीडितेवर वाईट नजर ठेवली होती. मुलगी घरी एकटी असताना किंवा आरोपीच्या घरी कोणी नसताना त्याने वारंवार तिच्यावर बळजबरीने शरीरसंबंध प्रस्थापित केले. विरोध केल्यास जीवे मारण्याची धमकी-पीडितेने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने तिला जीवे मारण्याची धमकी दिली होती. मी दोन हाफ मर्डर केलेले आहेत, जर कोणाला काही सांगितले तर तुझ्या आई-वडिलांना आणि भावाला मारून टाकीन, अशी धमकी तो देत होता.

युद्धनौका पाठवण्यास जपान, दक्षिण कोरिया आणि ऑस्ट्रेलियाची नकारघंटा, अमेरिकेच्या अडचणी वाढल्या

नवी दिल्ली/वृत्तसंस्था :अमेरिका- इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध १७ व्या दिवशी सुरु आहे. इराणनं युद्ध सुरु झाल्यानंतर होर्मुझची सामुद्रधुनीतील जहाजांची वाहतूक नियंत्रित करण्याचा निर्णय घेतला. यामुळं संतापलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया,यूके आणि फ्रान्सला युद्धनौका होर्मुझच्या सामुद्रधुनीत पाठवण्याचं आवाहन केलं होतं. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांच्या आवाहनाला जपान, दक्षिण कोरिया आणि ऑस्ट्रेलियानं ठेंगा दाखवला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशल या प्लॅटफार्मवर पोस्ट करु न चीन, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया, ब्रिटन आणि इतर देशांना होर्मुझच्या सामुद्रधुनीत युद्धनौका पाठवण्याचं आवाहन केलं होतं. मात्र, या पैकी काही देशांनी होर्मुझमध्ये युद्धनौका पाठवण्यास नकार दिला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जागतिक उर्जा साधनांच्या पूर्ततेसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या अंदाजानुसार या सामुद्रधुनीतून २० टक्के तेलाची वाहतूक होते. यामुळं इतर देशांनी देखील या ठिकाणी युद्धनौका पाठवाव्यात असं आवाहन ट्रम्प यांनी केलेलं. जपनान सरकारनं होर्मुझच्या सामुद्रधुनीत कोणत्याही प्रकारे सुरक्षा अभियान राबवण्याचा विचार नसल्याचं म्हटलं. जपनाच्या पंतप्रधान कार्यालयानं अमेरिकेकडून अद्याप अधिकृत विनंती करण्यात आली नाही. मात्र, सध्याच्या स्थितीत नौदल पाठवणं शक्य नाही. जपान उर्जेची गरज भागवण्यासाठी इराण आणि आखाती देशांवर अवलंबून आहे, यासाठी अमेरिकेसाठी इराणच्या विरोधात जाण्यास जपान तयार नाही.

मुक्तशिक्षण प्रणालीमुळे शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांना संधी मिळण्यास मदत-मुख्यमंत्री

मुंबई/प्रतिनिधी :राज्यातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये ही राज्य शासनाची भूमिका आहे. एज्युकेट गर्ल्ससारख्या अनुभवी संस्थेच्या सहकार्यामुळे राज्यातील मुक्त शाळा प्रणाली अधिक बळकट होईल आणि शिक्षण अर्धवट राहिलेल्या विशेषत? मुलींना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यातील मुक्तशिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि औपचारिक शिक्षण प्रणालीमधून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना लवचिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या पुढाकाराने शालेय शिक्षण विभागाने 'एज्युकेट गर्ल्स' संस्थेशी नुकताच सामंजस्य करार केला. राज्यात प्रत्येकाला शालेय शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कायम आग्रही आहेत. यादृष्टीने शालेय शिक्षण विभागामार्फत पूर्व प्राथमिक शिक्षण देणा-या खासगी संस्थांना देखील नोंदणी करणे बंधनकारक करण्यात येत आहे. पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शिक्षणापर्यंत विद्यार्थीसंख्या कायम राहावी यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तथापि कोणत्याही कारणास्तव शाळाबाह्य झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी देखील प्रयत्न करण्यात येत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बाबीला प्राधान्य दिले असल्याने विशेषतः शिक्षणापासून दूर राहिलेल्या मुली, महिला यांना या कराराचा विशेष लाभ होणार आहे. एज्युकेट गर्ल्स ही आशियातील सर्वोच्च सन्मान मानल्या जाणा-या रमण मॅगसेसे पुरस्काराने गौरविण्यात आलेली संस्था असून मुलींच्या शिक्षणासाठी प्रभावी कार्य करणा-या अग्रगण्य स्वयंसेवी संस्थांपैकी एक आहे. मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीमुळे या संस्थेसमवेत झालेल्या या करारामुळे राज्यातील मुक्त शिक्षण प्रणाली अधिक बळकट करण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध होणार आहे.

सेवानिवृत्त एसटी कर्मचा-यांना पत्नीसह वर्षभर मोफत प्रवास- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई/प्रतिनिधी :एसटी कर्मचा-यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विधानभवन येथे महत्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत कर्मचारी संघटनांनी मांडलेल्या तक्रारी व मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात आले. तसेच एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचा-यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.एसटी महामंडळात कार्यरत असलेल्या सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाने चालक-वाहकांवरील कारवाई, आगार व्यवस्थापनातील अडचणी तसेच काही प्रशासकीय प्रक्रियांमुळे निर्माण होणा-या समस्यांकडे मंत्री सरनाईक यांचे लक्ष वेधले होते. या पार्श्वभूमीवर संघाचे अध्यक्ष आमदार सदाभाउ खोत तसेच संघटनेच्या पदाधिका-यांसोबत मंत्री सरनाईक यांनी सकारात्मक चर्चा केली. कर्मचा-यांना न्याय मिळावा हीच महामंडळाची भूमिका असल्याचे यावेळी सांगितले. तीन वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या पर्यवेक्षक व अधिका-यांच्या बदल्या. मंत्री सरनाईक यांनी

एकाच ठिकाणी तीन वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा बजावणा-या पर्यवेक्षक व अधिका-यांची इतर ठिकाणी बदली करण्याचे निर्देश एसटी प्रशासनाला दिले. या संदर्भात कर्मचारी संघटनांच्या भावना तीव्र असून, या प्रक्रियेची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या सूचनाही दिल्या.

सामान्य प्रवाशांना उत्तम सेवा देणे हेच एसटीचे तसेच सर्व कर्मचा-यांचे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यामुळे काम करताना चालक-वाहकांना भेडसावणा-या दैनंदिन अडचणी, आगार स्तरावरील निर्णयप्रक्रिया तसेच शिस्तभंग कारवाईच्या बाबतीत न्याय्य व पारदर्शक पद्धतीने काम करण्याचे निर्देश मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिले. मंत्री सरनाईक म्हणाले की, कर्मचारी संघटनांशी नियमित संवाद साधून त्यांच्या समस्या सोडविण्याबाबत एस.टी. प्रशासन सकारात्मक आहे. कर्मचा-यांच्या अडचणी समजून घेउन त्यावर शक्य तितक्या लवकर कार्यवाही करण्याची महामंडळाची भूमिका आहे, जेणेकरून सामान्य प्रवाशांना अधिक चांगली सेवा देणे शक्य होईल. त्यामुळे एसटी व्यवस्थापनाने कर्मचा-यांच्या मागण्यांचा विचार करून सामोपचाराने तोडगा काढावा, असे निर्देश त्यांनी दिले.या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर तसेच सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

जातीच्या भिंती तोडायच्या तर मुलगी जाउ द्या ना दुस-याच्या घरात-आव्हाड

मुंबई/प्रतिनिधी : राज्य सरकारने विधिमंडळात सादर केलेल्या धर्म स्वातंत्र्य विधेयकावर सभागृहात चर्चा होत आहे. मुख्यमंर्त्यांनी हे विधेयक समजून सांगितल्यानंतर विरोधकांनी यावर भूमिका मांडली. ठाकरेंच्या शिवसेनेनं विधेयकास पाठिंबा दिला असून शरद पवारांच्या राष्ट्रवादीने विरोध दर्शवला आहे. धर्म स्वातंर्त्य या बिलाच्या हेतुला आमचा विरोध आहे, जबरदस्तीने धर्मांतराला आमचा विरोध आहे. धर्मस्वातंर्त्य या नावाने बिल आणणे म्हणजेच संविधानाला छेद देणं आहे. गौतम बुद्धांनी केलेल धर्मांतर हे पहिलं धर्मांतर आहे, मग बुद्ध, जैन आणि बसवेश्वर यांनाही आता जेलमध्ये जावा लागल असतं, असे म्हणत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी धर्म स्वातंर्त्य विधेयकास विधानसभेतील चर्चेदरम्यान आपला विरोध दर्शवला आहे. यावेळी, आपल्या मुलीच्या लग्नाचेही उदाहरण त्यांनी दिले. जातीच्या भिंती तोडायच्या असेल तर मुलगी जाउ द्या ना दुस-याच्या घरात, माझी मुलगी मी ख्रिश्चन घरात दिली, असे आव्हाड यांनी म्हटले. तुकाराम महाराज यांचे अभंग स्विकारण्याऐवजी त्यांना कुठपर्यंत आपण घेउन गेलो, धर्माला विरोध करु न जर कोणी धर्मांतर करत असेल तर ते सर्वात मोठं हिंदूंमधील एक्सेप्शन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वर्गात बसू दिलं जात नव्हतं, त्यांनी आज संविधान लिहीलं. त्यामुळे, योगेश सागर तुम्ही आज येथे बसलात, असे म्हणत आमदारांना उद्देशून जितेंद्र आव्हाड यांनी सभागृहात धर्म स्वातंर्त्य विधेयकावर चर्चा केली.

एक मुलगा आणि मुलगी यांनी जर संवैधानिक पद्धतीने जर विवाह केला तर त्यांना तुम्ही मारझोड करणार आहेत का? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला. बिलाच नाव तुम्ही धर्म स्वातंर्त्य म्हटलं आहे, हे तर धर्म नियंत्रण आहे, मला वाटलं तर मी धर्मांतर करतो. ?ोटीस कशाला द्यायची, छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक नाकारला, सावित्रीबाईंवरती शेण फेकलं हे धर्म स्वातंत्र आहे का? मी हिंदू आहे, मी ज्या सोसायटीत राहत होते त्या ठिकाणी माझ्या आईला शेवटपर्यंत पुजेसाठी बोलवत नव्हते. हे आम्ही आईला विचारायचो तर ती म्हणायची की मला हे पटत नाही. पण, आम्ही पुस्तक वाचायला लागलो त्यावेळी मला कळायला लागलं हे आज सभागृहात मी उघडपणे सांगतोय, असे म्हणत आव्हाड यांनी वर्णव्यवस्थेवरु न भाष्य केलं.

पाणी फाऊंडेशनच्या सहकार्याने पाणीदार महाराष्ट्राचा संकल्प-मुख्यमंत्री

मुंबई/प्रतिनिधी :' पाणी फाउंडेशन' ने महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. या फाउंडेशनने राज्य शासनाच्या समवेत राज्याला बसणा-या दुष्काळाची तीव्रता

कमी करण्यात मदत केली.यापुढेही पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने पाणीदार महाराष्ट्राचा संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मंत्रालयात आयोजित बैठकीत पाणी फाऊंडेशनच्या जलसंधारण कामाच्याबाबत सादरीकरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

बैठकीस कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक परिमल सिंग, पाणी फाऊंडेशनचे संस्थापक आमिर खान, किरण राव, पाणी फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, तसेच अमित चंद्रा, विलास शिंदे आदी उपस्थित होते. दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, कृषी विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,



हवामान विषयक संशोधन करणा-या विविध संस्थांनी यावर्षी एल निनोचा प्रभाव जाणवणार असल्याचे मत केले आहे त्यामुळे राज्यात ८० टक्के पाउस होईल, असे गृहीत धरून जलसंधारणाच्या कामांचे नियोजन करावे. पाणी फाउंडेशनच्या मागील कामाचा अनुभव बघता त्यांच्या माध्यमातून यावर्षीही शेतकरी, ग्रामस्थ जलसाक्षर होतील.पाण्याचे महत्व ओळखून फाउंडेशन काम करत आहे. या कामासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी फाउंडेशनला मदत करावी. त्यासाठी पूरक यंत्रणा सज्ज ठेवावी. फाऊंडेशन राज्यात करीत असलेल्या जलसंधारणाच्या कामांमध्ये मृद व जलसंधारण विभागाचाही समावेश करावा. पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून होत असलेल्या कामाचा दर्जा चांगला राखण्यासाठी, त्यांच्या मागणीनुसार नियंत्रण आणि पडताळणी यंत्रणेची आवश्यकता आहे. यासाठी कृषी सहाय्यक तसेच ग्रामविकास विभागाच्या उमेद अभियानामधील कर्मचा-यांचा समावेश असलेली व्यवस्था उभारण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.बैठकीत पाणी फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी सादरीकरण केले. यावेळी संस्थापक आमिर खान, किरण राव, अमित चंद्रा यांनीही जलसंधारणाची कामे प्रभावी होण्यासाठी मते व्यक्त केली. फाउंडेशनने राज्यामध्ये स्वयंसेवक तत्त्वावर १३ हजार १२१ शासकीय अधिका-याचे मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षणासाठी नोंदणी केली आहे. तसेच फार्मर कप निवासी प्रशिक्षणासाठी १६ हजार २६० शेतकरी सहभागी झाले आहेत. यामध्ये ५७.५६ टक्के महिला शेतकरी आहेत तसेच ११ हजार ९५ निमंत्रकांनी नोंदणी केली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

दूरगामी परिणाम

युद्धामुळे जग अक्षरशः होरपळते आहे. पश्चिम आशियातील रणभूमीवर हे थैमान सुरू असून, इंधनटंचाईच्या भीतीने सामान्य जनता संत्रस्त आहे. भारतात पेट्रोल, डिझेल, एलपीजी किंवा नैसर्गिक वायूचा कोणताही तुटवडा नाही, अशी स्पष्ट हमी पेट्रोल व नैसर्गिक वायुमंत्री हरदीप पुरी यांनी लोकसभेत दिली असली, तरी वास्तव वेगळे आहे. साठेबाजी, काळा बाजार आणि वितरण व्यवस्थेतील गोंधळामुळे महाराष्ट्रासह देशभरातील अनेक शहरांत गॅसटंचाईचे चटके बसत असून, सिलिंडर वितरणासाठी पोलीस बंदोबस्त ठेवावा लागत आहे. एलपीजी पुरवठा विनाखंडित उपलब्ध करण्याच्या ठोस उपाययोजना केंद्र सरकारने केल्या. ५ मार्चपासूनच एलपीजीच्या उत्पादनात ३० टक्के वाढ केल्याचे सांगण्यात आले. एलपीजीच्या नोंदणीत अचानक वाढ झाल्याने टंचाईची स्थिती निर्माण झाल्याचे दिसते. सध्या ४० देशांमधून कच्च्या तेलाची आयात होते. देशातील रिफायनरीज किंवा तेल शुद्धीकरण कारखाने पूर्ण क्षमतेने उत्पादन करत आहेत. घरगुती पाईप गॅस आणि वाहनांसाठी सीएनजीचा १०० टक्के पुरवठा केला जात आहे. उद्योगांना त्यांच्या गरजेच्या ८० टक्के आणि खत उद्योगाला ७० टक्के पुरवठा केला जाणार आहे. त्यामुळे त्यांच्या अडचणी मोठ्या प्रमाणात दूर केल्या जात आहेत. अमेरिका, नॉर्वे, कॅनडा, अल्जेरिया आणि रशिया यासारख्या देशांकडून एलपीजी खरेदी वाढवण्यात आली. युद्धामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सागरी वाहतुकीस बरीच बाधा पोहोचत असताना कच्च्या तेलाची दोन जहाजे आखाती देशांतून भारतात दाखल झाली, ही समाधानाचीच बाब. देशात वापरल्या जाणाऱ्या एकूण एलपीजीपैकी ६० टक्के एलपीजी आयात केला जातो. त्यापैकी ९० टक्के होर्मुझच्या मार्गाने येतो. एलपीजी वापराबाबत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. गेल्या दशकात हा वापर ६० टक्क्यांनी वाढला. ८५ टक्के कच्चे तेल आयात करावे लागते आणि या आयातीपैकी ५० ते ६० टक्के तेल होर्मुझच्या खाडीतून येते. देशात येणाऱ्या जहाजांचा खासकरून तेल आणि एलपीजी टँकरचा सुरक्षित मार्ग सुनिश्चित करण्यासाठी भारताने इराणशी यशस्वी चर्चा केली. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतील जलवाहतुकीवर बंदी आणली होती. आता भारताचा तरी अपवाद केला जात आहे. भारत नेहमीच इराणचा महत्त्वाचा भागीदार आणि मित्र राहिला आहे, असे इराणचे राजदूत मोहम्मद फतहाली यांनी म्हटले आहे. अर्थात, हे उद्गार देशासाठी आश्वासक आहेत. इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनी यांचे प्रतिनिधी डॉ. अब्दुल माजिद हकीम इलाही यांनीही भारतीय तेलवाहू जहाजांना सुरक्षित जाऊ देण्यावर वाटाघाटी सुरू असल्याचे मान्य केले आहे. भारताला तेल आणि गॅस वाहतुकीत फायदा होईल याद्दष्टीनेच आम्ही विचार केला आहे, असे इलाही यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वीच इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांच्याशी चर्चा करून वाटाघाटींद्वारेच युद्धातून मार्ग काढावा लागेल, असे मत व्यक्त केले होते. इंधन आयातीसाठी अन्य पर्यायांवरही विचार सुरू आहे; मात्र याचा अर्थ होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे निर्धोक झाली आहे, असा नाही. कारण, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेऊन, हे युद्ध कसे अन्यायकारक आहे, हे भारताने त्यांना पटवून दिले पाहिजे आणि युद्ध थांबवले पाहिजे, अशी अपेक्षा इलाही यांनी व्यक्त केली आहे. याचा अर्थ भारतासह जगातील प्रमुख नेत्यांनी युद्ध समाप्तीसाठी ट्रम्प यांच्यावर दबाव आणावा, अशी इराणची अपेक्षा आहे. याद्दष्टीने भारत पुढाकार घेणार का, हे पाहावे लागेल. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर तसेच शिखर संघटनांमध्ये भारताच्या शब्दाला आजही मान व वजन आहे. शिवाय सध्या आखाती क्षेत्रात अजूनही देशाची तीन जहाजे असून, त्यावर एकूण ७६ भारतीय खलाशी तैनात आहेत. आखाती भागात अडकलेल्या हजारो भारतीयांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे सरकार आपल्यावरील जबाबदारी ओळखून पावले टाकेल, अशी आशा आहे. ऊर्जातज्ज्ञांच्या मते, देशात सध्या तेलाचा पुरेसा साठा आहे; परंतु एलएनजीबद्दल काळजी वाटावी अशी स्थिती आहे. शिवाय आंतरराष्ट्रीय बाजारात एलएनजीच्या किमती केवळ दोन आठवड्यांत ५० टक्क्यांनी वाढल्या. या सर्व पार्श्वभूमीवर होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेल आणि गॅसचे २० टँकर्स भारताकडे येऊ देण्यास परवानगी द्यावी, या दृष्टिकोनातून केंद्र सरकार प्रयत्न करत आहे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अरागची यांच्याशी याबाबत बोलणी केली. जगभरातील कच्च्या तेलाच्या वाहतुकीपैकी २० टक्के तेल होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जात असते. गेल्यावर्षी जूनमध्ये इस्रायलबरोबर तणाव निर्माण झाल्यानंतर इराणने ही सामुद्रधुनी बंद करण्याचा इशारा दिला होता. या सामुद्रधुनीतील वाहतूक रोखण्याचा प्रयत्न केल्यास इराणला गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी ट्रम्प यांनी दिली असली, तरी त्याचा कोणताही उपयोग न होता, तेथील वाहतुकीस मोठी झळ पोहोचली आहे. या सामुद्रधुनीवरील नियंत्रण आणि प्रवेशाबाबत इराण आणि ओमान यांच्याकडे मोठा अधिकार आहे. होर्मुझच्या उत्तरेला इराण आणि दक्षिणेला ओमान व संयुक्त अरब अमिराती हे देश आहेत. होर्मुझची सामुद्रधुनी ही उत्तरेकडील इराणच्या आखाताला दक्षिणेकडील ओमानच्या आखाताशी जोडते. त्यानंतर ती अरबी समुद्रात विलीन होते. कोणत्याही वेळेस या मार्गावरून डझनभर तेलवाहू जहाजे ये-जा करत असतात. इराणकडून वेळोवेळी या मार्गावरील वाहतूक थांबवण्याची धमकी दिली जाते. भारताला मात्र इराणने दिलेली सवलत ही मोलाची आहे. कारण, भारत आजही इतर अनेक वस्तूंबाबत स्वावलंबी झाला असला, तरी इंधनाबाबत अद्याप परावलंबीच आहे. अशावेळी अमेरिकेसह सर्वच प्रमुख देशांना इराण वा अन्य इंधनसमृद्ध देशांबाबत पूर्वग्रहदूषित आणि अतिरेकी पवित्रा घेऊन चालणार नाही. त्या कारणाने जग मुळातच अक्षरशः होरपळते आहे. युद्ध आणखी लांबल्यास त्याचे केवळ या युद्धखोर देशांवरच नव्हे, तर जगावरच दूरगामी परिणाम होऊ शकतात. शिवाय ते याघडीला कोणती दिशा घेणार, हेही स्पष्ट नाही.

युद्धखोरांना तेलाची झळ नाही

युद्धामुळे इराण आणि पश्चिम आशियातील देशांत हाहाकार माजला आहे. पण त्याचा गंभीर परिणाम भारतासारख्या अनेक देशांवर, त्यांच्या सामान्य नागरिकांवर होऊ लागला आहे. त्याचे कारण म्हणजे दैनंदिन आयुष्यात लागणाऱ्या पेट्रोल, डिझेल, गॅस यांची टंचाई आणि वाढणाऱ्या किमती. त्या अजून भडकण्याची शक्यता आहे.

कारण पश्चिम आशियातील समुद्री वाहतूक ठप्प झाली आहे. खनिज तेल / गॅस यांच्या आंतरराष्ट्रीय बाजारात प्रचंड अनिश्चितता आहे. ज्यामुळे सर्वच देशांना त्याची झळ बसू लागली आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात हाहाकार उडून सर्वच देशांना त्याची झळ बसू लागली आहे असे आपण म्हणत असू तर ज्या अमेरिका आणि इस्त्राईल यांनी इराणवर हल्ला करून हा उत्पात घडवला त्यांना देखील त्याची झळ बसावयास हवी ना? युद्धाच्या दिवसात तर खप-मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत असते. पण तसे ते नाही.

अमेरिकेने देशांतर्गत नवीन तंत्रज्ञान आणि प्रचंड भांडवली गुंतवणूक करून तेलाच्या बाबतीत ९० टक्के स्वयंपूर्णता आणली आहे. आणि इस्त्रायल पश्चिम आशियातील देशांच्या खेटून असून देखील तो त्यांच्याकडून तेल आयात करत नाही. तो आफ्रिकेतील नायजेरिया, लॅटिन अमेरिकेतील ब्राझील आणि आशियातील अझरबैजान यांच्याकडून आपल्या तेलाची गरज भागवतो.

इराणवर हल्ला करून साऱ्या जगाला आर्थिक अरिष्टाच्या खाईत ढकलणारे हे दोन देश स्वतःला मात्र तेलामुळे झळ लागणार नाही याची काळजी घेऊनच हा रक्तरंजित खेळ खेळत आहेत.

संजीव चांदोरकर

गॅस तुटवड्याचे राजकीय परिणाम

भारतात स्वयंपाकाच्या गॅसच्या (एलपीजी) सिलिंडरचा मोठ्या प्रमाणात तुटवडा होण्याचे किंवा गॅस पुरवठा कोलमडून पडण्याचे संकट यापूर्वी दोन मुख्य कालखंडात निर्माण झाले होते. यातील एक तुटवडा जागतिक तेला संकटामुळे तर दुसरा सरकारी धोरणामुळे निर्माण झाला होता. दोन्ही वेळा सत्ताधारी पक्षावर त्याचे राजकीयदृष्ट्या मोठे परिणाम झाले.

१९७३-७४ चे जागतिक तेल संकट (Arab Oil Embargo) ही भारतातील एलपीजी गॅस मधील पडझड होती. इसाईलला पाठिंबा दिल्याबद्दल अरब देशांनी, अमेरिका व इतर पाश्चात्त्य देशांवर तेल निर्यात बंदी घातली. कच्च्या तेलाचे दर चार पट वाढले. त्या वेळी भारत ९० टक्के तेल आयात करत होता, एलपीजी उत्पादन घटले आणि आयात कोसळले. परिणामी, देशभरात गॅस सिलिंडरसाठी लांब रांगा लागल्या होत्या. गॅसचे रेशनिंग होऊनही त्याचा काळाबाजार झाला होता. घरगुती वापरासाठी गॅस मिळणे कठीण झाले होते. महागाई प्रचंड वाढली होती.

याचा राजकीय परिणाम म्हणजे इंदिरा गांधी सरकारवर मोठा दबाव आला. देशावरचे आर्थिक संकट गडद झाले, १९७०च्या दशकातील राजकारणात महागाई आणि तुटवडा हे प्रमुख मुद्दे बनले. जनतेत असंतोष वाढला आणि १९७५ च्या आणीबाणीच्या पार्श्वभूमीला हातभार लागला.

गॅस तुटवडा आणि वितरण कोसळण्याचा दुसरा कालखंड अक्षरशः ज्वालाग्राही ठरला. सबसिडी कॅप संकट नावाने हे प्रसिद्ध आहे. काँग्रेसप्रणीत यूपीए-२ सरकारच्या काळात केंद्र सरकारने आर्थिक तूट रोखण्यासाठी घरगुती सबसिडीवरील एलपीजी सिलिंडरची संख्या सहापर्यंत मर्यादित केली. या संख्येला पूर्वी मर्यादा नव्हती. जागतिक कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडलेल्या असल्याने सबसिडीचा बोजा प्रचंड वाढला होता.

घटलेल्या सिलिंडर संख्येचा लोकांना नाहक त्रास सहन करावा लागला. परिणामी, सरकारच्या विरोधात देशभरात मोठा रोष निर्माण झाला. सिलिंडरसाठी लांबच लांब रांगा लागल्या, काळाबाजार जोरात झाला, गरिबांना महागाईचे चटके बसू लागले. विशेषतः ग्रामीण आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना फटका बसला, अनेक राज्यांत पुरवठा खूप मोठ्या प्रमाणात कमी पडला.

याचे राजकीय पडसाद उमटले. हा मुद्दा २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत महत्त्वाचा ठरला. भाजप आणि नरेंद्र मोदी यांनी या घटनेला 'काँग्रेसचे अपयश' म्हणून गाजावाजा करत प्रचार केला.

जनता आधीच संतापली होती. तिचा विस्फोट होऊ शकतो हे लक्षात आल्यावर सरकार दबावाखाली आले आणि सिलेंडरच्या मर्यादेला सहावरून आधी नऊवर आणि नंतर बारापर्यंत वाढवावे लागले. तरीही हे संकट २०१४ च्या निवडणुकीत काँग्रेसच्या पराभवाचे एक प्रमुख कारण ठरले.

या व्यतिरिक्त इतर छोटे तुटवडे अल्प काळासाठी पडले होते. १९९०-९१च्या आखाती युद्धाच्या वेळी तेलाच्या किमती वाढल्याने अप्रत्यक्ष तुटवडा पडला. २००८-०९ मध्ये जागतिक आर्थिक मंदी आणि उच्च किमतीमुळे स्थानिक तुटवडा वाढतच गेला. २०२० च्या लॉकडाउनमध्ये मागणी अचानक वाढल्याने बुकिंगसाठी विलंब होऊ लागला, पण मोठा तुटवडा नव्हता. इराण-इस्त्राईल अमेरिका युद्धामुळे निर्माण झालेला सद्यःकालीन गॅसचा तुटवडा हा मागील पन्नास वर्षांतला सर्वांत मोठा आयात आधारित तुटवडा आहे आणि तो राजकीयदृष्ट्या संवेदनशील ठरत असल्यास त्यात नवल वाटण्याजोगे काहीच नाही. कारण आजवर तेच झाले आहे. जेव्हा जेव्हा एलपीजी गॅसचे संकट अक्राळविक्राळ स्वरूप धारण केले, तेव्हा सत्तेत असणाऱ्या सरकारांना मोठा राजकीय फटका बसला. आताही एलपीजी टंचाई हा अत्यंत संवेदनशील राजकीय मुद्दा आहे कारण तो गरीब आणि मध्यमवर्गाच्या स्वयंपाकाशी थेट जोडलेला आहे. उज्वला योजनेच्या यशामुळे आता घरगुती वापर वाढला आहे, पूर्व परंपरेनुसार कोणताही तुटवडा आपल्याकडे लगेच राजकीय वादात रूपांतरित होतो. सध्याचे सरकार महागाईच्या विरोधात घोषणा देऊन सत्तेत आलेले असल्याने या मुद्यावरचा आक्रोश त्यांना नक्कीच असहा व नकोसा असणार.

समीर गायकवाड
८३८०९७३९७७

शुल्कनियमनाचे गौडबंगाल

महाराष्ट्रातील व्यावसायिक शिक्षण व्यवस्थेत शिक्षण शुल्क ठरवण्याची जबाबदारी शुल्क नियामक या प्राधिकरणाकडे आहे. इंजिनीअरिंग, मेडिकल, औषधनिर्माण, डेंटल, एमबीए अशा सर्व विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयांचे शुल्क ही संस्था निश्चित करते. तिच्या निर्णयांचा परिणाम लाखो विद्यार्थी, पालक आणि हजारो शिक्षकांवर होतो.

महाराष्ट्रातील प्रत्येक विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयाला शिक्षण शुल्क निश्चितीसाठी शुल्क नियामक प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करावा लागतो. त्यात महाविद्यालयाला शिक्षक व कर्मचाऱ्यांचे वेतन, इमारती व उपकरणांचा खर्च, देखभाल खर्च, कर्ज आणि व्याज, तसेच विकास निधी यांचे तपशील द्यावे लागतात. प्राधिकरण ही सर्व कागदपत्रे तपासून साधारण तीन वर्षांसाठी शिक्षण शुल्क निश्चित करते. त्या कालावधीत महाविद्यालय त्या मर्यादेपेक्षा जास्त शुल्क आकारू शकत नाही. या प्रक्रियेत पारदर्शकता कमी असेल किंवा तपासणी कमकुवत असेल तर आर्थिक गैरव्यवहाराची शक्यता निर्माण होऊ शकते. सर्वात सामान्य पद्धत म्हणजे महाविद्यालय खर्च फुगवून दाखवते. एखाद्या कॉलेजचा खरा वार्षिक खर्च उदाहरणार्थ ५० कोटी असला तरी कागदपत्रांमध्ये तो ७० कोटी दाखवला जाऊ शकतो. प्राधिकरणाने ही माहिती पुरेशी पडताळणी न करता स्वीकारली तर जास्त शिक्षण शुल्क निश्चित होऊ शकते. उदाहरणार्थ, एखाद्या विद्यार्थ्याचे वास्तविक शुल्क एक लाख असायला हवे असताना ते १.४ लाख मंजूर झाले, तर प्रत्येक विद्यार्थ्याकडून ४० हजार रुपये जास्त घेतले जातात. त्या महाविद्यालयात हजार विद्यार्थी असतील तर वर्षाला चार कोटी रुपयांचा अतिरिक्त भार विद्यार्थ्यांवर पडतो. अशी स्थिती अनेक महाविद्यालयांमध्ये असल्यास काही वर्षांत हजारो कोटींचा आर्थिक परिणाम होऊ शकतो. दुसरी शक्यता म्हणजे पायाभूत सुविधांचा खर्च फुगवणे. काही वेळा प्रयोगशाळा उपकरणे, संगणक, इमारत बांधकाम किंवा लायब्ररीवरील खर्च कागदपत्रांमध्ये जास्त दाखवला जातो. उदाहरणार्थ, प्रत्यक्षात पाच कोटींची उपकरणे असताना ती १२ कोटी दाखवली गेली तर कॉलेजचा एकूण खर्च कृत्रिमरीत्या वाढतो आणि त्यावर आधारित जास्त शुल्क मंजूर होऊ शकते. आज परिस्थिती अशी आहे की, अनेक महाविद्यालयांकडे भोगवटा सर्टिफिकेटसुद्धा नसते.

तिसरी पद्धत म्हणजे शिक्षकांचे वेतन कागदावर जास्त दाखवणे. काही वेळा प्रत्यक्षात ६० हजार रुपये पगार असताना कागदपत्रांमध्ये तो १.३ लाख दाखवला जातो. त्यामुळे संस्थेचा खर्च जास्त असल्याचे चित्र तयार होते. शुल्क निश्चित करताना सर्वात मोठा घटक म्हणजे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पगार. प्राधिकरणाकडे महाविद्यालय शुल्क प्रस्ताव पाठवते तेव्हा त्यात शिक्षकांचे वेतन, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, पीएफ, इतर भत्ते यावर आधारित खर्च मोठा असल्याचे दाखवले जाते आणि त्यानुसार विद्यार्थ्यांचे शुल्क ठरवले जाते. कळत नकळत या प्रक्रियेशी आणखी एक महत्त्वाचा घटक जोडलेला आहे. राज्य सरकारचा समाजकल्याण विभाग मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शुल्काचा परतावा कॉलेजला देते. यात ईबीसी, ओबीसी, एससीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश असतो. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून शुल्क घेतल्यानंतर सरकार त्या त्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजनेनुसार ते ते शुल्क कॉलेजला परत देते. मात्र इथेच संपूर्ण व्यवस्थेतील एक मोठा विरोधाभास दिसतो. अनेक महाविद्यालयीन व्यवस्थापने सतत असा युक्तिवाद करतात की सरकारकडून शुल्क परतावा उशिरा मिळतो, त्यामुळे आम्हाला शिक्षकांचे पगार वेळेवर देता येत नाहीत. हा दावा काही अंशी खरा असू शकतो, कारण शासनाच्या देयकांमध्ये विलंब होण्याच्या तक्रारी अनेक वर्षांपासून आहेत. पण वास्तव इतके साधे नाही.

राज्यातील अनेक विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षकांना नियमानुसार पगार वेळेवर दिला जात नाही, हे उघड वास्तव आहे. अनेक ठिकाणी महिनोन् महिने पगार थकलेले असतात. काही ठिकाणी शिक्षकांना अर्धवट रक्कम दिली जाते. काही ठिकाणी तर पगार अनेक महिन्यांनी दिला जातो. पण याच वेळी त्या महाविद्यालयाकडून शुल्क नियामक प्राधिकरणासमोर जी कागदपत्रे सादर केली जातात त्यात मात्र पूर्ण वेगळे चित्र दिसते. कागदावर असे दाखवले जाते की शिक्षकांना नियमानुसार पूर्ण पगार दिला जात आहे. बँक ट्रान्सफर, पगार पावत्या, लेखापरीक्षण कागदपत्रे यामध्ये सर्व काही व्यवस्थित असल्याचे दाखवले जाते. परंतु अनेक शिक्षकांच्या अनुभवातून आणि तक्रारीतून एक अत्यंत गंभीर प्रकार पुढे येतो. काही ठिकाणी शिक्षकांच्या खात्यात पगार जमा केला जातो, परंतु त्यातील मोठा भाग पुन्हा महाविद्यालय व्यवस्थापनाकडे परत देण्याचा दबाव टाकला जातो. काही ठिकाणी रोख स्वरूपात रक्कम परत घेण्यात येते, तर काही ठिकाणी विविध कारणांनी ती रक्कम पुन्हा संस्थेकडे वळवली जाते. यामुळे कागदावर पूर्ण पगार दिल्याचे दाखवले जाते, पण प्रत्यक्षात शिक्षकांच्या हातात कमी रक्कम राहते. ही पद्धत केवळ शिक्षकांवर अन्याय करणारी नाही तर ती शिक्षण व्यवस्थेतील गंभीर आर्थिक विकृती आहे. कारण शुल्क नियामक प्राधिकरण शुल्क ठरवते तेव्हा ती याच कागदपत्रांवर विश्वास ठेवते. म्हणजेच महाविद्यालय ज्या पगाराचा खर्च दाखवते तो प्रत्यक्षात होतच नसतो, पण त्यावर आधारित विद्यार्थ्यांचे शुल्क वाढवले जाते. याचा अर्थ असा की विद्यार्थ्यांकडून जास्त शुल्क घेतले जाते, सरकारकडून शुल्क परतावा घेतला जातो, आणि शिक्षकांना मात्र पूर्ण पगार दिला जात नाही. ही व्यवस्था तीन स्तरांवर अन्याय करणारी ठरते. विद्यार्थ्यांवर आर्थिक भार वाढतो, सरकारच्या निधीचा अपव्यय होतो आणि शिक्षकांचे शोषण होते.

या संदर्भात अनेक शिक्षक संघटना आणि व्यक्तींनी शुल्क नियामक प्राधिकरणाकडे तक्रारी केल्या आहेत. पण त्या तक्रारींवर ठोस कारवाई झाल्याचे फारसे दिसत नाही, ही गोष्ट सर्वात गंभीर आहे. कारण प्राधिकरणाकडे वारंवार तक्रारी येत असतील आणि तरीही त्यावर तपास, चौकशी किंवा दंडात्मक कारवाई होत नसेल तर त्या संस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. शुल्क नियामक प्राधिकरणाने केवळ महाविद्यालयांनी दिलेल्या कागदपत्रांवर विश्वास ठेवण्याची पद्धत तात्काळ बदलायला हवी. शिक्षकांच्या प्रत्यक्ष पगाराची पडताळणी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, शिक्षकांच्या बँक खात्यांतील व्यवहार, पीएफ जमा रेकॉर्ड, आयकर नोंदी आणि प्रत्यक्ष शिक्षकांचे निवेदन यांची तुलना केली तर वास्तविक स्थिती स्पष्ट होऊ शकते. एखाद्या कॉलेजने कागदावर पगार दिला आणि प्रत्यक्षात तो परत घेतला असे सिद्ध झाले तर त्या संस्थेविरुद्ध कठोर कारवाई झाली पाहिजे. त्यात दंड, शुल्क कमी करणे, विद्यार्थ्यांना परतावा देणे किंवा गंभीर प्रकरणात मान्यता रद्द करणे अशा उपायांचा समावेश असला पाहिजे.

शिक्षण क्षेत्रात पारदर्शकतेचा अभाव हा आजचा सर्वात मोठा प्रश्न आहे. या सगळ्या प्रक्रियेत प्राधिकरणाकडे येणाऱ्या फाइल्सची तपासणी अत्यंत महत्त्वाची असते. कागदपत्रांची काटेकोर तपासणी झाली नाही, किंवा डेटा विश्लेषण व्यवस्थित झाले नाही, तर चुकीच्या आकड्यांवर आधारित शुल्क मंजूर होऊ शकते. विशेषतः डेटा एन्ट्री, स्क्रूटिनी आणि आर्थिक विश्लेषण कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अवलंबून असेल तर नियंत्रण कमी होण्याची शक्यता वाढते.

शुल्क निर्धारण साधारण तीन वर्षांसाठी लागू असते. त्यामुळे एखादी चूक किंवा गैरव्यवहार झाला तर त्याचा परिणाम तीन वर्षे चालू राहतो. उदाहरणार्थ एका कॉलेजमध्ये प्रति विद्यार्थी ३० हजार रुपये जास्त शुल्क मंजूर झाले आणि ते हजार विद्यार्थ्यांवर लागू झाले, तर एका वर्षात तीन कोटी आणि तीन वर्षांत नऊ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार निर्माण होऊ शकतो. राज्यभरातील हजारो महाविद्यालयांचा विचार केला तर हा आकडा मोठ्या प्रमाणावर वाढू शकतो.

महाविद्यालय व्यवस्थापन, शुल्क निर्धारण आणि सरकारी अनुदान या तिन्ही स्तरांवर काटेकोर तपासणी झाली नाही तर अशा विकृती वाढत जातील. शिक्षण हे सेवा क्षेत्र आहे, पण ते अनेक ठिकाणी आर्थिक व्यवहारांच्या गुंतागुंतीत अडकले आहे. या परिस्थितीत महाराष्ट्र सरकारने तातडीने काही ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. सर्वप्रथम उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र चौकशी समिती नेमली पाहिजे. या समितीने मागील आठ वर्षांतील ाफअ च्या सर्व शुल्क निर्धारण निर्णयांची आणि आर्थिक व्यवहारांची तपासणी करावी. दुसरे म्हणजे सर्व महाविद्यालयांनी सादर केलेल्या आर्थिक कागदपत्रांचे फॉरेन्सिक ऑडिट करणे आवश्यक आहे. तिसरे म्हणजे कंत्राटी नियुक्त्या, वेतन संरचना आणि प्रशासकीय निर्णयांची स्वतंत्र चौकशी करणे गरजेचे आहे.

याशिवाय विद्यार्थ्यांसाठी तक्रार नोंदविण्याची सुलभ डिजिटल व्यवस्था तयार करावी. कोणत्याही महाविद्यालयाने जास्त शुल्क घेतल्याचे सिद्ध झाले तर त्याचा विद्यार्थ्यांना परतावा देण्याची सक्ती केली पाहिजे. प्राधिकरणाच्या कारभारात सुधारणा करण्यासाठी काही संरचनात्मक बदलही आवश्यक आहेत. सर्व शुल्क निर्धारण प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल करणे ही पहिली पायरी असावी. प्रत्येक महाविद्यालयाने सादर केलेले खर्च, पगार, पायाभूत सुविधांचा तपशील आणि आर्थिक कागदपत्रे सार्वजनिक पोर्टलवर उपलब्ध करणे आवश्यक आहे. यामुळे पारदर्शकता वाढेल.

दरवर्षी तृतीय पक्षाकडून स्वतंत्र ऑडिट केले गेले पाहिजे. डेटा ?नालिटिक्सचा वापर करून सर्व कॉलेजांच्या खर्चाची तुलना करता येईल. अचानक जास्त खर्च दाखवणाऱ्या संस्थांची तपासणी लगेच करता येईल. अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी आणि व्यवस्थापन शिक्षणासाठी वेगवेगळे मानक खर्च प्रारूप तयार केल्यास शुल्क निर्धारण अधिक वैज्ञानिक होऊ शकते. आता तरी गेल्या ५-१० वर्षांत प्राधिकरणाने घेतलेले सर्व शुल्क निर्धारण निर्णय, फाइल्स, नोटिंग्स, डेटा आणि महाविद्यालयांनी सादर केलेल्या आर्थिक कागदपत्रांचे फॉरेन्सिक ऑडिट केलेच पाहिजे. विद्यार्थी आणि पालकांकडून आणि विविध शिक्षक संघटनांकडून तक्रारी स्वीकारण्यासाठी स्वतंत्र पोर्टल आणि हेल्पलाइन सुरू करावी. तुम्ही हितसंबंधी नाहीत म्हणून तुमची तक्रार आम्ही स्वीकारणार नाही हा हडेलहप्पी प्रकार प्राधिकरणाने तात्काळ बंद करावा.

शुल्क नियामक प्राधिकरणाने केवळ शुल्क ठरवणारी संस्था म्हणून न राहता विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि सार्वजनिक पैशाचे संरक्षण करणारी प्रभावी नियामक संस्था म्हणून काम करणे आवश्यक आहे. अन्यथा कागदावर एक आणि प्रत्यक्षात दुसरे अशी दुटप्पी व्यवस्था कायम राहील आणि त्याचा फटका शेवटी समाजालाच बसत राहील.

शंतनू काळे

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

पांढ-या सोन्याची कवडीमोल दराने विक्री

दरवाढीची आशा मावळली, सीसीआयचे केंद्र बंद : शेतकरी त्रस्त

कापसाचे दर दोन वर्षांआधी दहा हजार रुपयांच्या वर गेले होते.यावर्षी अतिवृष्टीमुळे कापसाच्या उत्पादनात मोठी घट आली आहे.परंतु कापसाला चांगला भाव मिळेल,अशी आशा होती.आता चार महिने झाले तरी भावात कोणतीही वाढ झाली नसल्याने नाईलाजाने कमी दरात कापूस व्यापाऱ्यांना विकावा लागत आहे. - श्रीनिवास रेकुलवार, तालुका अध्यक्ष : केळापूर तालुका युवक काँग्रेस

घरातील एक खोली कापसाने पॅक

ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांकडे जागा अपुरी असते.त्यातच एका खोलीत राहणे आणि दुसऱ्या खोलीत शेतमाल, अशी स्थिती असते.परिणामी,शेतकऱ्यांना काढणी केल्यानंतर आहे त्याच भावात शेतमालाची विक्री करावी लागत आहे. शेतकऱ्यांनी अनेक महिन्यांपासून कापूस घरात साठवून ठेवला आहे.आता त्यात कॉटन डस्टबर्ग नावाचे विषाणू निर्माण झाल्याने त्वचेचे अनेक आजार शेतकऱ्यांना व घरातील लहान मुलांना होत आहे.त्यामुळे बराच दिवस घरात कापूस साठवून ठेवणेसुद्धा आरोग्याच्या दृष्टीने घातक आहे. - इंजि.अजय आत्राम, महाराष्ट्र आ.प्रदेश काँग्रेस कमिटी सरचिटणीस महाराष्ट्र

जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - नगदी पीक म्हणून ओळख असलेल्या कापसाची केळापूर-आर्णी विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. यंदाही शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कापसाची लागवड केली. मोठ्या प्रमाणात खर्चही केला. मात्र, अतिवृष्टीमुळे उत्पादनात मोठी घट झाली. केळापूर-आर्णी विधानसभा मतदारसंघात कापसाचे सर्वाधिक उत्पादन घेतले जाते. यंदाही खरिपात शेतकऱ्यांनी सोयाबीन पाठोपाठ कापसाची लागवड केली,वेळेवर पाऊस पडत असल्याने पीके बहरली. परिणामी, शेतकऱ्यांकडून उत्पादन वाढीची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, अतिवृष्टीमुळे सर्व मातीमोल झाले

त्यामुळे उत्पादनात मोठी घट आली.दोन वेच्यातच कापसाचा खराटा झाला, शेतकऱ्यांना कापसाचे दर वाढतील,अशी आशा होती.मात्र,अद्यापही समाधानकारक दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त केल्या जात आहे.मार्च अर्था संपला तरी कापसाचा भाव आठ हजारांजवळ गेलाच नाही. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी या वर्षी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. हाती आलेल्या कापसाला चांगला भाव मिळेल, या अपेक्षेने चार महिन्यांपासून कापूस घरात ठेवला. मात्र, मार्च महिना अर्धा झाला तरी दरवाढ होत नसल्याने कापसाच्या दरवाढीची आशा मावळली आहे. कापसाने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. या सर्व परिस्थितीचा फायदा खासगी व्यापारी उचलत आहे. कारण अनेक शेतकऱ्यांना पैशांची प्रचंड निकड असल्यामुळे ते खासगीतही कापस विकत आहेत.

मातंग समाजाला उपवर्गीकरण लागू करा : लहुजी शक्ती सेनेचे निवेदन!

पुसद - आज दिनांक 16 मार्च 2026 रोजी मातंग समाजाला अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण तात्काळ लागू करण्याच्या मागणीसाठी उपविभागीय अधिकारी पुसद यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लहुजी शक्ती सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले सदर निवेदन देता वेळेस लहुजी शक्ती सेना जिल्हा कोर कमिटी जिल्हा अध्यक्ष दर्शन जोगदंडे जिल्हा संघटक मनोज गजभार तालुका कार्याध्यक्ष राहुल हिवाळे तालुका सहसरचिटणीस सुनील दोडके रवी नेटके विशाल पतंगे अमोल जोगदंडे रोहित पवार अजय पवार अनिल दोडके विजय पवार बबलू पवार पवन भालेराव शिवम भालेराव मंगल दोडके तसेच लहुजी शक्तीचे ईतर पदाधिकारी यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले.

कर्जमुक्तीची घोषणा केली, मात्र राष्ट्रीयकृत बँकांचा शेतक-यांमागे कर्ज वसुलीचा तगादा सुरूच : शेतकरी नेते मनीष जाधव!

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - राज्य सरकारने अर्थसंकल्प अधिवेशनात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी "पुण्यश्लोक अहिल्याबाई देवी होळकर शेतकरी कर्जमुक्त योजना" जाहीर केली असतांना दुसरीकडे राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्जवसुलीसाठी न्यायालयाची नोटीस पाठविल्या जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुसद व महागाव तालुक्यातील काही कर्जदार शेतकऱ्यांना लोकन्यायालयात उपस्थित राहण्याच्या नोटिस बजावण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये धास्ती निर्माण झाली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या पीककर्जदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा केली . तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचाही निर्णय जाहीर करण्यात आला . मात्र या निर्णयाची अंमलबजावणी स्पष्ट न झाल्यामुळे बँका अजूनही कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांवर दबाव टाकत असल्याचा आरोप

शेतकरी संघटनांनी केला आहे.

पुसद व महागाव तालुक्यातील काही शेतकऱ्यांना दिवाणी न्यायालयामार्फत नोटिस पाठविण्यात आल्या असून लोकन्यायालयात सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यात आरेगाव मोहा ता. पुसद येथील ज्योतिबाराव दतराव राऊत, कातरवाडी ता. महागाव येथील शैलेश नामदेव राठोड व आत्माराम नंदू पवार या शेतकऱ्यांचा समावेश आहे. कर्जमाफीची घोषणा झाल्यानंतरही अशा प्रकारे न्यायालयाच्या माध्यमातून वसुलीचा तगादा लावण्यात आल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते मनीष जाधव यांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, सततची नापिकी, नैसर्गिक आपत्ती,

> कर्जमुक्तीची घोषणा करूनही बँकांकडून न्यायालयाच्या नोटिस पाठविल्या जात आहेत. आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर ही पठाणी वसुली आहे. शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून ही कारवाई थांबवली पाहिजे नाही तर आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल.
> **– मनीष जाधव, शेतकरी नेते**

वन्यजीवांचा त्रास, वाढता उत्पादन खर्च आणि शेतमालाला मिळत नसलेले भाव यामुळे शेती आधीच तोट्याची झाली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर कर्जाचा बोजा वाढत असून शासनाने कर्जमुक्तीची घोषणा करूनही बँकांकडून वसुली सुरू असल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संभ्रम निर्माण झाला आहे. कर्जमाफीची घोषणा झाल्यानंतरही राष्ट्रीयकृत बँका लोकन्यायालयात केसेस दाखल करत असतील तर शासन व प्रशासन यांच्यात समन्वय नसल्याचे स्पष्ट होते.

• वेचक

पांढरकवडा आयुष्मान आरोग्य मंदिरात डॉक्टरांची कमतरता

पांढरकवडा - शहरातील स्व. वसंतराव नाईक चौक परिसरात असलेल्या आयुष्मान आरोग्य मंदिरात अनेक दिवसांपासून डॉक्टरांचे पद रिक्त असल्यामुळे स्थानिक नागरिकांना आरोग्य सेवांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. डॉक्टरांची तीव्र कमतरता तसेच अपुऱ्या साधनसामग्रीमुळे पांढरकवडा शहरातील आरोग्य सेवा गंभीर संकटात सापडली असल्याचे चित्र दिसून येत आहे. सध्या या आरोग्य केंद्रात डॉक्टर नसल्यामुळे उपचाराची जबाबदारी परिचारिका व आशा सेविकांवरच अवलंबून राहिली आहे. त्यामुळे रुग्णांना योग्य वेळी व योग्य उपचार मिळण्यात अडथळे निर्माण होत असून नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आयुष्मान आरोग्य मंदिरात तातडीने डॉक्टरांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. याबाबत महाराष्ट्र राज्याचे आरोग्यमंत्री मा. प्रकाश आबिटकर यांना निवेदन पाठविण्यात आले असून, त्याची प्रत केळापूरचे तहसीलदार व दंडाधिकारी यांच्यामार्फत देण्यात आली आहे. पांढरकवडा शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता शासनाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन डॉक्टरांची नियुक्ती करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

श्री स्वामी समर्थ केंद्र सप्तगिरी नगर परिसरात श्रमदानाने स्वच्छता अभियान

पुसद - परम पूज्य गुरु माऊली यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्री स्वामी समर्थ केंद्र,श्री स्वामी समर्थ योग वर्ग ,श्री सप्तशृंगी दुर्गा उत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि 15/03/2026 ला श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरातील स्वच्छतेसाठी श्रमदानाचे आयोजन केले होते. स्वच्छ, सुंदर परिसरासाठी व सुजाण नागरिकत्वाची जबाबदारी पार पाडण्याकरिता यापुढेही दर रविवारी श्रमदानाने स्वच्छता अभियान राबवण्याचा संकल्प सर्व उपस्थितांनी केला. श्री स्वामी समर्थ केंद्राचे सुनील कनवाळे, स्वप्नील देशमुख,विजय राठोड, राजेश लांडे, संजय वाकडे,अनिल राठोड, गणेशराव गावंडे,मुकुंद रायपूरकर, ॲड जीवन नरसिंग, योगगुरु श्रीधर झरकर, योग वर्गाचे सर्व सदस्य तथा प्रभागातील नागरिक तसेच लहान मुलांनी देखील मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. श्री स्वामी समर्थ मंदिराच्या वतीने अनेक धार्मिक तथा सामाजिक कार्य सातत्याने करण्यात येत असल्यामुळे परिसरातील सर्व नागरिक आनंद व्यक्त करत उपक्रमात भाग घेत आहेत.

कनिष्ठ सहायक ७४ हजारांची लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात

यवतमाळ - लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवारी (दि. १६ मार्च) केलेल्या सापळा कारवाईत पंचायत समिती दारव्हा येथील कनिष्ठ सहायकाला ७४ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. या कारवाईमुळे पंचायत समिती परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी लोकसेवक अफरोज खान कलीम खान पठाण (वय ४४), पद कनिष्ठ सहायक, आस्थापना व सामान्य प्रशासन विभाग, पंचायत समिती दारव्हा (वर्ग-३) यांनी तक्रारदाराकडून लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांच्या ८७ वर्षीय आजीला ८० वर्षांनंतर मिळणाऱ्या वाढीव पेन्शनसाठी आधार कार्ड, पॅनकार्ड व अर्ज पंचायत समिती कार्यालयात सादर करण्यात आला होता. या प्रक्रियेनंतर तक्रारदारांच्या आजीच्या खात्यावर १ लाख ७३ हजार ८७६ रुपये जमा झाले. मात्र आरोपी पठाण यांनी तक्रारदाराला फोन करून प्रत्यक्षात पेन्शन ९५ हजार रुपये असल्याचे सांगत जास्त रक्कम जमा झाल्याचे भासवले. त्यानंतर ही वाढीव पेन्शन मंजूर करून काढून दिल्याच्या मोबदल्यात ७५ हजार रुपयांची लाच मागितली. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ येथे तक्रार दाखल केली. त्यानुसार १६ मार्च रोजी पडताळणीदरम्यान आरोपीने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तडजोडीनंतर ७४ हजार रुपये स्वीकारताना एसीबीच्या पथकाने सापळा रचून आरोपीला रंगेहात पकडले. ही कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सर्चीद्र शिंदे आणि पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अर्जुन घनवट व पथकाने केली. आरोपीविरुद्ध दारव्हा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, शासकीय अधिकारी लाच मागत असल्यास नागरिकांनी एसीबी यवतमाळ कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

भूमिपूजनात प्रोटोकॉल भंग

नगरपरिषदेत भाऊशाही'चा विरोधकांचा आरोप

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड - शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये आयोजित भूमिपूजन कार्यक्रमात प्रोटोकॉलचे पालन न करता प्रशासन व संबंधित नगरसेवकांना विश्वासात न घेता कार्यक्रम पार पाडल्याचा आरोप करत विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. या संदर्भात सोमवारी (दि. १६) स्थानिक विश्रामगृह येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी निषेध नोंदवला.

भाजपचे गटनेते विजय हरडपकर, नगरसेविका ज्योत्सना प्रतिक रुडे, करुणा कुबडे, नगरसेवक सुरेंद्र कोडगिरवार, गोपाल कलाने, अमोल तिवरंगकर, भास्कर साधू, स्वीकृत नगरसेवक ॲड. विजय गुजरे, जिल्हा सरचिटणीस महेश काळेश्वरकर, डॉ. प्रतिक रुडे व पुंडलिक कुबडे उपस्थित होते. विरोधकांनी आरोप केला की, मागील तीन महिन्यांपासून मासिक सभांमध्ये विरोधी नगरसेवकांना विश्वासात न घेता केवळ बहुमताच्या जोरावर ठराव मंजूर केले जात आहेत. शहराच्या विकासाशी संबंधित विषयांवर चर्चा न करता निर्णय घेतले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच नगरपरिषदेचा अर्थसंकल्प अद्याप सादर करण्यात आला नसल्याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला. शहरातील काही विकासकामांच्या भूमिपूजनावेळी प्रशासन, संबंधित प्रभागातील नगरसेवक तसेच आमदारांना कोणतीही माहिती देण्यात आली नाही. आमदार किसन वानखेडे व भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या निधीचे श्रेय सत्ताधारी घेत असल्याचा आरोपही करण्यात आला. पाणीपुरवठा, ड्रेनेज समस्या, अतिरिक्त कर, घरकुल योजनेतील लाभार्थी निवड, भटक्या कुत्र्यांचा प्रश्न व शहरातील स्वच्छतेच्या समस्यांकडे नगरपरिषद दुर्लक्ष करत असल्याचेही विरोधी नगरसेवकांनी सांगितले.

> "भाऊंचा आदेश नसल्यास काम नाही?" नगरपरिषदेत जनहिताची कामे सांगितल्यास "भाऊंचा आदेश आल्यावरच काम करू" असे कर्मचाऱ्यांकडून सांगितले जाते, असा आरोप विरोधकांनी केला.

> "नगराध्यक्षा नाममात्र?" नगराध्यक्षांच्या केबिनमध्ये दोन स्वीकृत नगरसेवक बैठका घेताना दिसत असून नगरपरिषदेची यंत्रणा त्यांच्या नियंत्रणाखाली चालत असल्याचा आरोप पत्रकार परिषदेत करण्यात आला.

"देश अमेरिकेकडे गहाण ठेवला का?"

प्रकाश आंबेडकरांचा सरकारला जाब

23 मार्चला नागपूर येथे आरएसएस मुख्यालयावर मोर्चा

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत केंद्र सरकारच्या परराष्ट्र व आर्थिक धोरणांवर जोरदार टीका करत "देश अमेरिकेकडे गहाण ठेवला का?"असा सवाल उपस्थित केला.२३ मार्च रोजी नागपूर येथील रेशीमबाग मधील आरएसएस मुख्यालयासमोर भव्य मोर्चा व धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा केली. आंबेडकर म्हणाले की, मुंबईत भाजपविरोधी पक्षांची बैठक झाली होती.

या बैठकीला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, डावे पक्ष तसेच १२ ते १३ सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेसोबत केलेल्या करारनाम्याबाबत चर्चा झाली. संसदेत या करारातील केवळ एका मुद्द्यावर चर्चा झाली, मात्र कृषी बाजारपेठ व परराष्ट्र धोरणाशी संबंधित इतर महत्त्वाच्या

मुद्द्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले, असा आरोप त्यांनी केला.भारताचे परराष्ट्र धोरण अमेरिकेच्या प्रभावाखाली जात असल्याचा आरोप करत आंबेडकर म्हणाले की, यामुळे रशियाकडून कच्चे तेल घेण्यावरही मर्यादा येत आहेत. त्याचबरोबर अमेरिकेकडून येणाऱ्या वस्तूंवर 'झिरो टेरिफ' तर भारतातून जाणाऱ्या मालावर १८ टक्के शुल्क आकारले जात आहे. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था आणि स्वायत्तता धोक्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. युद्धस्थिती आणि बदलत्या आंतरराष्ट्रीय समीकरणांमुळे देशात गॅस तसेच सल्फरच्या तुटवड्याची शक्यता निर्माण झाली असून त्याचा थेट परिणाम शेतीवर होऊ शकतो. असा इशाराही त्यांनी दिला. "नरेंद्र मोदी एकेकाळी 'मुद्रा मोदी' होते. मात्र आता ते 'मुजरा मोदी' झाले आहेत," अशी खोचक टीकाही त्यांनी केली. भारताच्या सार्वभौमतेच्या सुरक्षेच्या दृष्टीने नरेंद्र मोदी हे पंतप्रधान पदासाठी योग्य व्यक्ती नाहीत, असे म्हणत त्यांच्या नावाचा 'एपस्टीन फाईल'मध्ये उल्लेख होत असल्याची चर्चा देशासाठी लज्जास्पद असल्याचा आरोपही त्यांनी केला. अशा परिस्थितीत आरएसएसने हस्तक्षेप करून नरेंद्र मोदी यांना पदावरून हटवावे, अशी मागणी त्यांनी केली. या आंदोलनात सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आंबेडकर यांनी केले. पत्रकार परिषदेला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे, पश्चिम जिल्हाध्यक्ष डी. के. दामोदर, नगरसेविका मीरा वीर, घाटंजी तालुकाध्यक्ष संघपाल कांबळे, तसेच मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

काळी (दौ.) येथील समाधान शिबिरात एकाच दिवशी २८०० लाभार्थ्यांना मिळाला लाभ शिबिर ठरली यशस्वी

जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियान – टप्पा १' अंतर्गत महागाव तालुक्यातील काळी (दौलत) ग्रामपंचायत येथे आयोजित करण्यात आलेले समाधान शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरीत्या पार पडले. नागरिकांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या या शिबिरात सुमारे ३२०० नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला, तर त्यापैकी २८०० नागरिकांना विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला.

या शिबिराच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार अभय मस्के होते. यावेळी नायब तहसीलदार गजानन पराते, वनपरिक्षेत्र अधिकारी सम्राट मेश्राम, मंडळ अधिकारी गोविंद ठाकरे, सचिन फटाले

यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिरादरम्यान महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित फेरफार प्रकरणे, ७/१२ व ८अ उताऱ्यांतील त्रुटी दुरुस्ती, अभिलेख दुरुस्ती आदी कामांसह उत्पन्न, रहिवासी, जात व क्रीमीलेअर प्रमाणपत्रे, विविध सामाजिक योजना तसेच इतर शासकीय सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. 'वन डे सर्व्हिस'च्या माध्यमातून अनेक नागरिकांच्या समस्या त्याच दिवशी मार्गी लागल्याने शिबिरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी अध्यक्षीय भाषणात तहसीलदार अभय मस्के यांनी नागरिकांनी शिबिराला दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले.

शासनाच्या विविध योजना थेट नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांच्या समस्या तात्काळ सोडविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासनाने केलेल्या प्रयत्नांमुळे अनेक नागरिकांची कामे तत्काळ मार्गी लागल्याने उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात समाधान व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले. या शिबिरामुळे शासनाच्या सेवांचा लाभ नागरिकांपर्यंत अधिक जलद आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेल्याची भावना उपस्थितांमधून व्यक्त होत होती.

जवळगावच्या आचल आमटेचा शैक्षणिक यशाने मातंग समाजाचा गौरव

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - नेर तालुक्यातील जवळगाव येथील आचल संजय आमटे हिने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून बॅचलर ऑफ कॉम्प्युटर एप्लिकेशन (BCA) या अभ्यासक्रमात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे केवळ कुटुंबच नव्हे तर संपूर्ण मातंग समाजात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत आचलने हे यश मिळवले आहे. तिचे वडील संजय आमटे हे जवळगाव येथील मातंग समाजातील परिचित सामाजिक कार्यकर्ते आहेत. एका पायाने अपंगत्व असतानाही त्यांनी तरुणपणापासून समाजकार्याची धुरा सांभाळत मातंग समाजाच्या उन्नतीसाठी सातत्याने कार्य केले आहे. शासनाच्या विविध योजना समाजातील गरजू व गोरगरिबांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी

निस्वार्थपणे प्रयत्न केले आहेत. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीतही संजय आमटे यांनी आपल्या मुलीला उच्च शिक्षण देण्याचा ध्यास घेतला. सामाजिक, धार्मिक व राजकीय घडामोडींमध्येही त्यांचे मोलाचे योगदान राहिले असून गावात अनेक समाजोपयोगी उपक्रम ते नियमितपणे राबवित असतात. गरिबीची परिस्थिती असतानाही आपल्या मुलांना उच्च शिक्षण देण्याचा त्यांचा निर्धार कायम आहे. शिवाजी महाराज, लहुजी वस्ताद, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा प्रभाव आमटे कुटुंबावर असून हे विचार समाजात रुजविण्याचे कार्य ते सातत्याने करीत असतात. स्वतः अपंगत्वावर मात करत समाजकार्य करत असल्याने त्यांनी अनेक युवकांना प्रेरणा दिली आहे. "मी अपंग असूनही समाजासाठी काम करू शकतो, तर इतरांनीही पुढे यावे," असा प्रेरणादायी संदेश त्यांनी समाजाला दिला आहे. आचल आमटे हिच्या या यशामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळणार असून तिचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ग्रामीण भागातील मुलांनी जिद्दीने शिक्षणात पुढे यावे, असा संदेश या यशातून मिळत आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्ह्यातील विविध समाज संघटनांकडून तिचा गौरव व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, कु. आचल आमटे हिला पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी कुटुंबीय व समाजातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

महागाव येथे १९ ते २६ मार्च दरम्यान संगीतमय श्रीरामकथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - येथील जुने श्री हनुमान मंदिर संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही संगीतमय श्रीरामकथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा धार्मिक सोहळा दि. १९ मार्च ते २६ मार्च २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिभावात पार पडणार आहे.

महान तपस्वी संत तुळसीबन महाराज व प.पू. माधवानंद महाराज यांच्या कृपाशिर्वादाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन आयोजक समितीतर्फे करण्यात आले आहे. या सोहळ्यात ह.भ.प. विमुदास महाराज (वाशिमकर) यांच्या सुश्राव्य व प्रेरणादायी वाणीमधून श्रीरामकथेचे प्रवचन होणार आहे. दररोज सकाळी ५ ते ६ या वेळेत काकडा, सकाळी ७.३० ते १० या वेळेत ज्ञानेश्वरी पारायण होणार आहे. दुपारी १.३० ते ४.३० या वेळेत घटस्थापना व अभिषेक सोहळा अनिल गाडे महाराज यांच्या हस्ते पार पडणार आहे. सायंकाळी ६ वाजता हरिपाठ तर रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत हरिकीर्तन व जागर आयोजित करण्यात आले आहे. या आठवडाभर चालणाऱ्या सोहळ्यात विविध कीर्तनकार व प्रवचनकार सहभागी होणार आहेत. दि. १९ मार्च रोजी ह.भ.प. शंकर महाराज (बाभळी) यांचे कीर्तन होणार असून गायनासाठी राजू रामराण बरवाडे सहभागी होतील.

२० मार्च रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज निवळेकर, दि. २१ मार्च रोजी ह.भ.प. वेणुताई पाटील (रिसोडकर), दि. २२ मार्च रोजी ह.भ.प. प्रभु महाराज (गोभणी), दि. २३ मार्च रोजी ह.भ.प. काकडे महाराज (वाशिम), दि. २४ मार्च रोजी ह.भ.प. विजय महाराज (करंजी) तसेच दि. २५ मार्च रोजी ह.भ.प. अरविंद महाराज (सोनखेड, नांदेड) यांचे कीर्तन व प्रवचन होणार आहे. समारोपाच्या दिवशी दि. २६ मार्च रोजी ह.भ.प. विष्णुदास महाराज (वाशिमकर) यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

आंतरराष्ट्रीय मानव अधिकार असोसिएशन

आर्णी तालुका अध्यक्षपदी रफिक सरकार यांची नियुक्ती

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : आंतरराष्ट्रीय मानव अधिकार असोसिएशन, नवी दिल्लीच्या विदर्भातील संघटन विस्ताराच्या पार्श्वभूमीवर आर्णी तालुका अध्यक्षपदी रफिक सरकार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यवतमाळ जिल्हाध्यक्ष विवेक वानखडे व सहकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ही निवड करण्यात आली असून मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

नियुक्तीनंतर रफिक सरकार यांना तालुका अध्यक्ष म्हणून संघटनात्मक कामकाज तात्काळ सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय मानव अधिकार असोसिएशनच्या माध्यमातून अधिकाधिक सदस्य नोंदणी करून संघटनेचा विस्तार करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. यावेळी मान्यवरांनी सांगितले की, पुढील काळात मानवाधिकारांचे संवर्धन, समाजातील वंचित व गरजू घटकांना कायदेशीर मदत, योग्य मार्गदर्शन आणि त्यांच्या हक्कांसाठी प्रभावी लढा देण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून करण्यात येईल. या कार्यात तालुका स्तरावर रफिक सरकार सक्रिय भूमिका बजावतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. विदर्भातून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे मानवाधिकार जनजागृती आणि सामाजिक न्यायासाठी संघटनेचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात वाढेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. दरम्यान, आंतरराष्ट्रीय मानव अधिकार असोसिएशनमध्ये कार्य करण्यासाठी इच्छुक उमेदवारांची नोंदणी सुरू असून इच्छुकांनी जिल्हाध्यक्षांशी संपर्क साधून सदस्यत्व घ्यावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

आदिवासी टायगर सेनेची बैठक

जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - आदिवासी टायगर सेना यवतमाळ जिल्ह्याची कार्यकर्ता बैठक दि. १५ मार्च रोज रविवारीला दुपारी १ वाजता घाटंजी शासकीय विश्राम गृह येथे उत्साहात पार पडली. या बैठकीस संघटनेचे विदर्भ उपाध्यक्ष रमेशजी धुर्वे, जिल्हाध्यक्ष बंडू भाऊ तोडसाम, जिल्हा महासचिव अमोल कुमरे तसेच महिला जिल्हाध्यक्ष वैशाली केराम यांची प्रमुख उपस्थिती होती

बैठकीत संघटनेच्या विस्तारासंदर्भात चर्चा करून विविध पदांवर नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी जिल्हा युवा अध्यक्षपदी अंबादास मेश्राम यांची निवड करण्यात आली. तसेच जिल्हा युवा उपाध्यक्षपदी विजय कनाके यांची नियुक्ती करण्यात आली. वणी तालुका अध्यक्षपदी लहानू सालुरकर तर तालुका सचिवपदी महेश आत्राम यांची निवड करण्यात आली.

मारेगाव तालुका अध्यक्षपदी विवेक तोडासे, आर्णी तालुका अध्यक्षपदी श्रीराम मेश्राम, घाटंजी तालुका अध्यक्षपदी कमलाकर नेहारे, तालुका सचिवपदी किशोर कोवे तसेच जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी निलेश करमरकर यांची नियुक्ती करून मान्यवरांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी संघटनेचे ध्येय व धोरण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी तन-मनाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय कनाके यांनी केले तर आभार प्रदर्शन महेश आत्राम यांनी मानले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संत्रा झाडाला रात्री पाणी देऊनही फळगळती सुरूच

कुऱ्हा/वार्ताहर

दिवसेंदिवस तापमानाचा पारा चाळिशीपर्यंत पोहचल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटकाच बसला आहे. उन्हामुळे फळांना चट्टे पडत असून, फळगळती वाढली आहे. झाडावरच संत्रा फळे पिवळी होताना दिसत आहे. तसेच सर्व तज्ञांच्या सल्ल्यानुसार संत्रा झाडाला १७० लिटर पाणी देऊन सुद्धा संत्रा फळे झाडावर पिवळी होत आहे.सर्वात मोठी फळगळ यावर्षी मार्च महिन्यात पहायला मिळत आहे.त्यामुळे कुऱ्हा मंडळातील शेतकरी हवालदिल झाला आहे.त्याचा थेट परिणाम संत्रा उत्पादनावर होत आहे. सर्व उपयोजना करून सुद्धा झाडांची क्षमता फारसी दिसत नाही आहे.

मार्च महिन्याच्या मध्यात तापमानाचा पारा ४० अंशांपर्यंत पोहचला आहे.चार दिवसांत तापमानाने उसळी घेतली आहे.अजून एप्रिल, मे, जून महिना बाकी आहे. तसेच मराठी महिन्यानुसार अधिक मास मे आणि जून महिन्यात येत असल्याने पावसाळा हा

लांबण्याची शक्यता नाकारता येत नाही.आणि खरीप हंगाम पेरणी काळ जुलै महिन्यात सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बदलत्या हवामानाचा संत्रा फळबागांना फटका बसला आहे.विदर्भात संत्रा फळांचे मोठे क्षेत्र आहे. वाढत्या उन्हामुळे संत्रा फळांची गळ होणे, फळे भाजणे आणि फळांच्या गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होणे अशा समस्या आहेत. उष्णतेमुळे फळे गळून पडत आहेत. तज्ञांच्या माहितीनुसार किमान ३२ अंश सेल्सिअसपर्यंत तापमानात लहान फळे तग धरतात. मात्र,३५ अंशाच्या पुढे तापमान गेल्यामुळे फळगळती वाढली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जैवविविधता नष्ट करणे, झाडांची कत्तल, सिमेंट रस्ते जास्त प्रमाणात बांधकाम,कीटकनाशके आणि तणनाशके यांचा भरपूर वापर करणे आणि रासायनिक खतांचा अती बेसुमार वापर करणे होय.

यंदा निसर्ग लहरीपणामुळे संत्र्याला फूट कमी आहे. कमी फळधारणांमुळे संत्रा उत्पादक शेतकरी हवालदिल आहेत. तापमान बदलामुळे फळे टिकविण्याचे आव्हान निर्माण झाले. पण सर्व उपाययोजना करून फळे टिकतील का एप्रिल महिन्यात ही चिंता वाटू लागली आहे. तापमानामुळे लहान फळांची गळ होत आहे. तापमान रोखल्यास लहान फळांमध्ये तापमान सहन करण्याची ताकद येते, असा सल्ला कृषितज्ज्ञांनी दिला आहे. वाढत्या उन्हामुळे दरवर्षी संत्र्याचे नुकसान होत आहे. शासन स्तरावर उपयोजना होऊन आर्थिक मदत मिळावी असे आव्हान कुऱ्हा येथील एकजूट शेतकरी संघटना करत आहे.

गौरी वाढोणकर जगातील कमी वयाची भविष्यकार

छत्रपती संभाजीनगर-टॅरो कार्ड रीडिंग, अंकशास्त्र (न्युमरोलॉजी), रेकी व हिलिंग या आध्यात्मिक व भविष्यविषयक क्षेत्रात कमी वयात उल्लेखनीय प्राविण्य मिळवून गौरी गजेंद्र वाढोणकर यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये त्यांची जगातील सर्वात कमी वयाची भविष्यकार म्हणून नोंद करण्यात आली आहे.

टॅरो कार्ड रीडिंगचे प्राथमिक शिक्षण त्यांनी लंडन येथे घेतले असून त्यानंतर या विषयाचा सखोल अभ्यास पुणे येथे पूर्ण केला आहे. तसेच अंकशास्त्राचे (न्युमरोलॉजी) शिक्षण कॅनडा येथे सुरू करून त्याचा पुढील अभ्यासही पुणे येथे पूर्ण केला आहे. याशिवाय रेकी व हिलिंग या उपचार पद्धतीचेही त्यांनी प्रशिक्षण घेतले असून कमी वयात या विविध शाखांमध्ये त्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे.याचबरोबर गौरी वाढोणकर आणि डॉ. गजेंद्र सूर्यकांत वाढोणकर यांना त्यांच्या कार्याची दखल घेत आंतरराष्ट्रीय संस्थेकडून दिल्ली येथे डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे.गौरी वाढोणकर आणि डॉ. गजेंद्र सूर्यकांत वाढोणकर यांच्या सन्मानार्थ भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.हा कार्यक्रम हॉटेल सत्कार प्युअर व्हेज एसी, देवगिरी बँक शेजारी, जाधववाडी सिग्नल चौक, जळगाव रोड, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे.

थकबाकीदार ग्राहकांकडे लागणार स्मार्ट मीटर

पुनर्जोडणी शुल्कासह थकबाकी भरल्यावरच वीज पुरवठा होणार सुरू

अमरावती/का.प्र.

महावितरणने वीज बिल वसुली मोहिमेला गती दिली असून थकबाकीदार वीज ग्राहकांवर कठोर कारवाई सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत थकबाकीदार ग्राहकांचे थेट वीज मीटर काढण्यात येत आहे. कारवाईनंतर खंडित करण्यात आलेला वीज पुरवठा पुनर्जोडणी शुल्कासह १०० टक्के थकबाकी भरल्यानंतरच सुरू करण्यात येणार आहे. तसेच थकबाकीसाठी काढण्यात आलेल्या मीटरच्या ठिकाणी प्राधान्याने स्मार्ट मीटर बसविण्याचे निर्देश मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिले आहेत.

आर्थिक वर्ष संपण्यास अवघे १५ दिवस शिल्लक असताना अमरावती परिमंडळातील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील सुमारे ३ लाख वीज ग्राहकांकडे सुमारे ६०० कोटी रुपयांची थकबाकी आहे. त्यामुळे महावितरणने वीज बिल वसुलीसाठी आक्रमक भूमिका घेतली असून, थकबाकी न भरल्यास थेट वीज मीटर काढून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

थकबाकीमुळे मीटर काढल्यानंतर काही ग्राहकांकडून शेजाऱ्यांकडून अनधिकृत वीज पुरवठा घेण्याचे प्रकार आढळत असल्याने महावितरणने याबाबत कठोर इशारा दिला आहे. अशा प्रकारे वीज घेणे किंवा देणे हे विद्युत कायदा २००३ अंतर्गत गुन्हा असून संबंधित ग्राहकांसह अनधिकृतपणे वीज देणाऱ्या शेजाऱ्यांवरही गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

अनधिकृत वीज वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी महावितरणच्या भरारी पथकांकडून आता रात्रीच्या गस्तीमध्ये वाढ करण्यात येणार आहे. या दरम्यान अनाधिकृत वीज वापर आढळल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल. वीज चोरी हा फौजदारी गुन्हा असून या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते, असे महावितरणने स्पष्ट केले आहे.

वीजबिल वसुली मोहिमेत ग्राहकांनी थकबाकी भरून सहकार्य करावे, तसेच भरारी पथकांच्या कारवाईदरम्यान शासकीय कामात अडथळा आणू नये. अन्यथा शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी क्षेत्रीय कार्यालयांना दिले आहेत.

डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय लोक अदालतमध्ये सहभाग

ब्राह्मणवाडा थडी/वार्ताहर

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावती व जिल्हा न्यायालय अमरावती यांच्यातर्फे आयोजित राष्ट्रीय लोक अदालत पार पडली. या राष्ट्रीय लोक अदालत च्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रभारी प्रमुख न्यायाधीश आर. जी.वाघमारे,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावतीचे सचिव डी. एस. वामणे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वर्षा एन. देशमुख,जिल्हा बार असोसिएशन चे अध्यक्ष अँड.सुनील देशमुख, मुख्य सरकारी वकील अँड. परीक्षेत गणोरकर, अमरावतीचे पोलीस उपायुक्त गणेश शिंदे उपस्थित होते.

राष्ट्रीय लोक अदालत मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लोक अदालत वर पथनाट्य सादर करून लोक अदालत चे महत्त्व पटवून दिले. या राष्ट्रीय लोक अदालतमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे एलएलबी तीन वर्षीय चौथे व सहावे सेमिस्टर तसेच एलएलबी पाच वर्षीय आठवे व दहावे सेमिस्टर चे मिळून ४९५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.लोक अदालत मध्ये महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. नंदकिशोर के. रामटेके विभाग प्रमुख, एलएलबी तीन वर्षीय अभ्यासक्रम,प्रा. कीर्तीराज सावळे, प्रा.डॉ. कीर्ती मालपाणी,डॉ. प्रा. लक्ष्मी परिहार,प्रा. संदीप वानखेडे,प्रा. उज्वल मानकर, प्रा. वैशाली तिडके,प्रा.अन्युक्ती कीर्तिकर मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

श्रीमती नरसम्मा महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनी

अमरावती/का.प्र.

श्रीमती नरसम्मा कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,किरण नगर येथे तीन दिवसीय ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथ प्रदर्शनी ही ग्रंथालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली होती. ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन सीमा बेहेरे तसेच अनिता व्यवहारे,प्राचार्य डॉक्टर राजेश चंदनपाट यांनी केले. ग्रंथ प्रदर्शनी उद्घाटनाच्या वेळी डॉ. राजश्री रायभोग,डॉ. माधुरी चिखलकर,डॉ. खापर, प्रा. प्रचंड, प्रा. सिंगई , प्रा. ममता पोहकर,प्रा. पूजा खरपे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, ग्रंथालय विभागातील ग्रंथपाल डॉ. स्मिता सूर्यवंशी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथ प्रदर्शनीत ४६६ पुस्तकांचे ठेवण्यात आले होते.

ग्रंथ प्रदर्शनी भरवण्यामागचा उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांना नवनवीन पुस्तके प्रकाशित होतात, त्याबद्दल माहिती व्हावी. ग्रंथ प्रदर्शनीत एमपीएससी,यूपीएससी तसेच MCA, MBA, एंट्रन्सस एक्झाम व वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा, यांचे पुस्तके ठेवण्यात आले होते. ऑनलाइनच्या जगात प्रिंट पुस्तकांचे महत्त्व किती आहे. विद्यार्थ्यांनी पुस्तके हाताळावेत,पहावेत, प्रत्यक्षदर्शी पुस्तके पाहतांना,त्यातील माहिती आपल्याला किती उपयोगाची आहे हे त्यांच्या लक्षात येते. प्रदर्शनी भरणा मागचा हाच उद्देश आहे की विद्यार्थ्यांनी पुस्तके पहावेत,हाताळावे व पुस्तकातील माहिती आपल्या किती उपयोगाची आहे हे त्यांच्या लक्षात येते. ग्रंथ प्रदर्शनी भरवल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते. ग्रंथ प्रदर्शनीला मोठ्या संख्येने विद्यार्थी तसेच प्राध्यापक वृंद, तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी भेट दिली. ग्रंथप्रदर्शनी भरविण्यासाठी,श्री नवनीत बुक डेपो, गांधी चौक अमरावती यांचे सहकार्य मिळाले. ग्रंथ प्रदर्शनी भरवण्यासाठी प्रवीण भोंगाडे व अर्चना रेचे यांनी परिश्रम घेतले.

बांधकाम आणि पाणीपुरवठा अभियंत्याच्या ढिसाळ कारभारामुळे वाहन चालक त्रस्त

अचलपूर/वार्ताहर

गेल्या दोन वर्षात अचलपूर शहरातील देवडी येथील मुख्य रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट काँक्रीटीकरणच्या कामाला अर्ध्यातच ब्रेक लागला आहे .यामुळे या रस्त्यावर जागोजागी खड्डे आल्याने वाहन चालक त्रस्त झाले आहे.मुख्य रस्त्यावर दुचाकी,चारचाकी ,जड वाहनाची रेलचेल असत.दुरावस्था झाली आहे.यामुळे रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम तत्काळ सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

दुसरीकडे अचलपूर शहरातील अनेक भागात उन्हाळ्यात पाणी टंचाई चा समस्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहे. पिण्याचे पाण्याची व्यवस्था करण्यासाठी नागरिकांना वणवण फिरावे लागत आहे.मात्र त्या भागात कोणती ही पर्यायी व्यवस्था न करता अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आलेली नाही.देवडी मुख्य रस्त्यावरील अचलपूर नगर परिषद बांधकाम विभाग व पाणीपुरवठा विभाग या दोन्ही विभागाचे पदभार असणाऱ्या अभियंत्याचा ढिसाळ कारभारामुळे वाहन चालक त्रस्त झाले आहे. देवडी मुख्य रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम थंडबस्त्यात असल्याने हे काम कधी सुरू होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.आणि दुसरीकडे अनेक भागात उन्हाळ्यात पाणी टंचाई असताना अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाकडून कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता येथील रस्त्यांच्या खड्ड्यावर अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाकडून टँकरने पाणी सोडले जात आहे .यामुळे देवडी मुख्य रस्त्याची दुरावस्था असताना त्या रस्त्याचा कायापालटासाठी कोणतीही कारवाई अचलपूर नगर परिषद बांधकामा विभागाकडून करण्यात आली नाही. ऐन उन्हाळ्यात मात्र त्या रस्त्यावरील खड्डे मधील मातीवर टँकर द्वारे पाणी सोडले जात असल्याने नागरिकांनी रोष व्यक्त केला आहे.

शहरातील देवडी येथील मुख्य रस्ता आहे.या रस्तावर शासकीय रुग्णालय ,कार्यालय ,खाजगी बँक ,व्यापार संकुल ,शाळा ,महाविद्यालय असल्याने नागरिक ,शेतकरी ,विद्यार्थी वर्गाची मोठी गर्दी असते .यामुळे शासनाकडून या रस्त्याचा कायापालट साठी कोट्यवधी रुपयांचा निधी गेल्या दोन वर्षापूर्वी मंजूर झाला होता . यानंतर या रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा नावावर अनेक दुकानदाराचे दुकानसमोरील ओटे, शेड,पायऱ्या जेसीबी द्वारे तोडण्यात आल्या.या उलट अचलपूर शहरात अनेक भागात पाणी टंचाई चा समस्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहे.दुसरीकडे या भागात पर्यायी व्यवस्था न करता अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाकडून टँकर द्वारे देवडी रस्त्यावरील खड्डे मध्ये माती दाबण्या साठी पाणी सोडले जात आहे .यामुळे नागरिकात तीव्ररोष व्यक्त होत आहे. यामुळे अचलपूर नगर परिषद बांधकाम आणि पाणीपुरवठा या दोन्ही विभागाचे पदभार असलेल्या एका अभियंत्याच्या भोंगळ कारभाराचा फटका नागरिकांना सहन करावा लागत आहे.

संक्षिप्त

डॉ. राजेश उमाळे आकाशवाणीचे बी- हाय श्रेणी गज़लगायक

अमरावती- लोकप्रिय गायक आणि संगीतकार गज़लरत्न डॉ. राजेश उमाळे यांची निवड नागपूर आकाशवाणीच्या सुगम संगीतातील गज़ल या प्रकारातील बी- हाय ग्रेडचे कलाकार म्हणून झाला आहे.आधीच्या बी- ग्रेड श्रेणीवरून पुढे जात ते बी- हाय ग्रेड श्रेणीमध्ये गेले आहेत. केंद्रीय ऑडिशन बोर्डद्वारे नुकत्याच घेण्यात आलेल्या ऑडिशनमधून त्यांची निवड बी- हाय ग्रेड श्रेणीमध्ये झाली आहे. डॉ. राजेश उमाळे हे गेल्या ३५ वर्षांपासून संगीतक्षेत्राला सुपरिचित असून देशभरात तसेच दुबई, ओमान, मस्कत, अबुधाबी अशा देशात त्यांच्या गीत आणि गज़ल गायकीच्या मैफिली गाजलेल्या आहेत.'गणू' या मराठी चित्रपटाची गाणी त्यांनी स्वरबद्ध केली असून त्यासाठी त्यांना चित्रपट महामंडळाच्या अंबरनाथ मराठी चित्रपट महोत्सवात नॉमिनेशन देखील होते. त्यांच्या संगीत दिग्दर्शनात सुरेश वाडकर, रवींद्र साठे, उत्तरा केळकर, साधना सरगम, ऋषिकेश रानडे, आदर्श शिंदे अशा लोकप्रिय गायकांनी गाणी गायली आहेत. राष्ट्रपती भवनातनी त्यांना गज़ल गायनासाठी निमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या संगीत क्षेत्रातील कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. मराठी गज़ल गायकीतील एक आश्वासक सूर म्हणून डॉ. राजेश उमाळे त्यांची ख्याती आहे. मराठी गज़लगायकी या विषयात ते पीएच. डी. असून दर्यापूर येथील जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल बोडखे व सर्व प्राध्यापक वृंद यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

आंतर विद्यापीठ खो-खो (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

अमरावती-स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे २ ते ०६ एप्रिल, २०२६ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ खो-खो (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.चमूंमध्ये श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा भूषण गेडाम, कुणाल शिखरे, यश सदांशिव, कौशिक गेहलोत व प्रथमेश माहोरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदराचा रोहण बरकरे, आदित्य राऊत, सुबोध धंदर व राधेय अकर्ते, स्व. एन.ए. देशमुख महाविद्यालय, चांदुरबाजारचा मयुर खंडारे, स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय, नांदगांव पेठचा अंकुश शिरसाट, इंदिरा गांधी कला महाविद्यालय, राळेगांवचा ओम देशमुख व तेजस भालेराव, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूरचा सुफियान खान पठाण व रोहण मेश्राम, महात्मा फुले महाविद्यालय, अमरावतीचा आदित्य नागदिवे, कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकळचा आयुष बोरखडे, कला महाविद्यालय, बुलडाणाचा ज्ञानेश्वर चिमकुरे, आर.ए. महाविद्यालय, वाशिमचा साहील राऊत आणि जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा अशोक नागले याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती येथे २१ ते ३० मार्च, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

वीर वामनराव जोशी शाळेत आरोग्य तपासणी

अमरावती - जनकल्याण सेवा संस्थाद्वारा संचालित डॉ. हेडगेवार हॉस्पिटलच्या वतीने, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाद्वारा संचालित वीर वामनराव जोशी शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क आरोग्य तपासणी शिबीर आयोजीत करण्यात आले. बालरोग तज्ञ डॉ. प्रज्ञा बनसोड आणि डॉ.वसुंधरा घोडेस्वार यांनी २ दिवसीय शिबिरात १७८ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. आयसीयुसह विविध सुविधा खाजगी हॉस्पीटलपेक्षा कमी दरात असल्याची माहिती उपस्थित विश्वस्त, शिक्षक व पालक वर्गाला देण्यात आली. शिबिरासाठी हॉस्पीटलच्या बालरोग तज्ञ डॉ. प्रज्ञा बनसोड,डॉ. वसुंधरा घोडेस्वार, वैभव इंगळे, मयुरी चौधरी, नांदापुरे,आकाश काळे,अनिता कुलकर्णी यांनी सहकार्य केले. शिबिरात उपस्थित पालकांनी डॉ. बनसोड यांची भेट घेऊन आरोग्याविषयी प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले.शिबिरासाठी मोनिका पाटील,ज्योती मडावी, सुजित खोजरे, आसावरी सोवळे, सचिन वंदे, मनिषा श्रीराव,विलास देणे,अमोल पाचपोर व चित्रा यांचे सहकार्य लाभले.

निंभा येथे धम्म परिषद व सांस्कृतिक कार्यक्रम

चांदूर रेल्वे-तालुक्यातील निंभा येथे भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल व नवयुवक पंचशील मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २० व २१ मार्च २०२६ रोजी भव्य धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. बौद्ध उपासक विचारवंत व साहित्यिकांच्या चिंतनातून धम्म चळवळ पुढे नेण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असल्याची माहिती आयोजकांनी दिली.या धम्म परिषदेच्या निमित्ताने विविध धार्मिक, वैचारिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात धम्म ध्वज वंदन आणि बुद्ध वंदना यांसह होणार असून विविध मान्यवरांच्या उपस्थितीत धम्मदेशना व व्याख्यानांचे सत्र पार पडणार आहे.परिषदेच्या मुख्य सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आध्यात्मिक धम्मक्रांतीवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या सत्रासाठी नागपूर येथील समता सैनिक दलाचे श्री. संजय गुलाबजी मनवर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच धर्मक्रांतीचे उद्देश आणि आकलन या विषयावरही मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे.यासोबतच संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.

डिजिटल शिक्षण म्हणजे देहदंड शिक्षा...

भारत डिसेंबर १९९३ मध्ये जागतिकीकरणात सामील झाला.त्यामुळे त्याचे संबंध विविध देशांसोबत होणे अनिवार्य झाले. विकसित देशाची समानता जागतिक व्हावी म्हणून विकसनशील व अविकसित देशांना विकसित देशांनी सहकार्य करावे. म्हणजे अनुदान किंवा मैत्रीपूर्ण करारातून देवाणघेवाण करावी व आर्थिक विकासाला हातभार लावावा.व्यापारसोबतच शेतीमाल व सेवा क्षेत्रात सहकार्य करण्यासाठी तसेच बौद्धिक संपदा याचा विधायक उपयोग व्हावा; ह्या हेतूने आपण भारतीय जागतिकीकरणाच्या व्याप्त बॉर्डर पर्यंत पोहचलो.

शिक्षणातून सर्व जगाचा परिचय होतो.असाच उत्तर युरोपियन देशात स्वीडन हा शिक्षणासाठी प्रगत देश म्हणून ओळखला जाणाऱ्या देशाची वर्तमानात एक घटना घडली. त्या देशाने आपल्या देशातील विद्यार्थांना जगाच्या पाठीवर विकासाची दारे मोकळी व्हावी; म्हणून दहा वर्षापूर्वी सर्व डिजिटल एज्युकेशन सिस्टीम आत्मसात केली होती.त्यामुळे शिक्षण क्षेत्रात भरारी घेण्याच्या नादात तेथील विद्यार्थ्यांना देह दंडाची शिक्षा भोगावी लागत आहे;असे चित्र दिसून आले.

स्वीडनने प्राथमिक ते माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तकांपासून पूर्ण दूर सारले होते.सर्व शिक्षण मोबाईल, लॅपटॉप, टॅब या सारख्या डिजिटल साधनांमार्फत देण्याचा निर्णय दहावर्षापूर्वी घेण्यात आला होता.या वयोगटातील मुलांमध्ये दररोज मोबाईल वापरणे,संगणकावर काम करणे,लॅपटॉप मध्ये प्रयोग करणे अशा अनेक बाबींचा समावेश केला.त्यामुळे त्याचाच सराव झाला. त्यामुळे त्यांच्या मानसिक, बौद्धिक विकासाचा स्तर घसरत राहिला. डोकेदुखी,नजर कमजोर,हातांच्या बोटांचे स्नायू कमकुवत होणे असा शारीरिक व्याधींचे प्रमाण झपाट्याने वाढून त्यांच्या बौद्धिक क्षमतेत घट व्हायला सुरुवात झाली.स्मरण शक्ती लोप पावली,सखोल विचार क्षमता संपत चालली,आपसातील नाते संबंधाची वाताहत होऊ लागली.शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील आदरभाव व शिक्षणाबद्दलचे महत्व कमी झाले.त्यामुळे स्वीडन सारख्या देशाची झोप खाडकन उडाली.

पुस्तकांपासून मुलांना दूर ठेवून डिजिटल माध्यमांचा उपयोग करून दहावर्षात देशाची प्रगती खुंटली. लॉट्टा एढोल्म(Lotta Edholm) ह्या विद्यमान शिक्षण मंत्री असलेल्या महिलेनी तत्काळ याची दखल घेतली.लगेच या घटनेवर निर्णय घेऊन नऊशे कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद केली. नव्याने पुस्तके मुलांच्या हातात देऊन वयाच्या सहावर्षापर्यंतच्या मुलांना फोन,लॅपटॉप संगणक प्रतिबंध केले. सहापेक्षा पुढील वयातील मुलांना पिसा (इर्ध्ऍ)रँकिंग द्वारे गणित, विज्ञान व वाचन यावर भर देऊन पूर्ववत अभ्यासला लागू केले.डिजिटल सिस्टिम आपत्कालीन वेळी वापरण्याची मुभा ठेऊन मुलांच्या वचन, लेखन, अंगीक गुणाचा विकास क्रीडा व खेळ या माध्यमातून होण्यासाठी विशेष शिक्षक, पंधरा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक अनिवार्य केले.म्हणून शिक्षणासाठी एकूण उत्पन्नाच्या साडेसात ते आठ टक्क्यांपर्यंत खर्चाची तरतूद केली .सरकारी शाळा असून वयाच्या १६ वर्षापर्यंत विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण,शालेय पोषण आहार आणि प्रवासाची सोय ही सरकारी जबाबदारी आहे.

मानवी विकास संस्थेच्या माध्यमातून या विषयावर दरवर्षी चिंतन,मनन,नवनवीन विकासाचे मापदंड व जगातील घडामोडींचे विद्यार्थ्यांवर होणारे परिणाम यांचे अध्ययन केल्या जाते.त्यानुसार अभ्यासक्रम,संशोधनासाठी चे विषय व देशाच्या विकासात विद्यार्त्यांचे योगदान ठरवण्यात येते.त्यामुळे स्वीडन जगात शिक्षणासाठी टॉपमोस्ट म्हणून ओळखला जाते.या उलट भारतात जे स्वीडनने दहा वर्षापूर्वी केले ते आता केल्या जात आहे.ते म्हणजे डिजिटल एज्युकेशन.त्यातून पुस्तक वाचन स्पर्धा, लेखन स्पर्धा तसेच चित्र,शिल्प कला,नैसर्गिक रम्य सहलीसारखे उपक्रम बंद होण्याची स्थिती निर्माण झाली. ऑनलाईन क्लासेस व पालकांचे डिजिटल सिस्टिममध्ये वेळ व पैसा खर्च

होण्याचे प्रमाण वाढत आहे. भारत ग्रामीणवस्तीचा विकसनशील गतीचा देश आहे.येथे नैसर्गिक साधन संपत्ती, जैवविविधता मुबलक आहे. तिन्ही ऋतुचा आस्वाद घेण्यासारखे नैसर्गिक वातावरण आहे.

मात्र बिनभिंतीच्या शाळेत शिकण्याची संधी हिरावून घेतली जात. ऑनलाईल तसेच डिजिटल प्रोजेक्ट विद्यार्थ्यांना स्किलडेव्हलपमेंटच्या नावाखाली घेण्यात येत असेल तर त्यांच्या कौशल्याचा विकास होण्यासाठी; स्वीडन देशाने घेतलेल्या आजच्या निर्णयाचे स्वागत केले जावे.म्हणजे पुस्तके वाचून व स्वहस्ते लेखन करून परीक्षा पास करण्याची सवय लावल्या जाईल.कारण डिजिटल शिक्षण हे देह दंड शिक्षा आहे.हे स्वीडनने दहा वर्षापूर्वी केलेल्या डिझीडल एज्युकेशन प्रयोगातून निष्पन्न झाले आहे.

आधीच भारत शिक्षणावर एकूण उत्पन्नाचे दोन ते अडीच टक्के खर्च करून शिक्षण सरकारी पेक्षा खाजगी कंपन्यांना किंवा उद्योग क्षेत्रातील लोकांच्या हातात देण्याचा प्रकार वाढत आहे.त्याचा परिणाम नव्या पिढीच्या आयुष्यावर होऊ नये. अशी नैतिक जबाबदारी सरकार मायबाप म्हणून स्वीकारत असते.तशी राज्यघटनेत तरतूदही आहे.

राज्यघटना म्हणजे लोकशाहीचे मानव केंद्रीत दालन!!त्याचा आता जागतिक पातळीवर प्रभाव टिकून राहण्यासाठी भारताने काय शिकला? ह्या प्रश्नापेक्षा कसा शिकला व शिक्षणाचा उपयोग करायला शिकला हे शिकवणे जास्त गरजेचे झाले आहे. उच्च शिक्षणात कौशल्य आधारित शिक्षणासोबत नैतिक शिक्षण म्हणजे नैसर्गिक नियमांचे आधीन असलेल्या मूल्यांचे शिक्षण समजून घेतले पाहिजे.

यासाठी मानव म्हणजे काय? ही संकल्पना स्पष्ट करणाऱ्या जीवन शिक्षणाला हात घातला जावा. नाही तर डिजिटल शिक्षण हे देहदंड शिक्षा होऊन मानवी देहाला मानवी मूल्य शिकवण्यासाठी पुन्हा कृत्रिम बुद्धिमत्ता(रोबो टीचर)जागा घेत आहे. याचे भान वेळीच आले नाही तर !! युद्धजन्य स्थितीत मानवी वंशाची वाताहत होण्याचे दिवस; ऊर्जा हस्तांतरणाच्या शर्यतीमुळे जागतिक पातळीवर सुरू झाले आहे. मानवाच्या पोषणाला लागणाऱ्या ऊर्जेसाठी युद्ध नाही तर मानवी शुद्ध पाहिजे. ती शुद्ध शिक्षणातून येते.म्हणून गदीमाची कविता बालवयातील विद्यार्थ्यांना प्रेरणा देते.

'बिनभिंतीची शाळा उघडी लाखो
इथले गुरु..
झाडे, वेली, पशू पाखरे यांची
गोष्ट करू...'

यातील आशय गांभीर्याने घेण्याची गरज स्वीडन देशाने घेतली.मोबाईलचे ीात बघताना जगात भ्रमण करण्याची संधी मिळते.तेव्हाच आजुबाजूवर लक्ष ठेवून; आपले मानवी मूल्य जपण्याचा तूर्त प्रयत्न करावा आणि आम्ही भारताचे लोक म्हणून शिक्षण वाघिणीचे दूध आहे! जो पिणार तो वाघा सारखा गुरगुरणार!! आता डिजिटल शिक्षणाचे दूध गुरगुरणारे की दूर करणारे असेल याचा शोध घ्यावा हीच मानवाने मानवाशी मानवा सम वागणे या प्रार्थनेची पूर्तता .....

डॉ. प्रवीणकुमार शिवहरीपंत राऊत.
सदस्य–सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटी.
मो.७७९८६४५५६५.
eml_raoot25@gmail.com

बंधने फक्त महिलांवरच का ?

प्रसिद्ध मराठी अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर योगासने करतानाचा व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओमध्ये त्यांनी व्यायामासाठी सोईस्कर असलेले छोटे कपडे परिधान केले होते. मात्र एका नेटकऱ्याला ही गोष्ट खटकली आणि त्याने त्यांच्या व्हिडिओवर नकारात्मक कमेंट करत थेट सल्ला दिला, 'कॅमेरा समोर तरी पूर्ण कपडे घालून योगा करत जा.' अर्थात या कमेंटवर ऐश्वर्या नारकर यांनी त्या ट्रोल करणाऱ्या नेटकऱ्याचा चांगलाच समाचार घेतला. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात. बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते.

मुलांचा 'स्क्रीन टाईम' कमी होणार?

वयाच्या सुरुवातीच्या वर्षात मुलांची वाढ नीट व्हावी यासाठी त्यांचा 'स्क्रीन टाईम' कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याचा विचार सर्वप्रथम ऑस्ट्रेलियात झाला. ऑस्ट्रेलियानंतर इंडोनेशियाने त्याची री ओढली. दक्षिण कोरिया, सिंगापूर, फ्रान्स, स्पेन या देशांनीही त्यासाठी वेगवेगळ्या उपायांचे सूतोवाच केल्यानंतर आता संपूर्ण युरोपच समान उपाययोजनेच्या शक्यतेचा विचार करतो आहे. जी समस्या साऱ्या जगाला सतावते आहे, ती भारतासमोर नाही, असे कसे होईल? भारतातील एकूण लोकसंख्या आणि त्या लोकसंख्येतील किशोर तरुणांची मोठी संख्या या समस्येला इथे कितीतरी पटीने मोठी करते. भारतात या प्रश्नाला सर्वप्रथम वाचा फोडली, ती कर्नाटकाने. परदेशातील विचारमंथनाचा परिणामही असेल, पण कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आपल्या राज्यात १६ वर्षांखालील मुलांना समाजमाध्यमे वापरण्यावर बंदी आणण्याची घोषणा केली. आंध्रचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनीही लगेच १३ वर्षांखालील मुलांच्या समाज माध्यम वापरावर बंदीची घोषणा केली. 'तीन महिन्यांत ही बंदी लागू होईल' अशी त्यासाठीची कालमर्यादाही त्यांनी जाहीर



करून टाकली. या दोन राज्यांनंतर विहारचे मावळते मुख्यमंत्री नितीशकुमार आणि आत्ताच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आपलाही तसा विचार सुरू असल्याचे बोलून दाखवले. मुलांचा 'स्क्रीन टाईम' कमी करण्याची गरज जगभर कशी समान पद्धतीने जाणवते आहे, ते या सगळ्या घोषणांवरून दिसते, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी थेट बंदीचीच घोषणा केली असली, तरी ही बंदी नेमकी कशी प्रत्यक्षात आणणार,ते अद्याप स्पष्ट केलेले नाही.कारण,डिजिटल जगात कोणतीही बंदी आणणे आणि तिची यशस्वी अंमलबजावणी करणे मोठे जिकिरीचं असते. सरकारने आपली पूर्ण ताकद लावल्याशिवाय आणि देशाबाहेरून चालवण्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्मचे सहकार्य मिळवल्याशिवाय अशी कुठलीही बंदी शक्य होत नाही, हा या पूर्वीचा अनुभव आहे.बंदीची घोषणा जितकी सोपी आणि आकर्षक, तेवढीच तिची अंमलबजावणी कठीण असते!

यापूर्वी जगभर अनेकदा विचारला गेलेला प्रश्न यानिमित्ताने पुन्हा विचारला जातो आहे: बंदीने समस्या संपते का? कायद्याने लादलेली बंदी जास्त प्रभावी असते,की समाजप्रबोधनाने विचारपूर्वक समूळ नष्ट केलेले तिचे अस्तित्व? कारण, कायदा आला, की त्यामागून पळवाटा येतात.कायदा तर्कशुद्ध करण्याच्या गरजेतून इतके प्रश्न निर्माण होतात, की त्यात मूळ कायद्याची व्यवहार्यताच बऱ्याचदा संपून जाते.जी गोष्ट व्यवहार्य नसेल, तिची अंमलबजावणी कशी होणार?इथे तर संबंध थेट बालमनाशी आहे. दुसऱ्या बाजूला तंत्रज्ञान आहे. माहिती तंत्रज्ञान इतक्या झपाट्याने नवनव्या गोष्टी येत आहेत, तंत्रज्ञान इतक्या वेगाने प्रगत होत आहे, की कोणीही म्हटले तरी या तंत्रज्ञानाला आपल्या पकडीत ठेवून थांबवू शकणार नाही. यासंदर्भात याआधीही काही प्रयोग झाले आहेत. विशेषतः मुक्त लैंगिक आणि अश्लील चित्रफिती दाखवणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्मसंदर्भात. आजही ओटीटीवरील अनेक वेब सिरीज, चित्रपट प्रौढांसाठी असतात. ते पाहण्यासाठी तिथे गेले, की दर्शकाला आधी त्याचे वय विचारले जाते.दर्शकाने सोयीनुसार आपले वय नोंदवले, की त्या 'प्लॅटफॉर्म'ची सगळी दारे दर्शकासाठी क्षणात खुली होतात, दर्शकाने टाकलेले त्याचे वय खरे, की खोट हे तपासण्याची कुठलीही सोय तिथे नाही. त्यामुळे, आजही अडसर आहे; पण तो अगदी सहजपणे बाजूला करता येईल असाच ठेवला आहे. ज्या राज्य सरकारांनी आता बंदीची घोषणा केली आहे, त्यांना या बाबी लक्षात घेऊन सहजासहजी दूर करता येणार नाही, असा अडसर घालावा लागेल!हे 'प्लॅटफॉर्म' उघडण्यासाठी असणारी व्यवस्था आधार कार्डाशी जोडण्यासारख्या पर्यायांचा विचार केला, तरच ही बंदी खऱ्या अर्थाने अमलात येईल. अर्थात यालाही 'डार्क वेब' किंवा 'व्ही पी एन' सारखे आडमार्ग आहेतच. माहिती तंत्रज्ञान, संगणक, इंटरनेट हे या पिढीचेच तंत्रज्ञान आहे.पंधरा-वीस वर्षांची मुले त्यात इतकी तरबेज असतात,की त्यांना सगळ्या पळवाटा,चोरवाटा फार पटकन सापडतात.जे बंदीचा खरंच गांभीर्याने विचार करत आहेत.

त्यांना त्यासाठी माहिती तंत्रज्ञान कायद्याचाच आधार घ्यावा लागणार आहे. हा कायदा केंद्र सरकारच्या आखत्यारीत आहे.त्यामुळे, राज्य सरकारची कितीही इच्छा असली, तरी ते अशी राज्यापुरती बंदी आणू शकतील का, आणि ती उपयोगी असेल का, हा प्रश्न आहे. त्यांच्या राज्यातली मुले काही कारणाने अन्य राज्यात गेली, तर किवा अगदी सीमा भागातल्या मुलांचा यासंदर्भात कसा विचार होणार?असेही प्रश्न आहेत. ज्यांनी घोषणा केल्या आहेत, त्यांचा विचार योग्यच आहे. भावनाही सच्ची असेल, तर त्यांनी एकत्रितपणे केंद्राला साकडे घातले, तर ते जास्त उपयोगाचे ठरेल.

इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या भारतात ९६ कोटीपेक्षा अधिक आहे. त्यातले ६६% पेक्षा अधिक वापरकर्ते समाज माध्यमांचा नियमित वापर करतात. इंटरनेट स्वस्तात उपलब्ध असल्याने आणि आता नेटवर्कही भक्कम झाल्याने खेड्यापाड्यात इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या वाढते आहे. यात मुलांची संख्या खूप जास्त आहे. एका अंदाजानुसार, २५३ मुलें इंटरनेटचा मुबलक वापर करत असतात, हा वापर मुख्यतः रील पाहण्यासाठी होतो. आपल्या'प्लॅटफॉर्म'वर आलेल्या प्रत्येक दर्शकाला (म्हणजे ग्राहकाला) आपल्या प्लॅटफॉर्म'वर जास्तीत जास्त वेळ कसं गुंतवून ठेवता येईल, यासाठी सर्व 'प्लॅटफॉर्म' चालकांची धडपड असते.त्यासाठी ते अत्यंत विचारपूर्वक कार्यक्रमांची निर्मिती करत असतात. त्यामुळे, उद्या या प्लॅटफॉर्म'वरील आक्षेपार्ह कार्यक्रमांवर नियंत्रण आणायचे ठरलेच,तर या निर्मितीप्रक्रियेत हस्तक्षेप करता येईल, अशी यंत्रणा उभी करावी लागेल. या यंत्रणेला त्या 'प्लॅटफॉर्म' च्या अल्गोरीदमची प्रक्रिया गरजेनुसार समजून घेण्याचे अधिकारही द्यावे लागतील. अशा आणखीही अनेक गोष्टी आहेत. त्या प्रसंगाप्रसंगाने चर्चेत येतीलच. समस्या गंभीर असली, त्यावर उपायाची तातडीने गरज असली, तरी असा उपाय करणे वाटते तितके सोपे नाही, हाच याचा अर्थ.

गर्भाशय मुखाचा कर्करोग टाळण्यासाठी

प्राथमिक (प्रिकॅन्सर) अवस्थेतील निदान व उपचार

गर्भाशय मुखाचा कॅन्सर ही विकसनशील देशांना भेडसावणारी सर्वात मोठी व प्रमुख आरोग्य समस्या आहे. हा कॅन्सर जगातील चौथ्या क्रमांकाचा कॅन्सर होय. हा कर्करोग स्त्रियांच्या मृत्युचे प्रमुख कारण देखील आहे.यातील ८० टक्के स्त्रिया विकसनशील देशातील होत.भारतात गर्भाशयमुखाच्या कॅन्सरमुळे दर आठव्या मिनिटाला एक स्त्री मृत्युमुखी पडते.हा रोग प्राथमिक अवस्थेत ओळखला गेला व उपचार करता आले तर टाळता येण्यासारखा आजार आहे.गर्भशय मुखाची तपासणी सहज करता येते.प्राथमिक अवस्थेतील उपचार देखील साधे व कमी खर्चाचे असतात. तसेच या कॅन्सरला विरोध करणारी एचपीव्ही ची लस ही उपलब्ध आहे.

१७ नोव्हेंबर २०२० रोजी जागतिक आरोग्य परिषदतर्फे एक विशेष अभियानाची सुरुवात झाली. या अभियाना अंतर्गत 'सर्वायकल कॅन्सर मुक्त भारत २०३०' हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.यात १२ ते १४ वर्षे वायोगातील सर्व मुलीना एचपीव्हीची लस मिळावी,सर्व महिलांनी गर्भाशय मुखाचा कॅन्सरची स्क्रीनिंग चाचणी आयुष्यात किमान २ वेळा व्हावी,ज्या स्त्रियांमध्ये चाचणाद्वारे दोष आढळला किवा लक्षणे आढळली त्यांना योग्य तो उपचार वेळेवर मिळावा.

एचपीव्ही- ह्युमन पॅपिलोमा व्हायरस

गर्भशयमुखाचा कॅन्सर होण्यासाठी जबाबदार असणारा विषाणू म्हणजे एचपीव्ही.(ह्युमन पॅपिलोमा व्हायरस)याचे इन्फेक्श न किंवा जंतूसंसर्ग हे लैंगिक संबधातून निर्माण होणारे सर्वात कॉमन इन्फेक्शन आहे. एचपीव्ही लसीकरण न झालेल्या प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात कधी न कधी या संसर्गाचा धोका असतो. सर्वसाधारणपणे भारतात दरवर्षी १०० लाख लोकांना हे इन्फेक्शन होते.

या जंतुसंसार्गामुळे स्त्रियांमध्ये- गर्भशयमुखाचा कर्करोग, योनीचा कर्करोग,योनीमार्गाचा कर्करोग, गुदद्वाराचा कर्क रोग,जननेद्रीयांवरील चामाखिळ.पुरुषांमध्ये-गुदद्वाराचा कर्क रोग,जननेद्रीयांवरील चामा खिळी, तोंडाचा कर्करोग या रोगाचा प्रादुर्भाव.असुरक्षित लैंगिक संबंध-गर्भवती महीलेकडून गर्भस्थ शिशूला या प्रकारे होतो.हा विषाणू शरीरावरील साधी जखम, खरचटलेल असेल अशा भागातून शरीरात प्रवेश करतो.एकदा शरीरात प्रवेश केल्यानंतर पुढे तीन प्रकारचे परिणाम दिसून येतात.

हा व्हायरस जसा आला तसा वर्षा दोन वर्षात परत निघून जातो. किंवा शरीरात विशेषतः गर्भशय मुखात बरीच वर्षे मुक्काम ठोकतो. जास्त वर्ष राहिल्यास गर्भशयमुखाच्या पेशींमध्ये काही बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरतो. विशेषतः-वाढीच्या वयातील मुलीला लैंगिक संबंधाद्वारे या विषाणूची बाधा झाल्यास,एका पेक्षा अधिक लोकांशी लैंगिक संबंध प्रथापित केल्यास,ज्या पुरुषांचे अनेक स्त्रियांशी लैंगिक संबंध असतात अशा पुरुषासोबत लैंगिक संबंध झाल्यास, तंबाखू, धुम्रपान, याचे व्यसन असणाऱ्या स्त्रियांमध्ये, एडस् रोगग्रस्त महिलांमध्ये, कोणत्याही प्रकारे, इम्यूनीटी कमजोर असलेल्या महिलां मध्ये,समलिंगी संभोग यात या विषाणूचा प्रसार, तसेच कर्करोगात परिवर्तन होण्याचे परिणाम अधिक दिसून येते.

या विषाणूचे अनेक प्रकार आहेत. परंतु यातील फक्त काही प्रकार कॅन्सरसारखे आजार उत्पन्न करू शकतात. विशेषतः एचपीव्ही १६, एचपीव्ही १८.लक्षणे-सुरुवातीला एचपी व्ही इन्फेक्शन ची काहीही लक्षणे नसतात. बहुतेक एचपीव्ही इन्फेक्शन झालेल्या व्यक्तीला या आजाराची जणिव देखील होत नाही. फारतर जननेन्द्रीयावरे चामखीळ किवा बाट दिसून येतात. परंतु चामखीळ तशी निरूपद्रवी असते.

कर्करोग निर्माण करणारे एचपीव्ही इन्फेक्शन सुद्धा सुरुवातीला कोणतीही लक्षणे दाखवत नाही. एकदा का कॅन्सर झाला कि सर्व लक्षणे दिसू लागतात. त्यापूर्वी एचपीव्ही इन्फेक्शनचे निदान विशिष्ट तपासणी अंतीच होते.

एचपीव्ही Vaccine

आपण जाणून घेऊ एचपीव्ही र्ह्म्म्हा काय आहे? आणि का महत्त्वाचे आहे?

कोरोना काळापासून आपली विषाणू – न्न्रेले – र्ह्म्म्हा लसीकरण या शब्दांशी सलगी झालेली आहे.

एचपीव्ही लस ची ओळख:-

एचपीव्ही लस ९ ते १४ वर्षाच्या मुलामुलींना दिली जाते. या लसीमुळे एचपीव्ही (र्प्ल्ह्ङ्क ईद्दग्त्त्दर्र्ल्न्न्रेले) या विषाणू मुळे होणाऱ्या आजारांना प्रतिबंध होतो. भारतात सिरम इंस्टीटयुट ऑफ

इंडियाने बनविलेले भारतीय बनावटीचे र्ध्ड्ढ Vaccine नुकतेच उपलब्ध झाले आहे.

एचपीव्ही लस कोणाला दिली जाते

पाश्च्यात्य देशात एचपीव्ही लस ९ ते १४ वर्षाच्या मुलामुलींना नियमित दिली जाते. भारतात सध्या तरी ते अनिवार्य लसीकरणाच्या गटात समाविष्ट केलेले नाही. परंतु लवकरच ही लस अनिवार्य करण्यात येईल. विशेषतः ९ ते १४ वर्षाच्या मुलीना एचपीव्ही लस अनिवार्य आहे. ही लस दोन डोसेस मध्ये दिली जाते. दोन्ही डोसेसमध्ये सहा महिन्याचे अंतर असते. संपूर्ण संरक्षणासाठी दोन्ही डोसेस पूर्णपणे घेतलेले असणे जरुरी आहे. १४ ते २६ वर्षाच्या पुढील वयाच्या मुलीना ही लस देता येते. यासाठी ३ डोसेस द्यावे लागतात व संपूर्ण संरक्षणाची हमी देता येत नाही.

एचपीव्ही लस काम कसे करते?

९९% गर्भशयमुखाच्या कॅन्सरमध्ये एचपीव्ही विषाणू च्या संसर्गाचे कारण दिसून येते. तीन प्रकारची एचपीव्ही लस उपलब्ध आहे. सर्व लसी 'हाय रिस्क – अति धोक्याच्या' अशा एचपीव्ही १६ व एचपीव्ही १८ पासून संरक्षण देतात.तर काही लसी अधिक एचपीव्ही विषाणूंवर काम करतात व जन्नेन्द्रीयांवर होणारी चामखीळ पासून पण संरक्षण देतात. ही लस इतर लैंगिक आजारांपासून संरक्षण देत नाही.

एचपीव्ही हा विषाणू त्वचेतून पसरतो. त्वचेवर झालेल्या साधारण जखमा, खरचटणे या द्वारे हा विषाणू माणसाच्या शरीतात प्रवेश करतो. याचा अर्थ नुसत्या स्पर्श, लैंगिक संबधातून हा विषाणू पसरतो.एचपीव्ही शरीरात प्रवेश करण्यापूर्वीच जर मुलींना एचपीव्ही ची लस मिळाली तर एचपीव्ही च्या विषाणूंशी लढा देणे शक्य होते.

लस कशी दिली जाते?

इंजेक्शन दंडाच्या वरच्या भागात दिली जाते. AIDS सारख्या आजाराने ग्रस्त असणाऱ्या व्यक्तींना र्ध्ड्ढ लसीचे ३ इंजेक्शन द्यावे लागतात.

एचपीव्ही चाचणी

गर्भशयमुखाच्या पेशींवर एचपीव्ही ची चाचणी केली जाते. म्हणून चाचणी फक्त स्त्रियांसाठी उपलब्ध आहे. हे परीक्षण फक्त एमिाहग्हु ऊ्र म्हणून केले जाते. म्हणजे या चाचणी नंतर एचपीव्ही चा संसर्ग झाल्याचे कळते. परंतु जरी एचपीव्ही संसर्ग झाला असला तरी त्याचा अर्थ कॅन्सर झाला आहे असा नसतो. फक्त एचपीव्ही संसर्ग त्यातही एचपीव्ही १६ /एचपीव्ही १८ या अधिक धीकादायक विषाणूंनी शरीरात प्रवेश केल्याचे कळते आणि अशी माहिती आगाऊ चा प्राप्त झाल्याने कॅन्सर होऊ नये म्हणून काय उपचार करायचे ते ठरवणे शक्य होते. सहसा हे इन्फेक्शन वर्षा – दोन वर्षात स्वतःच साफ होते म्हणून ३० वर्षे वयापुर्वी या तपासणीची आवश्यकता नसते. जर या विषाणूचे शरीरात ८/१० वर्ष वास्तव्य रहिते. तरच पेशीत बदल घडून येतात. म्हणून हि टेस्ट पॉजीटीव्ह आली तरी घाबरून जाऊ नये.

टेस्ट कशी केली जाते?

ही टेस्ट मासिक पाळी चा रक्तस्त्राव थांबल्यानंतर पुढील ८ दिवसात कोणत्याही दिवशी करता येते.

यासाठी जास्त वेळ लागत नाही. आपण कामावरून मधल्या सुटीत जाऊन पण ही टेस्ट करू शकता.

टेस्टच्या आदल्या दिवशी शरीरसंबंध किंवा योनीमार्गात कोणत्याही प्रकारच्या औषधांचा वापर टाळावा.

ही तपासणी Pap Smear Test /Liquid Based Cytology चाचणी सोबतच सहसा केली जाते. खालचे आतले कपडे काढून पाय पोटाकडे गुडघ्यात दुमडून झोपायला सांगतात. नंतर स्पेकुलम द्वारे गर्भशयमुख किंवा Cervix बघितले जाते. नंतर एका मऊ ब्रशद्वारे गर्भशयमुखावरील पेशी जमा केल्या जातात. या तपासणी नंतर लगेचच आपण आपल्या रोजच्या कामांना लागू शकतो.

एचपीव्ही- चाचणीचे निष्कर्ष

१) Positive (सकारात्मक):- याचा अर्थ आपल्याला HPVची बाधा झालेली आहे असा असतो. परंतु कॅन्सर झालेलाच आहे असा नसतो. परंतु भविष्यात होण्याची शक्यता किंवा धोक्याची घंटा मात्र वाजते. वारंवार परत तपासणीची गरज अधोरेखित होते.

२) Negative (नकारात्मक):- याचा अर्थ तुम्हाला HPV च्या विषाणूने आता ग्रासलेले नाही. आता तुम्हाला पुढील ३ ते ५ वर्षानंतर पुढील चाचणी करायची आहे असा सल्ला तुमचे डॉक्टर देतील.

उपचार- हा आजार टाळण्यासाठी आपल्या कन्येला सर्वप्रथम १२ वर्षे वयातच HPV ची लस द्या.कोणत्याही तपासणीनंतर रोगाचे निदान झाल्यास उपचारांची आवश्यकता तर असतेच पूर्वी यावर गर्भशय काढून टाकण्याची शस्त्रक्रिया हा एकच उपाय उपलब्ध होता. मोठी शस्त्रक्रिया म्हणजे काही प्रमाणात धोका आर्थिक बोजा, गुंतागुंत या गोष्टी असतात. परंतु काही साधे स्वस्त उपचार देखील आहेत.यासारखे बाह्यरुग्ण विभागातच करता येण्यासारखे उपचार आता उपलब्ध आहेत. हे उपाय सुरक्षित व परिपूर्ण आहेत. त्यामुळे आपल्या गर्भशय मुखाची तपासणी वयाच्या तिसाव्या वर्षापासून दर ५ वर्षांनी नियमितपणे करून घेणे स्त्रीयांनी आपले प्रथम कर्तव्य समजले पाहिजे. समस्या अस्तित्वात आहे ती न नाकारता त्यातून मार्ग काढणेच श्रेयस्कर ठरते. अशा तपासणीतून डॉक्टर लोकांना गर्भाशय काढण्याचा सल्ला देण्याची संधी वाढते. पैसे लुटता येतात अशा प्रकारचे गैरसमज सोडून द्यावे. तसेच गर्भशय काढून टाका उगीच त्रास नको. या दोन्ही ध्रुवांवर न राहता मधला श्रेयस्कर मार्गही आता उपलब्ध आहे याची जाणीव ठेवावी.एका साध्याशा तपासणीने,लसीकरणाने आपण आरोग्य यंत्रणेवरील बराच मोठा भर कमी करू शकतो व स्वतःलाही शारीरिक, मानसिक, आर्थिक तणावापासून मुक्त ठेऊ शकतो.

डॉ. शुभांगी मुंधडा
गीताई नर्सिंग होम
अमरावती
मो.- ९७५०९९४३६१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सच

अकोला
जिल्हा विशेष

Change In Name

I have changed name from
ANURADHA MADHAV JOSHI
, as per old passport name to
ANURADHA KEDAR KULKARNI
new name as per on two photo IDs.
This will be my name for all future purposes.
Thus changing my name on passport no. R9287947
Address : Gajanan Peth Opposite of
Hanuman Mandir, Akola 444005

मनपा अग्निशमन विभागाचा घेतला आढावा

सभापती विजय अग्रवाल यांनी दिले विविध निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात वाढत्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर अखेर अकोला महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचा आढावा घेण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी सोमवारी आपल्या दालनात महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर, उपमहापौर अमोल गोगे व सभागृहनेते पवन महल्ले यांच्या उपस्थितीत अग्निशमन विभागाची आढावा बैठक घेतली.

गेल्या शुक्रवारी गांधी रोड परिसरातील दुकानांना लागलेल्या भीषण आगीच्या घटनेदरम्यान अग्निशमन विभागाला आलेल्या अडचणींचा या बैठकीत विशेष ऊहापोह करण्यात आला. उन्हाळ्याच्या दिवसांत शहरात आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने अग्निशमन यंत्रणा अधिक सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीत अग्निशमन विभागातील कर्मचारी, उपलब्ध साधनसामग्री तसेच दैनंदिन कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आगीवर नियंत्रण मिळविताना पाण्याचा तुटवडा भासू नये यासाठी शहरात नवीन हायड्रंट व्यवस्था उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. सिटी कोतवाली परिसरासोबतच जुने शहरातील हरिहर पेठ, आकोट फैल आणि गणेश घाट परिसरात नवीन हायड्रंट बसविण्याचे निर्देश देण्यात आले. आवश्यक असल्यास खाजगी विहिरी अधिग्रहित करून त्यांच्यावरही हायड्रंट सुरू करण्याचा पर्याय तपासण्यास सांगण्यात आले.

याशिवाय अग्निशमन दलाच्या वाहनांचे थकीत विमे तातडीने काढणे, कर्मचाऱ्यांना गणवेश व आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे, आपत्कालीन कॉलसाठी बीएसएनएल व्यतिरिक्त दुसऱ्या दूरध्वनी कंपनीची सेवा उपलब्ध करणे तसेच नवीन अग्निशमन गाड्यांसाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना अग्रवाल यांनी दिल्या. दरम्यान, खडकी येथील घनकचरा संकलन केंद्राच्या मागील भागात सर्व सुविधांनी युक्त नवीन अग्निशमन कार्यालयाचे काम सुरू असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

या बैठकीस नगरसेवक सिद्धार्थ उपरवट, सामाजिक कार्यकर्ते रणजीत खेडकर, पंकज गावंडे, प्रकाश घोगलिया, मनपा मुख्य अग्निशमन अधिकारी मनीष कथले तसेच अग्निशमन विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

पिकविम्यासाठी शेतकरी राजा ग्रुपचे ठिय्या आंदोलन

जिल्हा कृषी अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यात २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, उडीद, मुग, ज्वारी व तूर या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र शेतकऱ्यांना अद्यापही पिकविम्याची रक्कम न मिळाल्याने संतप्त शेतकऱ्यांनी शेतकरी राजा ग्रुपच्या वतीने सोमवारी (१६ मार्च) जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयात दोन तास ठिय्या आंदोलन केले.

शासनाने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी १७ हजार रुपयांची मदत जाहीर केली होती. तसेच पिक कापणी प्रयोगांनुसार उत्पादन सरासरीपेक्षा कमी झाल्याने

शेतकऱ्यांना पिकविमा मिळणे अपेक्षित होते. मात्र अद्यापही कोणतीही आर्थिक मदत न मिळाल्याने शेतकरी राजा ग्रुपच्या वतीने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनादरम्यान जिल्हा कृषी अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर आंदोलन तूर्तास मागे घेण्यात आले. या आंदोलनात शेतकरी राजा ग्रुपचे रवि सोनोने, गणेश ताले, तेजराज नहार, ज्ञानेश्वर गाडगे, राहुल ताले, दशरथ सरदार, प्रकाश काळे, संतोष दुतोंडे, शेख गुलाब, अशोक पाटील, गोपाल पजई यांच्यासह अनेक शेतकरी सहभागी झाले होते.

'पातूर तालुक्यात २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना हेक्टरी १७ हजार ५०० रुपयांची मदत व शंभर टक्के पिकविमा देण्याची घोषणा केली होती. मात्र पिकविम्याची रक्कम रखडल्याने आंदोलन करावे लागले. अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर आंदोलन तूर्तास मागे घेतले आहे.'

- रवि सोनोने, शेतकरी राजा ग्रुप

खेट्री येथे सिंचन विहिरींच्या कामाला सुरुवात

आ. नितीन देशमुख यांच्या प्रयत्नातून शेतकऱ्यांना दिलासा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील खेट्री येथे सिंचनासाठी मंजूर करण्यात आलेल्या विहिरींच्या कामांना प्रत्यक्ष सुरुवात झाली असून त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आमदार नितीन देशमुख यांच्या विशेष प्रयत्नांतून तालुक्यात हजारो सिंचन विहिरींना मंजुरी मिळाली असून त्यापैकी हजारहून अधिक विहिरींची कामे सध्या विविध गावांमध्ये सुरू झाली आहेत.

त्याचाच एक भाग म्हणून खेट्री येथील शेतकरी अनंता पांडुरंग ताले आणि सईद खा याकूब खा यांच्या शेतात सोमवारी सिंचन विहिरीचे भूमिपूजन करण्यात आले. भूमिपूजनानंतर लगेचच विहिरीच्या कामाला सुरुवात करण्यात आली. या योजनेअंतर्गत खेट्री परिसरात सुमारे शंभर विहिरींना मंजुरी मिळाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

सिंचनाच्या सुविधेमुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार असून उत्पादनवाढीसही हातभार लागणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. याप्रसंगी माजी पंचायत समिती सदस्य गोपाल ढोरे, सुरज झडपे, उमेश लासूरकार, गुलाब मांजरे, राहुल देशमुख, अमन देशमुख, ईश्वर भिसे, संतोष ताले, आतिक बेग, शहजाद बेग, सय्यद समीर, समाधान मेसरे, संजय अडकणे, दसरत मेसरे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहीर नोटीस

वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ४०६/२०२६ — प्रोसेस नं.३३७३/२०२६
चौ.ता. १५/०४/२०२६ — दिनांक : ११/०३/२०२६

अर्जदार : १. गुंफाबाई शालीग्राम सोनोने २. गजानन शालीग्राम सोनोने अर्जदार क. १ व २ रा. हिंगणा रोड, गजानन महाराज मंदिराच्या मागे, आनंद नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. प्रभाबाई सुरेश सोनोने ४. राहुल सुरेश सोनोने ५. अजय सुरेश सोनोने ६. पुनम सुरेश सोनोने अर्जदार क्र. ३ ते ६ रा. हिंगणा रोड, गजानन महाराज मंदिराच्या मागे, आनंद नगर, बिट्टी सेठ प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : शालीग्राम बाजीराव सोनोने
पत्ता :- रा. हिंगणा रोड, गजानन महाराज मंदिराच्या मागे, आनंद नगर, अकोला. ता. व जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शालीग्राम बाजीराव सोनोने यांचे दि. २७/०३/२००३ रोजी राहते घरी हिंगणा रोड, गजानन महाराज मंदिराच्या मागे, आनंद नगर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर
दयानंद मारूती वाघमारे यांचे न्यायालयात
सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.

प्रोसेस नं. ३४४/२६ — दिनांक : ०९/०२/२०२६
दिवाणी किरकोळ अर्ज / ४८ / २०२६
मानसी मंगेश चौधरी वि. शोभा मनोहर निंबोळकर
पुढिल तारिख : ०६-०४-२०२६

अर्जदार : १. मानसी मंगेश चौधरी वय अं४४वर्ष धंदा घरकाम रा. साई नगर, कल्यानी शाळेजवळ मांजरी बु. ता. हवेली, जि. पुणे

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत मनोहर तुळशीराम निंबोळकर हे दिनांक २५.०१.२०१५ रोजी रा. पुणे ता. जि. पुणे येथे मरण पावले. वरील नमूद अर्जदार यांना मयत मनोहर तुळशीराम निंबोळकर यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत दिनांक ०६.०४.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०९.०२.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

आदेशानुसार
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

जाहीर नोटीस

वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. २२१९/२०२५ — प्रोसेस नं.३५२८/२०२६
चौ.ता. १०/०४/२०२६ — दिनांक : १२/०३/२०२६

अर्जदार : १. अभिजीत विजय सकळकळे रा. एसबीआय कॉलनी नं. ५, क्वार्टर नं ४, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. रेणुका निलेश आंबेडपेल्लीवार रा. व्दारा निलेश आंबेडपेल्लीवार, ३-५-९८, ब्राम्हणवाडा, आदिलाबाद, ता. जि. आदिलाबाद तेलंगाना..

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : निला विजय सकळकळे
पत्ता :- रा. व्दारा अभिजीत विजय सकळकळे रा. एसबीआय कॉलन नं. ५, क्वार्टर नं ४, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत निला विजय सकळकळे यांचे दि. २३/१०/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ३१४/२०२६ — प्रोसेस नं.३१०८/२०२६
चौ.ता. ३०/०४/२०२६ — दिनांक : ०९/०३/२०२६

अर्जदार : १. चंद्रकलाबाई विद्याधर खुपसे २. शरद विद्याधर खुपसे ३. अनंत विद्याधर खुपसे क. १ ते ३ रा. गल्ली नं. २, डाबकी रोड, लक्ष्मी नगर, गोपाल एस. टी. डी. जवळ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ४. उज्वला संतोष गावंडे रा. तन्हाळा, जि. वाशिम ५. अंजुताई विनोदराव वानखेडे रा. वार्ड नं. १३, राम नगर, ठाकुर हाउस, वर्धा, ता. जि. वर्धा. ६. सविता गजानन देशमुख रा. १४१, साई नगर, शेगाव रोड, वार्ड क्र. ४, तेल्हारा ता. तेल्हारा जि. अकोला. ७. सुनिता विजय यादगिरे रा. मु. पो. पारखेड, ता. खामगांव, जि. बुलढाणा.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : विद्याधर ओंकाररावे खुपसे
पत्ता :- रा. गल्ली नं. २, डाबकी रोड, लक्ष्मी नगर, गोपाल एस. टी. डी. जवळ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विद्याधर ओंकाररावे खुपसे यांचे दि. १३/०९/२०२४ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ३३०/२०२६ — प्रोसेस नं.३१०३/२०२६
चौ.ता. १८/०४/२०२६ — दिनांक : ०७/०३/२०२६

अर्जदार : १ श्रीमती कुसुम शंकरराव इंगोले २. संजय शंकरराव इंगोले ३. विजय शंकरराव इंगोले अर्जदार क, १ ते ३ रा. गौरक्षण रोड, सहाकर नगर च्या मागे, हरिप अश्विनी कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. ४. सौ. सुनिता जयवंत तिरभाने रा. राधाकृष्ण मंदिरजवळ, पलश लाइन, गाडगे नगर, शिवाजी नगर, अमरावती ता. जि. अमरावती. ५. सौ. अनिता निलेश हागोने रा. मु. पो. विहीगांव, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : शंकर तुकाराम इंगोले
पत्ता :- रा. गौरक्षण रोड, सहाकर नगर च्या मागे, हरिप अश्विनी कॉलनी, अकोला ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे. की, मयत शंकर तुकाराम इंगोले यांचे दि. १४/०१/२०२४ रोजी संकल्प मॅटर्निटी हॉस्पिटल, अमरावती येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ३२१/२०२६ — प्रोसेस नं.३५२६/२०२६
चौ.ता. १०/०४/२०२६ — दिनांक : १२/०३/२०२६

अर्जदार : भूषण विजयराव बाळापूरे रा. हनुमान मंदिराच्या मागे, पाथर्डी, ता. तेल्हारा जि. अकोला सध्या रा. गणेश नगर, डाबकी रोड अकोला ता. जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : विजय मधुकर बाळापुरे
पत्ता :- रा. गणेश नगर, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विजय मधुकर बाळापूरे यांचे दि. १६/०१/२०२६ रोजी विष्महर्ता हॉस्पिटल, टॉवर चौक, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

Change In Name

I have changed name from
ANURADHA MADHAV JOSHI
as per old passport name to
ANURADHA KEDAR KULKARNI
new name as per on two photo IDs. This will be my name for all future purposes. Thus, changing my name on passport no. N8914292
Address: Gajanan Peth opposite of Hanuman Mandir, Akola 444005

जाहीर नोटीस

वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ३७०/२०२६ — प्रोसेस नं.३२५१/२०२६
चौ.ता. १३/०४/२०२६ — दिनांक : १०/०३/२०२६

अर्जदार : १. वंदना अशोकराव चारथळ २. शुभम अशोक चारथळ ३. प्रतिक अशोक चारथळ सर्व रा. सध्या कॉलनी, गायत्री नगर, अकोला, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : अशोक महादेवराव चारथळ
पत्ता :- रा. संध्या कॉलनी, गायत्री नगर, अकोला, ता जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक महादेवराव चारथळ यांचे दि. २५/१२/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक (प्रादेशिक) अकोला वनविभाग अकोला यांचे कार्यालय

वसुंधरा हाल, अशोक वाटीका जवळ, मंगरुळपीर रोड, अकोला
दुरध्वनी क्रमांक ०७२४-२४१५६०० ई- मेल dyofakola@mahaforest.gov.in

ई निविदा सुचना क्रमांक :- १६ सन-२०२५-२६

उपवनसंरक्षक (प्रादेशिक) अकोला वनविभाग अकोला यांचे वतीने सार्वजनीक बांधकाम विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गात पंजीबध्द कंत्राटदार यांच्याकडुन खालील कामासाठी B-1 नमुण्यात ई-निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रीत कामाची किंमत (रुपये)	१ टक्क इसारा (EMD) रक्कम (रु.)	निविदा शुल्क	कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग	कामाचा कालावधी
1	Construction of Natur Hut- 01 in Forest Compt. No. 66 in Malrarajura Eco-Tourisum Center in Patur range of Akola Forest Division.	1736625.00	17366.00	590	खुला	६० दिवस
2	Construction of Natur Hut-02 in Forest Compt. No. 66 in Malrarajura Eco-Tourisum Center in Patur range of Akola Forest Division.	1736625.00	17366.00	590	खुला	६० दिवस

ई-निविदा तपशिलवार माहिती व अटी व शर्ती www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ईच्छुक कंत्राटदारांनी वरील संकेतस्थळावर भेट देऊन निविदा भरावयाची कार्यवाही करावी.

ई- निविदा प्रसिध्दीचा तपशिल

ई-निविदा प्रसिध्दी	दि. १७.०३.२०२६ सकाळी ११.०० वा.
ई-निविदा दाखल करण्यास सुरवात दिनांक	दि. १७.०३.२०२६ सकाळी ११.०० वा. पासुन
ई-निविदा दाखल करण्याचा अंतीम दिनांक	दि. २४.०३.२०२६ दुपारी १२.०० वा. पर्यंत
ऑनलाईन निविदा उघडण्याचा दिनांक	दि. २५.०३.२०२६ सकाळी १२.०० वाजता (शक्य झाल्यास)

सुमंत एस. सोळंके (भा.व.से.)
उपवनसंरक्षक (प्रादेशिक)
अकोला वन विभाग अकोला.

वि.मा.का./अम./जाहि./
११७६/२०२५-२०२६

मुर्तिजापूर नगर परिषद मुर्तिजापूर जिल्हा अकोला

क्रमांक/नप/मु.अ./मिळकत विभाग/४४३/२०२६ — दिनांक :- १६/०३/२०२६

जाहीर ई-लिलाव सूचना (मिळकत विभाग)

शुध्दीपत्रक

नगर परिषद मुर्तिजापूर जिल्हा अकोला अंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील दिनांक ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ या कालावधी करिता आठवडी बाजार (मंगळवार व शुक्रवार) व दैनदिन महसूल वसूलीचा ठेका देण्याकरीता जाहीर ई-लिलाव आयोजीत करण्यात येत आहे. सदर जाहीर ई-लिलावाची सविस्तर माहिती नगर परिषद कार्यालय मुर्तिजापूर तसेच शासनाचे www.eauction.gov.in या संकेत स्थळावर दिनांक ०६/०३/२०२६ पासून प्रसिध्द करण्यांत आली आहे. सदरची ई-लिलाव सूचना दिनांक ०६/०३/२०२६ सकाळी ११.०० वा. पासून ते १३/०३/२०२६ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यत भरणा करण्यात येईल. ऑनलाईन/लाईव्ह ई लिलाव बोलीची दि. १७/०३/२०२६ ला सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजे पर्यत प्रसिध्द करण्यात आली आहे. अद्याप पर्यत कोणतीही हर्रासी करिता निविदा प्राप्त न झाल्यामुळे सदर ई-लिलावा करिता पुढील प्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

१	आवश्यक एस्तांऐवज व डी.डी. आवश्यक कागदपत्रे कार्यालयात आणून देण्याची तारीख	०६/०३/२०२६ सकाळी ११.०० वा.	१८/०३/२०२६ दुपारी २.००
२	प्राप्त एस्तऐवज / कागदपत्रे तपासणी कार्यालयीन काम	१८/०३/२०२६ दुपारी २.००	१८/०३/२०२६ सायंकाळी ५.००
३	ऑनलाईन / लाईव्ह ई लिलाव बोलीची तारिख व वेळ	२०/०३/२०२६ सकाळी ११.००	२०/०३/२०२६ सायंकाळी ५.००

इतर शर्ती व अटी नगर परिषद कार्यालय मुर्तिजापूर तसेच शासनाचे www.eauction.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

निलेश जाधव
मुख्याधिकारी, नगर परिषद मुर्तिजापूर

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १०३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

खाकीचा सन्मान की शिस्तीचा विसर

रस्त्यावर पडलेली पोलिस टोपी 'मानसिक रुग्णाच्या' डोक्यावर; पोलिसांची दखलच नाही

वर्धा/जनमाध्यम

नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर आहे, त्या पोलिस दलातील शिस्तीबाबतच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वर्धा शहरात एका पोलिस कर्मचाऱ्याची टोपी अनवधानाने रस्त्यावर पडली. ती एका मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तीने उचलून डोक्यावर घालून शहरात मुक्तपणे फिरत असल्याचे दिसत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ही टोपी पाहूनही एकाही पोलिसाने त्याची चौकशी केली नाही किंवा टोपी परत घेण्याचा प्रयत्न केला नाही.

नागरिकांना नियमांचे धडे देणाऱ्या आणि उल्लंघन झाल्यास कारवाई करणाऱ्या पोलिसांकडूनच शिस्त मोडली जात असल्याचे चित्र शहरात दिसत आहे. पोलिस गणवेशात टोपी हा अत्यावश्यक भाग मानला जातो. कर्तव्यावर असताना खाकी वर्दी, हातात काठी आणि डोक्यावर टोपी असणे बंधनकारक असतानाही सध्या अनेक पोलिस टोपी शिवायच रस्त्यावर दिसतात.

टोपी खिशात, शिस्त कुठे

अनेक पोलिस कर्मचाऱ्यांनी टोपी डोक्यावर न घालता खिशात ठेवण्याची सवय लावल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. वरिष्ठ अधिकारी दिसल्यावर किंवा एखाद्या महत्त्वाच्या ठिकाणी पोहोचल्यानंतरच टोपी घातली जाते, असेही चित्र आहे. जुन्या

कर्मचाऱ्यांकडून नियमांचे पालन होताना दिसते; मात्र नव्या भरतीतील कर्मचाऱ्यांकडून टाळाटाळ होत असल्याची चर्चा आहे.

वर्दीवर जॅकेट उपस्थिती लपवण्याचा प्रयत्न?

शहरात पोलिसांचा दृश्यमान वावर राहावा म्हणून वरिष्ठांकडून वर्दीतच ये-जा करण्याचे निर्देश आहेत. मात्र अनेक पोलिस कर्मचारी वर्दीवर जॅकेट घालून प्रवास करताना दिसतात. त्यामुळे त्यांची ओळख सामान्य नागरिकांना होत नाही. काही जणांच्या मते, पोलिसांवर आधारित चित्रपटांचा प्रभावही या बदलामागे असल्याचे सांगितले जाते.

डीबी व गुन्हे शाखेला सूट; पण अतिरेक?

गुन्हे शाखा व तपास पथकातील (डीबी) पोलिसांना साध्या पोशाखात काम करण्याची मुभा असली तरी वर्षानुवर्षे त्याच विभागात काम करणारे अनेक कर्मचारी बंदोबस्त वगळता कधीच पूर्ण गणवेशात दिसत नाहीत. परिणामी, पोलिसांची रस्त्यावरची उपस्थिती कमी भासते.

जे स्वतःच्या गणवेशाची काळजी घेऊ शकत नाहीत, ते आमच्या सुरक्षेची किती काळजी घेतील? असा प्रश्न आता सर्वसामान्यांकडून उपस्थित होत आहे. खाकी ही केवळ वर्दी नसून जनतेच्या विश्वासाचे प्रतीक आहे. त्या विश्वासाला तडा जाऊ नये, यासाठी पोलिस दलाने शिस्तीचा धागा पुन्हा घट्ट पकडण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

अंतोरा येथे समाधान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

वर्धा/जनमाध्यम

ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी तसेच जनतेच्या तक्रारींचे त्वरित निवारण करण्याच्या उद्देशाने महसूल विभागाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' आष्टी तालुक्यातील अंतोरा येथे आयोजित करण्यात आले. या शिबिरास नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

आष्टीच्या तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लहान आर्वीचे सरपंच सुनील साबळे आदी उपस्थित होते. या शिबिरात नागरिकांना विविध प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. यामध्ये रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, भूमिहीन दाखले, उत्पन्न दाखले, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र, नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र, केंद्रीय जात प्रमाणपत्र, घरकुल मंजूर प्रमाणपत्र, ई-राशन कार्ड तसेच संजय गांधी योजनेतील लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

तसेच कलम १५५ अंतर्गत आदेश, कलम ८५ अंतर्गत आपसी वाटणीचे आदेश व कलम १४३ नुसार रस्त्याचे आदेश अशा विविध प्रकारचे आदेशही देण्यात आले. यावेळी तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांनी उपस्थित नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. या शिबिरात एकूण १०५ लाभार्थ्यांना विविध सेवा देण्यात आल्या.

तसेच अभियान कालावधी सुरू झाल्यापासून १८ फेब्रुवारी ते १४ मार्च पर्यंत महाऑनलाइन पोर्टलवरून ९०६ विविध सेवा व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे.

सत्कारातून समाजाला नवी ऊर्जा : आ. अभिजीत वंजारी

चानकी कोपरा/जनमाध्यम

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींचा समाज जेव्हा सन्मान करतो, तेव्हा तो केवळ व्यक्तीचा गौरव नसतो तर समाजाला सत्कार्याची प्रेरणा देणारा क्षण असतो, असे मत पदवीधर संघ नागपूरचे आमदार अभिजीत वंजारी यांनी व्यक्त केले. रमाविलास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोक झाडे यांच्या गौरव समारंभात ते बोलत होते. सेवाग्राम येथील नक्षत्रम लॉन येथे स्व. जिजामाता सभा, विविध शैक्षणिक संस्था, वर्धा कला महोत्सव आणि सामाजिक संघटनांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रमेशचंद्र वर्मा होते. नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, सामाजिक कार्यकर्ते विजय आगलावे, राजेंद्र शर्मा, किशोर चौधरी, विलास आगे, संस्थेचे उपाध्यक्ष अतुल झाडे, सचिव अजय झाडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनी अशोक झाडे यांच्या कार्याचा आढावा घेत, ते केवळ व्यक्ती नसून एक संस्था आहेत, असे गौरवोद्गार काढले. विविध सामाजिक संघटनांद्वारे करण्यात आलेले त्यांचे कार्य समाजाला प्रेरणा देणारे असल्याचेही त्यांनी नमूद केले. राजेंद्र शर्मा व विजय आगलावे यांनीही त्यांच्या योगदानाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन संदीप चिचाटे यांनी, तर प्रास्ताविक गजानन बुरांडे यांनी केले. प्रारंभी गायिका प्रांजली गायकवाड हिने सादर केलेल्या गीतांनी वातावरण भारावून गेले, तर आशिष पोहणे यांच्या आकर्षक रांगोळीने कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

संत पैकाजी महाराज संघटना, लायन्स क्लब गांधी सिटी, कलास्पर्श फाउंडेशन, प्रगती संगीत विद्यालय, उत्साही ग्रुप आदी संघटनांनी अशोक झाडे यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी प्राचार्य किशोर चौधरी, मुख्याध्यापक बेबी बुरांडे, माजी मुख्याध्यापक नरेंद्र बुरांडे आणि राजेंद्र पंधरे यांनी सहकार्य केले.

देवळीत दावत-ए-इफ्तार; सर्वधर्मीय ऐक्याचा संदेश

देवळी/जनमाध्यम

पवित्र रमजान महिन्यानिमित्त देवळी येथे आयोजित दावत-ए-इफ्तार कार्यक्रमात सर्वधर्मीय ऐक्य, बंधुभाव आणि शांततेचा संदेश देण्यात आला. भाजप प्रदेश उपाध्यक्ष तथा खासदार रामदास तडस यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला विविध समाजघटकांतील मान्यवर व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी बोलताना खासदार तडस म्हणाले, रमजान महिना हा संयम, दया, परोपकार आणि बंधुभाव शिकवणारा असून समाजात शांतता व एकात्मता टिकवण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. या कार्यक्रमामुळे विविध धर्मीयांमध्ये परस्पर सन्मान व संवाद वाढण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास जामा मशिदीचे इमाम हाफीज भाई, मस्जिद-ए-मोहमद्दिया येथील मौलाना साजिद भाई, हबीब खान पठाण, हमीद भाई, जब्बारभाई, अयुब पटेल, नईम भाई, जमिल भाई, समीर शेख यांच्यासह नगरसेवक विलास जोशी, रवि कारोटकर, उमेश कामडी, प्रमोद ढोक, संतोष भोयर, गणेश पिंपळकर, कुर्जेकर, ज्योती खाडे, विश्वजीता पोटदुखे, ललिता धुर्वे आदी उपस्थित होते. इफ्तारच्या वेळी सर्वांनी एकत्रित प्रार्थना करून देशात शांतता, समृद्धी व बंधुभाव टिकून राहावा, अशी प्रार्थना केली. त्यानंतर सर्वांसाठी इफ्तारची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन कारोटकर यांनी केले, तर आभार उमेश कामडी यांनी मानले.

युवाच घडवतील राष्ट्रीय एकात्मतेचा सेतू : कॅप्टन गुजरकर

वर्धा/जनमाध्यम

जात, धर्म, भाषा आणि प्रांताच्या नावावर समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न काही विघातक शक्तींकडून होत असून हा देशासाठी अत्यंत धोकादायक आहे. शत्रूच्या थेट हल्ल्यापेक्षा समाजातील अंतर्गत फूट अधिक घातक ठरू शकते. अशा परिस्थितीत राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्याचे सामर्थ्य केवळ युवा पिढीतच आहे, असे प्रतिपादन प्रहार समाज जागृती संस्थेचे अध्यक्ष व एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर यांनी केले.

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विशेष शिबिरात 'युवा व राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर स्वयंसेवकांशी संवाद साधताना १४ मार्च रोजी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एनएसएस कार्यक्रम अधिकारी व शिबिर प्रमुख प्रा. डॉ. बालाजी चिरडे होते, तर मंचावर सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. हेमचंद्र ससाने आणि प्रा. डॉ. विधु खरे दास उपस्थित होते. भाषणाच्या प्रारंभी त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा संदर्भ देत युवकांना देशाचे शिल्पकार व भवितव्य घडविणारे शक्तिकेंद्र असल्याचे सांगितले. युवकांमध्ये प्रचंड ऊर्जा व क्षमता असून ती विधायक कार्यासाठी वापरली, तर राष्ट्र अधिक सशक्त होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले. शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, रामप्रसाद बिस्मिल, अशफाकउल्ला खान, स्वातंत्र्यवीर सावरकर, चंद्रशेखर आझाद आणि राणी लक्ष्मीबाई यांसारख्या क्रांतिकारकांपासून प्रेरणा घेऊन युवकांनी देशसेवेचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहनही त्यांनी केले. जात-धर्माच्या पलीकडे जाऊन प्रथम भारतीय ही भावना अंगीकारून राष्ट्रसेवा हे सर्वोच्च कर्तव्य मानावे, असेही ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात डॉ. बालाजी चिरडे यांनी स्वयंसेवकांनी समाजसेवा व आपत्ती व्यवस्थापनाबाबत सजग राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन स्वयंसेवक राणाप्रताप राय यांनी केले, तर श्रेयांशी सतरूपा हिने आभार मानले. या वेळी एनएसएसचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दारू पिऊन बेधुंद ड्रायव्हिंग

वर्धा/जनमाध्यम

शहरात दारू पिऊन वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी धडक मोहीम राबवत दोन चालकांवर गुन्हा दाखल केला.

१४ व १५ मार्च रोजी वाहतूक नियंत्रण शाखेच्या मार्शल पथकाने आंबेडकर चौक व अंबिका चौक परिसरात विशेष वाहन तपासणी मोहीम हाती घेतली होती.

तपासणीदरम्यान MH 32AY 2551 या वाहनाचा चालक संजय भाऊराव येरचे (४५, रा. हवलदारपुरा, वर्धा) हा वाहन झिगझॅग पद्धतीने चालविताना आढळला. तसेच MH 31 BU 1688 या वाहनाचा चालक मनोज किशोरराव गडवार (४०, रा. वर्धा) हे देखील संशयास्पद स्थितीत वाहन चालविताना दिसून आले. दोन्ही चालकांना ताब्यात घेऊन वाहतूक शाखेत आणण्यात आले. ब्रेथ ॲनालायझर चाचणी केली असता अल्कोहोलचे प्रमाण आढळले. त्यानंतर मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

संबंधित दोन्ही वाहने जप्त करण्यात आली आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या आदेशानुसार करण्यात आली.

दरम्यान, वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी नागरिकांनी दारू पिऊन वाहन चालवू नये, वाहतूक नियमांचे पालन करावे आणि अपघात टाळण्यासाठी जबाबदारपणे वाहन चालवावे, असे आवाहन केले आहे.

थकबाकीदारांवर महावितरणची 'धडक मोहीम'

बिल न भरल्यास तातडीने वीज खंडित; चोरटी जोडणी केल्यास फौजदारी गुन्हा

नागपूर / वर्धा जनमाध्यम

आर्थिक वर्षाचा शेवट जवळ येत असताना महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) नागपूर परिमंडळाने थकीत वीजबिल वसुलीसाठी व्यापक आणि कठोर मोहीम सुरू केली आहे. परिमंडळ थकबाकीमुक्त करण्याच्या उद्देशाने थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा तातडीने खंडित करण्याचे आदेश देण्यात आले असून, वीज कापल्यानंतर अनधिकृतपणे पुन्हा जोडणी करणाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा कडक इशारा प्रशासनाने दिला आहे.

महावितरणच्या माहितीनुसार, नागपूर व वर्धा जिल्ह्यात थकीत वीजबिलांची रक्कम मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असून आर्थिक वर्षाअखेरीस वसुली वाढवण्यासाठी 'धडक ॲक्शन प्लॅन' राबविण्यात येत आहे. यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह तांत्रिक, लेखा व मानव संसाधन विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. ही पथके प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन थकबाकीदारांची भेट घेत आहेत व त्यांना देयके तातडीने भरण्याचे आवाहन करत आहेत.

मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंते अमित परांजपे, संजय वाकडे आणि स्मिता पारखी यांच्यासह कार्यकारी अभियंते स्वतः कारवाईवर देखरेख ठेवत आहेत. थकबाकी न भरल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित केला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर संपूर्ण थकबाकी आणि पुनर्जोडणी शुल्क भरल्याशिवाय वीजपुरवठा पूर्ववत केला जाणार नाही.

सुट्टीच्या दिवशीही केंद्रे सुरू

ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी मार्चअखेरपर्यंत शनिवार, रविवार तसेच इतर सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशीही महावितरणची सर्व अधिकृत वीजबिल भरणा केंद्रे पूर्णवेळ सुरू ठेवण्यात येणार आहेत. नोकरदार व व्यावसायिकांना सुट्टीच्या दिवशीही बिल भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. याशिवाय संकेतस्थळ, मोबाईल ॲप आणि 'महा पॉवर पे' वॉलेटद्वारे २४ तास ऑनलाइन भरणा करता येणार आहे.

ऑनलाइन भरण्यावर सवलत

ऑनलाइन पद्धतीने बिल भरल्यास दरमहा ५०० रुपयांच्या मर्यादेत ०.२५ टक्के सवलत दिली जाते. तसेच बिलाची रक्कम मुदतीपूर्वी भरल्यास अतिरिक्त १ टक्का 'प्रॉम्प्ट पेमेंट' सवलतही मिळणार आहे. ग्राहकांनी या सुविधांचा लाभ घेऊन थकीत बिलांचा निपटारा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

चोरटी जोडणी केल्यास गुन्हा

वीजपुरवठा खंडित केल्यानंतर अनधिकृतपणे वीज जोडल्यास ते वीज चोरीचे प्रकरण मानले जाईल व संबंधितांवर थेट पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात येतील, असे महावितरणने स्पष्ट केले आहे.

अखंडित वीजपुरवठा हा ग्राहकांचा हक्क असला तरी वेळेवर बिल भरणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे नमूद करत प्रशासनाने नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. मार्च अखेरपर्यंत ही मोहीम अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याने थकबाकीदारांनी तातडीने देयके भरून कठोर कारवाई टाळावी, असेही सांगण्यात आले.

संक्षिप्त

'सांज पाडवा'ची संगीतमय मैफल

हिंगणघाट - मराठी नववर्षाच्या स्वागतासाठी संस्कार भारती हिंगणघाटच्या वतीने 'सांज पाडवा' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक एसएसएम (कन्या) विद्यालयाच्या प्रांगणात सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होणार असून शहरातील रसिकांसाठी सांस्कृतिक पर्व ठरणार आहे. वर्धा येथील गायक नितीन वाघ आणि गायिका केतकी कुलकर्णी यांची सुरेल मैफल यावेळी रंगणार आहे. भावगीत, गझल, सुगम संगीत तसेच नववर्षाच्या स्वागताची निवडक गीते सादर केली जाणार आहेत. संस्कार भारतीचे कार्यकर्ते रमेश धारकर, संजय देशपांडे आणि डॉ. मोहन खेतल यांनी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मराठी संस्कृतीच्या या उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन केले आहे.

साळ्याने जावयावर काठीने हल्ला

वर्धा - किरकोळ कारणावरून साळ्याने जावयावर काठीने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना इंदिरानगर झोपडपट्टी परिसरात घडली. संजय जाधव (३६) हे कॅन्टीनवर बसले असताना त्यांचा साळा अमोल सातपुते तेथे आला. तू तुझ्या मुलांना का मारतोस या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वाद चिघळताच सातपुते याने शिवीगाळ करत काठीने मारहाण केली. या हल्ल्यात जाधव जखमी झाले. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. जखमी जाधव यांच्यावर उपचार करण्यात आले असून त्यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

अवैध रेती वाहतुकीवर धडक कारवाई

समुद्रपूर - विनापरवाना रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर पोलिसांनी कारवाई करून सुमारे १० लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला. गस्ती दरम्यान वायगाव गोंड मार्गावर संशयित ट्रॅक्टर अडवून तपासणी करण्यात आली. तपासात ट्रॉलीमध्ये रेतीची अवैध वाहतूक होत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी ट्रॅक्टर, ट्रॉली आणि रेती असा मोठा मुद्देमाल ताब्यात घेतला. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली. या प्रकरणी सचिन धोटे (रा. रामनगर, समुद्रपूर) आणि कृष्णा धोटे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध उत्खनन व वाहतुकीवर कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

बसमध्ये चढताना महिलेकडील पर्स चोरी

आर्वी - बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने महिलेजवळील दागिने व रोख असलेली पर्स चोरून नेल्याची घटना बसस्थानक परिसरात घडली. वर्षा शहापुरे (३२, रा. उमरी येडे, ता. हिंगणघाट) या माहेरी जाण्यासाठी आर्वी येथे आल्या होत्या. अमरावतीकडे जाणाऱ्या बसची प्रतीक्षा करत असताना बस लागल्यावर त्या चढत होत्या. त्याच वेळी चोरट्याने त्यांची पर्स लंपास केली. पर्समध्ये रोख रक्कम आणि दागिने असा एकूण सुमारे २९ हजार रुपयांचा ऐवज होता. घटना लक्षात येताच त्यांनी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अंगणातून ३ शेळ्या व बोकड लंपास

आर्वी - घराच्या अंगणात बांधून ठेवलेल्या शेळ्या व बोकड अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना अहमदनगर शेतशिवारात घडली. शेतकरी प्रशांत वाहने (२८) हे दुग्ध व्यवसाय करतात. त्यांनी गायी-म्हशींसह ३ शेळ्या आणि १ बोकड घरासमोरील अंगणात बांधून ठेवले होते. मध्यरात्री चोरट्यांनी जनावरांच्या गळ्यातील दोर कापून सर्व जनावरे पळवून नेली. सकाळी घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. या चोरीत सुमारे ४० हजारांचे नुकसान झाले आहे. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ **अंक** - १०९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

महापालिकेच्या १३ शहरी आरोग्य केंद्रांत ‘HPV’ लसीकरण मोहिम

-हमालपुरा केंद्रात उत्साहात शुभारंभ

अमरावती/प्रतिनिधीः- राष्ट्रीय लसीकरण दिनाचे औचित्य साधून आज दिनांक १६ मार्च २०२६ रोजी अमरावती महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने शहरात एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला (Cervical Cancer) रोखण्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या एकूण १३ शहरी आरोग्य केंद्रांमध्ये व्यापक HPV लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून आज शहरी आरोग्य केंद्र, हमालपुरा येथे या विशेष लसीकरण सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन अमरावती महानगरपालिकेच्या नगरसेविका राधा कुरिल आणि नूतन भुजाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

यावेळी मार्गदर्शन करताना राधा कुरिल म्हणाल्या की, ’मुलींचे आरोग्य हेच खऱ्या अर्थाने घराचे आरोग्य असते. भविष्यातील गंभीर आजारांपासून आपल्या लेकींना सुरक्षित ठेवण्यासाठी 'HPV' लस हे एक प्रभावी सुरक्षा कवच आहे. पालकांनी जागरूक राहून आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे.’

तर नूतन भुजाडे यांनी नमूद केले की, ’कर्करोगासारख्या आजाराला प्रतिबंध घालणे आता विज्ञानामुळे शक्य झाले आहे. अमरावतीच्या १३ केंद्रांवर ही सुविधा उपलब्ध असून, सुजाण पालकांनी १४ वर्ष पूर्ण आणि १५ वर्ष पूर्ण न केलेल्या वयोगटातील आपल्या मुलींना ही लस टोचून देऊन त्यांना निरोगी आयुष्याची भेट द्यावी.’

महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी उपस्थित पालकांना लसीचे तांत्रिक महत्त्व पटवून दिले. ’कर्करोगमुक्त भविष्यासाठी ही लस मुलींना देणे काळाची गरज आहे,’ असे प्रतिपादन त्यांनी केले. ही संपूर्ण मोहीम डॉ. विशाल काळे यांच्या मार्गदर्शनात राबविली जात आहे. मोहिमेच्या यशस्वीतेसाठी मनपाचे RCH अधिकारी डॉ. स्वाती कोवे तसेच हमालपुरा केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मानसी मुकुंद मुरके यांनी विशेष परिश्रम घेतले.

या प्रसंगी हमालपुरा केंद्रावरील, पी टी एम ओ, पी एच एन,आरोग्य सेविका, एल टी.,औषधी निर्माण अधिकारी, डी ई ओ, आशा स्वयंसेविका व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या पाल्यांच्या सुरक्षित भविष्यासाठी परिसरातील पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महानगरपालिकेच्या १३ ही केंद्रांवर ही सुविधा उपलब्ध असून, सर्व पात्र मुलींच्या पालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.

शिक्षण- १२ वी पास पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)

संपर्क - ९६०७५८२०९४

प्रोसेस क. २८९/६
दि.:-०२/०३/२०२६

जाहिरनामा / सायटेशन

दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्री. ए.बी.कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक ३७७/२०२६ पुढील तारीख ०८.०४.२०२६

शहनाज बी व इतर विरूध्द निरंक

अर्जदार-**1. Shahanaz Bi Sayyad Yunus** Age: 70 yrs, Occ-Household
R/o Near Madrasi Baba, Haiderpura Amravati
2. Shaheen Bi Jamil Baig Age-55 yrs Occ-Housewife
R/o Biyani Road Chaman Chhawani, Camp Amravati
3.Mushtaque Ali Sayyed Usman Age-45 yrs Occ-Labour
R/o Near Sonia Gandhi School Chaman Shaha Wali Camp Amravati

विरुध्द-गैरअर्जदार-निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत सयद उस्मान अलि सयद रहेमान आणि तहेरा बी सयद उस्मान** हे अनुक्रमे दि.२६.०७.२०२४ व १६.०१.२०२२ रोजी अमरावती, येथे मयत झाले. अर्जदार शहनाज व इतर विरूध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा **शहनाज व इतर विरूध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. ०२.०३.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती

प्रोसेस क. ४०६६
दि.:-०२/०३/२०२६

जाहिरनामा / सायटेशन

दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक ३७५/२०२६ पुढील तारीख १३.०४.२०२६

श्रीमती. शेख मुस्ताक विरूध्द निरंक

अर्जदार- **1. Shaikh Mushtaque Shaikh Shaikhji** Age 45 yrs, Occu. Labour, R/o. Galli No.4 Chaman Nagar Juni Vasti Badnera mdapur Amravati. Tq. & Dist. Amravati.

विरुध्द-गैरअर्जदार- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत शेख शेखजी शेख जम्मू** हे २८.०५.२०२१ रोजी अमरावती ता.जि अमरावती येथे व **मयत शहजादी बी शेख शेखजी** हया १४.०८.२०१६ हया अमरावती ता.जि. अमरावती येथे मयत झाले. अर्जदार शेख मुस्ताक विरूध्दध निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा **श्रीमती. शेख मुस्ताक विरूध्द** निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. ०२.०३.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

आदेशानुसार
सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती

अमरावती महानगरपालिका, अमरावती
सहाय्यक संचालक नगर रचना

जाहीर सूचना

मौजा शेगांव सर्व्हे क्र.२/२ मधील ०.३८ हे.आर जागा महानगरपालिका मालकीची आहे. या जागेवर स्मशानभुमीचे आरक्षण प्रस्तावित आहे. सदर जागेच्या गाव नमुना ७/१२ वर महानगरपालिका मालकीची नोंद आहे. तसेच मौजा शेगांव सर्व्हे क्र.२/१ (सर्व्हे क्र.२ भाग) या जागेचा अभिन्यास एन.ए.पी.३४/शेगांव/३८/८८-९८, दिनांक २६.१०.१९८९ अन्वये मंजूर आहे. या अभिन्यासामध्ये २८४७.५० चौ.मी. क्षेत्राची सार्वजनिक वापराची (Open Space) दर्शविलेली आहे व या अभिन्यासामधील भूखंड क्र.८१/२ क्षेत्र १०२.०६ चौ.मी. जागा महानगरपालिका मालकीची आहे.

उक्त महानगरपालिका मालकीची जागा व सार्वजनिक वापराची (Open Space) यावर सिटी सर्व्हे शेगांव शिट क्र.१७ नगर भूमापन क्र.९९५, ९९६, ९९७, ९९८, ९९९, १०००, १००१, १००२, १००३, १००४, १००५, १००६, १००७, १००८, १००९ व शिट क्र.१८ नगर भुमापन क्र.११८८, ११८९, ११९०, ११९२ हे खाजगी मालकीचे प्लॉट चुकीने भुमी अभिलेख विभागाकडून दर्शविलेले आहेत. तसेच या अभिन्यासामधील इतर खाजगी भूखंडावर गैरअर्जदार यांचे नगर भुमापन क्रमांकाचे इतर व्यक्तीचे प्लॉट दर्शविलेले आहेत.

उक्त महानगरपालिकेची मालकीची जागा व सार्वजनिक वापराची जागा बेकायदेशीर ताब्यात घेतलेली आहे.

उक्त जागेबाबत कोणीही खरेदी-विक्रीचा व्यवहार करु नये अथवा बांधकाम करु नये. सदर जागेचा व्यवहार केल्यास अथवा बांधकाम केल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील, याची नोंद घ्यावी.

सहाय्यक संचालक नगर रचना
महानगरपालिका, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४३७/२०२६
चिंतामणराव अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.२७.०३.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
१. चिंतामणराव भदुजी हिवे, वय ८२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.छाबडा प्लॉट जवळ, मुदलियार नगर, रुक्मिणी नगर, अमरावती
२. राजू सदाशिवराव हिवे, वय ५९ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. अनिल सदाशिवराव हिवे, वय ५२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
४. शोभा हरिराम अवघड, वय ८१ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.वाकी, पो.वाकी रायपूर, ता.भातकुली, जि.अमरावती-४४४८०४
५. देविदास भदुजी हिवे, वय ७१ वर्षे, व्यवसाय -मजुरी
६. निर्मला आनंदराव कापडे, वय ६८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.चिखली, दारव्हा, यवतमाळ
७. अशोक भदुजी हिवे, वय ६३ वर्षे, व्यवसाय - मजुरी
अर्जदार नं.२, ३, ५ व ७ रा.धनगरपुरा, नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती
८. पद्मावती श्रावण हिवे, वय ६९ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.गणेश नगर जवळ, सरोज कॉलनी, अमरावती
९. सुधीर श्रावण हिवे, वय ४९ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.सरोज कॉलनी, सुतगिरणी रोड, साईनगर, अमरावती-४४४६०४

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत भदुजी विठ्ठुजी हिवे** हे दिनांक 24.08.2000 रोजी **नांदगांव पेठ, अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **चिंतामणराव भदुजी हिवे अधिक आठ** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चिंतामणराव भदुजी हिवे अधिक आठ** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **११.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीर नोटीस

सर्व लोकांना सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील नमुद स्थावर मालमत्ता (शेतजमिन) **भावरीबाई अर्जुनलालजी बावळे, रा. अजनी, नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** यांच्याकडून खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे. **शेतजमिनीचे वर्णनः** नोंदणी पोट तुकडी नांदगाव खंडेश्वर वि. कचेरीचे कक्षेतील व जि.प. अमरावतीचे हद्दीतील ग्रामपंचायत अजनी असलेले मौजे-अजनी, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथील शेत भुमापन क्रमांक व उपविभाग क्र.६८/२, भो. वर्ग-१, मधील ५ हे. ९४ आर, आकार रू.९९.०० पैसे शेतजमिन असून यापैकी माझे मालकीचे व ताब्यातील ज्याचा खाते क्र.८५ असून याचे एकूण क्षेत्रफळ १ हेक्टर ९१ आर. आ. रू.६.२१ पै. काळी कोरडवाहू शेतजमिन झाडाझुडपासह व इतर तदंगभूत वस्तूंसह या शेताची चर्तुःसिमा. पुर्वस-संगीता घाटे यांचे शेत, पश्चिमेस राजु बावळे यांचे शेत, उत्तरेस संजय बावळे यांचे शेत, दक्षिणेस-शिव रस्ता. उपरोक्त नमूद शेतजमिनीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, गहाण, बोझा, वारसहक्क, जप्ती, कर्ज, ताबा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, सरकारी, निमसरकारी कर्ज, न्यायालयीन प्रकरण, वादविवाद, लिज पेन्डट अथवा कोणत्याही कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसांचे आत पूर्ण लेखी पुराव्यासह कागदोपत्री वरील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा. मुदती नंतर माझे पक्षकार सदहू शेतजमिनीची खरेदी करण्यास स्वतंत्र राहतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी. याकरीता **सदर जाहीर नोटीस.**

ठिकाण :- अमरावती
दिनांक :- १६/०३/२०२६

ॲड. बी.एस.तिवारी
मातृकृपा, मोरबाग, अरूण होस्टेल जवळ
अमरावती, मो.९४०५३५०८११

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९५/२०२६
माधवी अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.२४.०३.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Smt.Madhavi Mangesh Halwe, Age 52 Yrs. Occu.: Housewife
2. Ku.Snehal Mangesh Halwe, Age 24 Yrs. Occu.: Student
1 & 2 R/o Narayan Nagar, Po. Rukhmini Nagar, Amravati.
3. Sau.Shweta Mandar Joshi, Age 26 Yrs. Occu.: Housewife
R/o Raj Vaibhav, Aadarsh Nagar, Malkapur, Dist.Buldhana-443101

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मृतक** Mangesh Rambhau Halwe हे दिनांक 02.07.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Madhavi Mangesh Halwe + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Madhavi Mangesh Halwe + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीर सुचना

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **रमेश रामरावजी वानखडे, रा.पोटे टाऊनशिप नं.४,** कठोरा रोड, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी प्रविण बिल्डर्स, प्रविणकुमार रामचंद पोटे, अमरावती तर्फे मुखत्यार प्रदीपकुमार मोरेश्श्वर डाखणे यांचेकडून नोंदणी तुकडी अमरावती व पोटतुकडी अमरावती व ग्रामपंचायत कठोरा बु. कक्षेतील मौजे कठोरा बु. प्रगणे-नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती शेत सर्व्हे नं.४५/१, ४५/२-सी, ५३/४ मा.उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे रेव्हेन्यू के.नं. रामाक्र.३४/कठोरा बु.-०९/२००४-०५ दिनांक ०२.०७.२००५ नुसार मंजूर झालेले लेआऊट मधील श्री.गजानन टाऊनशिप ४ मधील प्लॉट नं.७१-बी याचे एकुण क्षेत्रफळ १५५० चौ.फुट (१४४.५० चौ.मी.) वरील उभारलेले घर ज्याचे क्षेत्रफळ १०१२.०० चौ.फुट (९४.०० चौ.मी.) याचे नोंदणीकृत खरेदीखत नोंदणी क्र.१४०/२००९, दिनांक १७.०१.२००९ रोजी खरेदी केलेले आहे.

माझे पक्षकार यांचेकडून सदरच्या मकानाची मुळ नोंदणीकृत खरेदीखत नोंदणी क्र.१४०/२००९, दिनांक १७.०१.२००९ हे बॅंकेच्या कामाचे वेळी कॉटन मार्केट कडून पोटे टाऊनशिपला जात असतांना कुठेतरी गहाळ झालेले आहे. सदर मूळ खरेदीखत गहाळ झाल्याबाबत माझे पक्षकाराने दिनांक १६.०३.२०२६ रोजी पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती येथे तक्रार नोंदविलेली आहे. सदरचे मूळ खरेदीखत गहाळ/हरविले गेल्यामुळे सदर मकानाचे कुणीही मुळ खरेदीखत दाखवून कोणताही अधिकार निर्माण करीत असल्यास त्यांचेशी कोणताही व्यवहार करु नये तसेच कोणताही हक्क प्रस्थापित करु नये. तसे केल्यास सदरचा व्यवहार हा गैरकायदेशीर समजण्यात येईल.

वर वर्णनीत मकानाची मूळ खरेदीखत दाखवून कोणीही कोणताही खरेदी-विक्रीचा व्यवहार, गहाण, बोझा व इतर व्यवहार करु नये. केल्यास तो व्यवहार माझे पक्षकारास बंधनकारक राहणार नाही व होणाऱ्या नुकसानास आपण स्वतः जबाबदार राहाल, करीता जाहीर सूचना.

दिनांक १६.०३.२०२६

(ॲड.प्रविण एन.बिजवे)
पोटे टाऊनशिप, कठोरा रोड,
अमरावती
पक्षकाराकरीता अधिवक्ता

तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

क्र. रामाक्र/२/एमआरसी-८१/पार्डी/२०२५-२०२६

जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **नागोराव किच्चु बायस्कर,** रा.चिंचोली गवळी, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे वडील **किच्चु सोनाजी बायस्कर,** मृत्यूची नोंद ग्रामपंचायत पार्डी ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.पार्डी येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल करावा. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक २५.०२.२०२६

शिक्का

स्वा/-
तहसीलदार, मोर्शी

तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

क्र. रामाक्र/४/एमआरसी-८१/काटपूर/२०२५-२०२६

जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शाहीन बानो अब्दुल सत्तार,** यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत काटपूर ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.काटपूर येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय काटपूर येथे स्वतःचे जन्म दि.०७.११.१९९० रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल करावा. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक

शिक्का

स्वा/-
तहसीलदार, मोर्शी

जाहीर नोटीस

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.२०२/२०२६ ने.ता.२१.०४.२०२६

अर्जदार -
१. श्री.विजयराव नारायणराव कडू, वय ५९ वर्षे, धंदा - **शेती**
रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. श्रीमती ललीता दिलीपराव खेरडे, वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.माळीपुरा, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.वनमाला हरिभाऊ कांडलकर, वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांची आई नामे **तुळसाबाई नारायणराव कडू** हे दि.**२८.१२.२०२१** रोजी **अंबाडा**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १३.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जाहीर नोटीस

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.२०८/२०२६ ने.ता.२१.०४.२०२६

अर्जदार -
१. श्री.अनिल बापुरावजी बिजवे, वय ४४ वर्षे, धंदा - शेती
२. श्री.देविदास बापुरावजी बिजवे, वय ३१ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. श्री.अतुल बापुरावजी बिजवे, वय ३८ वर्षे, धंदा - व्यवसाय
रा.छायानगर, अमरावती, ता.जि.अमरावती
४. **सुरेशराव बापुराव बिजवे** मयतांचे वारस
४अ) श्रीमती सुनिता सुरेशराव बिजवे, वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
४ब) जयकुमार सुरेशराव बिजवे, वय २७ वर्षे, धंदा - शेती
४क) पवन सुरेशराव बिजवे, वय २४ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. **केशवराव बापुराव बिजवे** मयतांचे वारस
५अ) श्रीमती सुनिता केशवराव बिजवे, वय ४९वर्षे, धंदा - घरकाम
५ब) कुणाल केशवराव बिजवे, वय २१ वर्षे, धंदा - शिक्षण
५क) कु.वृषाली केशवराव बिजवे, वय २२ वर्षे, धंदा - शिक्षण
सर्व रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
५ड) सौ.निकिता निकेश श्रीराव, वय २४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.काकदरा, पो.तळेगांव, ता.आष्टी, जि.वर्धा

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार १ ते ३ चे वडील तर अर्जदार नं.४अ व ५अ चे सासरे तर अर्जदार नं.४-ब, क तसेच अर्जदार नं.५ ब, क, ड) यांचे आजोबा नामे **बापुराव बळीराम बिजवे** हे दि.**२३.०५.२०२२** रोजी त्यांचे राहते घरी **अंबाडा**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. तसेच १ ते ३ चे ची आई तर अर्जदार नं.४अ व ५अ चे सासू तर अर्जदार नं.४-ब, क तसेच अर्जदार नं.५ ब, क, ड) यांची आजी नामे **वेणुबाई बापुराव बिजवे** हे दि.**०५.०८.२०२५** रोजी त्यांचे राहते घरी **अंबाडा**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळ्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १३.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जाहीर नोटीस

P.No.415/2025

अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-६ यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५०/२०२६ ने.ता.०२.०४.२०२६

अर्जदार :
1. Pankaj Haridas Chopkar, Age 40 Yrs. Occu.: Pvt.Job
2. Sau.Bharti Pankaj Chopkar, Age 32 Yrs. Occu.: Household
3. Rahul Haridas Chopkar, Age 35 Yrs. Occu.: Farmer
All R/o At Post. Shivani Rasulapur, Tq.Nandgaon Khandeshwar, Dist. Amravati-444708

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

Application in the Matter of Adoption of the Child Female Under Section 60(1) of the Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2015 (2 of 2016) Read with Regulations 53, 54 and 55 of the Adoption Regulations.

ज्याअर्थी वरील अर्जदार क.१ व २ यांना नित्या राहुल चोपकर हिला अर्जदार नं.३ यांनी दत्तक देण्याकरीता जिल्हा व सत्र न्यायाधीश-६, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

सदर अर्जात अर्जदार नं.३ यांची मुलगी नित्या हिचे नैसर्गिक वडील आहेत. मुलगी नित्या हिला अर्जदार नं.१ व २ हे दत्तक घेणार आहेत. तसेच नित्या हिचे नांव जन्म प्रमाणपत्रात बदलविण्याची परवानगी मिळण्याबाबत वरील अर्जदारांनी विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालय-६, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक ०२.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-६, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हु अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दि. / /२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला.

शिक्का

आदेशानुसार,
सहा.अधीक्षक(न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय ,
अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 82/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **भारतीय उत्कर्ष मंडळ, बालाजी अमरावती एफ-१०३५**
बाबत अर्जदार - **जयंत प्रकाशराव बेलोरकर**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत (वर्णन) - काही नाही
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - मौजा अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती येथील जुना शेत सर्व्हे नं.२२, २३, २४ मधील प्लॉट नं.१३ नवीन नझुल शिट नं.५-ए, प्लॉट नं.२००/१३ एकुण क्षेत्रफळ ३०१.९४ चौ.मी.(३२५० चौ.फुट) याची चतुःसिमा - पुर्वेस - श्री.ढमाले यांचा प्लॉट, पश्चिमेस - रोड, उत्तरेस - श्री.मनोहर महाजन यांचा प्लॉट, दक्षिणेस - रस्ता

स्थावर मालमत्ता अंदाजे किंमत - रु.४,०१,५८०/- (चार लाख एक हजार पाचशे ऐंशी रु.)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १३.०३.२०२६ रोजी दिली.

शिक्का

अधीक्षक,(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.१११/२०२६ ने.ता.०४.०४.२०२६

अर्जदार : १. सौ.आशा विश्वास बेहरे
वय ६९ धंदा - गृहिणी
रा.डोबन पुरा, शिरजगाव कसबा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक कौसल्या मोतीराम घायर** यांचा मृत्यू दिनांक **११.१२.२०२०** रोजी रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१११/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**०९.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
.डी.बी.गुल्हाने
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १८८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

विद्यार्थ्यांच्या हितासाठी चंद्रशेखर भोयर यांनी शिक्षणमंत्र्यांची घेतली भेट

अमरावती/का.प्र.

राज्यात वाढत असलेल्या तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून वार्षिक परीक्षा लवकर घेण्याची मागणी शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी केली. यासाठी त्यांनी आज शालेय शिक्षण मंत्री मा. दादाजी भुसे यांची भेट घेऊन

निवेदन सादर केले.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या नियोजनानुसार इयत्ता २ री ते ८ वीच्या परीक्षा एप्रिल महिन्यात होणार आहेत. मात्र एप्रिलमध्ये उष्णतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे भोयर यांनी निवेदनात नमूद केले.

विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील अनेक विद्यार्थी दूरवरून पायी किंवा सायकलने शाळेत येतात. तसेच तीव्र उष्णतेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता वार्षिक परीक्षा २३ मार्च २०२६ ते १० एप्रिल २०२६ या कालावधीत घेण्याबाबत आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी चंद्रशेखर भोयर यांनी केली.विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून शासनाने या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

जी एच रायसोनी विद्यापीठात ६० विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटमध्ये यश

अमरावती/का.प्र.

जी एच रायसोनी विद्यापीठ (जीएचआरयू), अमरावती येथे नुकत्याच आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये ६० विद्यार्थ्यांना विविध प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. ही उपलब्धी विद्यापीठासाठी अभिमानास्पद आहे.

हे प्लेसमेंट मुख्यतः इंजिनीअरिंग, मॅनेजमेंट, सायन्स आणि फार्मसी यासारख्या विविध शाखांमधील विद्यार्थ्यांनी मिळवले आहेत. या प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये हेक्सावेअर टेक्नॉलॉजीज, टीसीएस, विप्रो, एकेडमोर, एचसीएल टेक, अपग्रेड, पीएचएन टेक्नॉलॉजी, कॉग्निजंट, जस्ट डायल, ओकलंड सिस्टम्स प्रायव्हेट लिमिटेड - मेडनेट लॅब्स, एल अँड टी टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लिमिटेड, लेबेन लाइफ सायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड, एमईबी फार्मा प्रायव्हेट लिमिटेड, नितिका फार्मास्युटिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, झिम लॅबोरेटरीज, रिव्हॅटेज अँडव्हायझरी अँड रिअल्टर्स एलएलपी, ॲक्सिस बँक, एचडीएफसी बँक,आयटी रत्न टेक्नॉलॉजी, सनसीड पॉवर इंडिया लिमिटेड, इंडियामार्ट, मुथूट फायनान्स लिमिटेड, सीझफायर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, लुपिन लिमिटेड, एनपी-एव्ही नेट प्रोटेक्टर या प्रमुख कंपन्यांचा समावेश होता. ज्यांनी वेग वेगळ्या फेरीत विद्यार्थ्यांची निवड केली।विद्यापीठाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलने या यशात महत्त्वाची भूमिका बजावली. सेलने व्यापक प्रशिक्षण कार्यक्रम, मॉक इंटरव्ह्यू, ॲप्टिट्यूड टेस्ट आणि स्किल डेव्हलपमेंट सत्रे आयोजित केली, ज्यामुळे विद्यार्थी भरती प्रक्रियेसाठी पूर्णपणे तयार झाले.

या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट आणि कुलसचिव डॉ. स्नेहिल जैस्वाल यांनी प्लेसमेंट मिळालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कठोर परिश्रम, दृढनिश्चय आणि समर्पणासाठी अभिनंदन केले. विद्यापीठ प्रशासनाने सहभागी रिक्रूटिंग कंपन्यांचे आभार मानले आणि त्यांच्या सततच्या विश्वास व सहकार्यासाठी धन्यवाद दिले.—जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे, जिथे शैक्षणिक उत्कृष्टतेला व्यावहारिक प्रशिक्षणासोबत जोडले जाते, जेणेकरून पदवीधर स्पर्धात्मक जॉब मार्केटसाठी पूर्णपणे सक्षम होऊ शकतील.

श्री रेणुकादेवी मंदिरातील दानपेट्यांची मोजणी

एकूण ६८.७९ लाख रुपयांचे उत्पन्न

माहूर/वार्ताहर

महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी एक पूर्ण पीठ असलेल्या माहूर गडावरील श्री रेणुकादेवी मंदिर येथे असलेल्या दानपेट्यांची मोजणी करण्यात आली. संस्थानचे अध्यक्ष व सचिव यांच्या आदेशानुसार तहसीलदार तथा संस्थानचे कोषाध्यक्ष अभिजीत जगताप,विश्वस्त चंद्रकांत भोपी, विश्वस्त संजय कान्नव, विश्वस्त अरविंद देव,विश्वस्त बालाजी जगत,विश्वस्त दुर्गादास भोपी,व्यवस्थापक विजय राऊत, योगेश साबळे यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडला

दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी सीलबंद करण्यात आलेल्या मंदिर परिसरातील एकूण ११ दानपेट्या उघडण्यात आल्या. यामध्ये सभामंडपातील ४ दानपेट्या, महालक्ष्मी माता मंदिरातील १, तुळजाभवानी माता मंदिरातील १, मंदिर परिसरातील २ आणि परशुराम मंदिराकडे असलेल्या ३ दानपेट्यांचा समावेश होता. सर्व

दानपेट्या उघडून त्यातील रक्कम, सोन्या-चांदीच्या वस्तूंची तपासणी संस्थानचे अधिकृत सोनार सुशील टाक यांनी केली. दानपेट्यांमधून ५००, २००, १००, ५०, २०, १० व ५ रुपयांच्या नोटा मोठ्या प्रमाणात आढळल्या. दानपेट्यां मधून मिळालेली एकूण रक्कम १७ लाख ८७ हजार ७५८ रुपये इतकी आहे.तसेच भक्तांनी अर्पण केलेल्या पिवळ्या धातूचे (सोन्याचे) सुमारे ६१ ग्रॅम ९०० मिली वजनाचे दागिने व नथ २० नग,तर पांढऱ्या धातूचे (चांदीचे) १ किलो १२९ ग्रॅम ३०० मिली वजनाचे विविध वस्तू दानपेटीतून आढळून आले.याशिवाय परशुराम पाळणे पांढऱ्या धातूचे वजन ८२१ ग्रॅम २०० मिली इतके आहे.

याशिवाय संस्थानच्या विविध माध्यमातून प्राप्त झालेल्या देणग्यांची माहिती पुढील प्रमाणे दि.११ फेब्रुवारी २०२६ ते १० मार्च २०२६ या कालावधीत मंदिरास देणगी विभागातून २० लाख २० हजार ९९१ रुपये, साडी-पातळ विक्रीतून १६ लाख ८८ हजार ७६९ रुपये, तर ऑनलाइन देणग्यांद्वारे १३ लाख ८१ हजार ९१० रुपये इतकी रक्कम प्राप्त झाली आहे.तसेच पावती प्रमाणे मिळालेल्या पिवळ्या व पांढऱ्या धातूंची स्वतंत्र नोंद करण्यात आली. त्यामध्ये पिवळ्या धातूचे ३ ग्रॅम ४८० मिली वजन, तर पांढऱ्या धातूचे १ किलो ३७९ ग्रॅम ६५० मिली वजन नोंदविण्यात आले. दरम्यान गेल्या एक महिन्यात श्री रेणुका देवी संस्थानला सर्व बाजूंनी मिळालेले एकत्रित उत्पन्न हे ६८ लाख ७९ हजार ४२८ रुपये इतके आहे तसेच मंदिर प्रशासनाने सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडल्याची माहिती संस्थानचे कोषाध्यक्ष तथा तहसीलदार अभिजीत जगताप यांनी दिली आहे.

GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

तबला वादन परीक्षेत ऋग्वेद खोडे प्रथम

तिवसा - येथील ऋग्वेद पुरुषोत्तम खोडे याने तबलावादन परीक्षेमध्ये मनमोहक तबलावादन करून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा बहुमान प्राप्त केला आहे.गंधर्व निकेतन ब्रह्मपुरी द्वारा संचालित अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मिरज मुंबई द्वारा आयोजित प्रवेशिका प्रथम तबला या विषयावर स्पर्धा घेण्यात आली होती. यामध्ये उल्लेखनीय प्रदर्शन करीत ऋग्वेद हा प्रथम श्रेणी घेऊन उत्तीर्ण झाला. ऋग्वेद ला तबलावादनाचे धडे त्याचे गुरु महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध तबलावादक लग्गीनवाज निलेश इंगळे गुरुदेव नगर गुरुकुंज मोझरी यांच्याकडून मिळाले. ऋग्वेदने आपल्या यशाचे श्रेय, आजी, वडील, आई ,बहीण यांना दिले आहे.

विद्यापीठाच्यावतीने उद्या शेतकरी प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन

अमरावती/का.प्र.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्र, यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीर व कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरूळपीर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८ मार्च, २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मंगरूळपीर येथील सांस्कृतिक सभागृह येथे शेतकरी प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री सुभाषराव ठाकरे, जिल्हा परिषद, वाशिमचे अध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरूळपीरचे सभापती चंद्रकांतदादा ठाकरे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कार्यकारी परिषद सदस्य राम ठाकरे यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे.कार्यशाळेमध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वाशिमच आरीफ शहा, प्रगती ॲग्रो एन्टरप्रायजेस, अमरावतीचे सुधीर जगताप, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे डॉ. योगेश इंगळे, डॉ. व्ही.व्ही. गौड, डॉ. विजयकुमार गावंडे हे तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. सर्वांनी या कार्यशाळेला उपस्थित राहुन तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे, बाजार समितीचे सचिव गणेश शर्मा यांनी केले आहे.

विद्यापीठात 'विद्यार्थी संवाद व गटचर्चा' कार्यक्रम

अमरावती/का.प्र.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील गृह विज्ञान विभाग व इंडियन इन्स्टिटुट ऑफ मास कम्युनिकेशन, अमरावती विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यार्थी संवाद व गटचर्चा' हा एक अनोखा विद्यार्थी केंद्री उपक्रम झाला. अध्यक्षस्थानी गृह विज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय, प्रमुख अतिथी म्हणून इंडियन इन्स्टिटुट ऑफ मास कम्युनिकेशन येथील प्राध्यापक डॉ. विनोद निताळे, डॉ. आदित्य मिश्रा, डॉ. प्रमोद गायकवाड, जयंत सोनवणे, डॉ. संयोगिता देशमुख उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ. विनोद निताळे यांनी महिला व त्यांचे विविध विषयासंदर्भात त्यांच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या दृकश्राव्य चित्रफितीमागील प्रक्रिया सांगून उदाहरणांद्वारे माहिती दिली. यावेळी चित्रफितींचे सादरीकरण देखील करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध ॲपचा वापर चित्रण, संवाद, आवाज, संपादन यासाठी करून अतिशय परिणामकारक चित्रफिती सादर करुन चित्रफितींचा विषय व त्या मागची भूमिका यावर चर्चा केली.

डॉ. आदित्य मिश्रा यांनी उपक्रमाचे कौतूक करीत अशा कार्यक्रमांद्वारे संस्थात्मक आणि विद्यार्थी सुसंवाद, विचारांची देवाणघेवाण आणि विविध विषयाचे पैलू विद्यार्थ्यांना जाणून घेता येतात असे सांगितले. डॉ. प्रमोद गायकवाड यांनी स्त्रीशक्ती यावर कविता सादर केली. जयंत सोनवणे यांनी चित्रफिती तयार करण्यासाठी आवश्यक व नवनवीन उपलब्ध तंत्रज्ञान विद्यार्थ्यांनी कसे आत्मसात करावे, यावर मार्गदर्शन करतांना समाजमाध्यमांवर प्रभावी जाहिरात करण्यासाठी रोजगार देणारे हे नवीन क्षेत्र असल्यामुळे प्रतिभा आणि कल्पकतेचा मेळ घालून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने चित्रफित निर्मिती क्षेत्रात विद्यार्थ्यांनी पुढे यावे, असे आवाहन केले.अध्यक्षीय भाषणात विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांनी महिलाविषयक प्रश्नांची जाणीवजागृती केवळ महिला दिनानिमित्त सीमित न राहता लिंग समभाव ठेवून सातत्याने विचार मंचावरून आणि माध्यमांचा अतिशय प्रभावीपणे वापर करून सुधारणावादी धोरणांचा जागर करत रहावा, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.यामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार अनुश्री आडे हिने केले. कार्यक्रमाकरिता विभागातील सुमित गेडाम, दिपाली भैसे, शिल्पा इंगोले, सुमेध वडुरकर, आयतल कामदार, क्षितिजा वानखडे, भक्ती सोंधिया, अशोक हिरे, वसंत इंगळे, चरणदास जामठे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला शिक्षक तसेच दोन्ही संस्थांमधील विद्यार्थी उपस्थित होते.

संक्षिप्त

दिल्लीतील मांजरी म्हसला ग्रामपंचायतीला राष्ट्रीय सन्मान

अंजनगाव बारी - राष्ट्रीय जल जीवन मिशन अंतर्गत देशभर साजऱ्या होत असलेल्या 'जल महोत्सव पंधरवड्या'चा भव्य समारोप दिल्ली येथील विज्ञान भवन येथे झाला. या कार्यक्रमाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मांजरी म्हसला ग्रामपंचायत यांची राष्ट्रीय पातळीवर निवड होणे हा जिल्ह्याच्या प्रतिष्ठेबाबतचा महत्त्वाचा क्षण ठरला आहे. जल जीवन मिशनची यशस्वी अंमलबजावणी, घराघरात सुरक्षित पिण्याचे पाणी पोहोचवण्यासाठी केलेले नियोजन, तसेच जल व्यवस्थापनाबाबत गावातील लोकसहभाग या बाबींमुळे ग्रामपंचायतीची निवड झाली. ग्रामपंचायतीतर्फे दिल्ली येथे गेलेल्या प्रतिनिधीमंडळात सरपंच हेमंत ढेपे, तसेच पाणी पुरवठा कर्मचारी साहेबराव राठोड जल जीवन मिशन समितीतील इतर कर्मचाऱ्यांसह त्यांनी विज्ञान भवनातील विविध सत्रांना उपस्थित राहून गावातील यशस्वी उपक्रमांची माहिती दिली.या राष्ट्रीय गौरवानंतर मांजरी म्हसला गावात आणि पंचक्रोशीत उत्साहाचे वातावरण असून ग्रामपंचायतीच्या या यशाने अमरावती जिल्ह्याचे नाव अभिमानाने उंचावले आहे.

जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेत बाल आनंद मेळावा

लेहेगाव - जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा सावरखेड पिंगळाई येथे बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.या मेळाव्याचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीच्या सर्व महिला सदस्यांनी केले. बाल आनंद मेळाव्यामध्ये सुमारे शाळेतील ५० ते ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून ४० ते ४२ स्टॉल्स लावले होते. यामध्ये ब्रेड पकोडा, पाणीपुरी, आलू बोंडे, समोसे, मुंबईची भेल, दहीपुरी, स्पेशल चिंचगोळे, आप्पे, आलू पोंगे, सँडविच, बटाटा रोल, प्रेमाचा चहा, लिंबू शरबत, गुलाब जामुन, ढोकला, उपमा, पास्ता, नागपूरची कांदा भजी, इडली, मेदुवडा, स्वादिष्ट उकडलेली बोरे, साबुदाणा उसळ, कांदा पोहे, पापड,इत्यादी अनेक पदार्थांचा स्वादिष्ट आस्वाद पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि गावकरी यांना घेता आला.विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान, व्यवसाय कसा करावा, याबाबतची प्राथमिक माहिती, विविध पदार्थांच्या रेसिपी ची माहिती आणि ग्राहक दुकानदार यांच्यातील व्यावहारिक संवाद याचा अनुभव घेता आला.आनंद मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक राजीव चव्हाण यांच्यासह जयंत पोहरे, सविता महल्ले, संगीता पोहरे, विजयसिंह ठाकूर, वंदना पुसदेकर, यांनी यथोचित प्रयत्न केले.

आज मनपाची आमसभा

अमरावती/का.प्र.

महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा १७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या सभेसाठी प्रशासकीय आणि राजकीय स्तरावर मोठी तयारी सुरू आहे.

या आमसभेत प्रशासनाकडून चार महत्त्वाचे विषय चर्चेसाठी ठेवण्यात येणार असून, त्यावर होणाऱ्या निर्णयांमुळे शहराच्या विकासाची दिशा ठरणार असल्याचे मानले जात आहे. दरम्यान, नगरसेवकांनीही या सभेसाठी कंबर कसली असून प्रशासनाकडे १०० हून अधिक प्रस्ताव आणि ४६ पेक्षा जास्त प्रश्न सादर करण्यात आले आहेत. त्यामुळे सभेत जोरदार चर्चा आणि आरोप-प्रत्यारोपांची शक्यता वर्तविली जात आहे.सभेत महापालिकेच्या शिक्षण, शहर सुधार, विधी तसेच महिला व बालकल्याण या चार महत्त्वाच्या विषय समित्यांच्या प्रत्येकी नऊ सदस्यांची निवड करण्यात येणार आहे. यासोबतच वृक्ष प्राधिकरण समितीची पुनर्रचना देखील या सभेत होणार आहे. याशिवाय महापालिका संकुलातील दुकानांच्या भाडेवाढीचा विषयही निर्णयासाठी सभेपुढे येणार आहे. भाडेवाढ किती प्रमाणात होणार, याकडे व्यापाऱ्यांसह शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. तसेच शहरातील पथदिवे व एलईडी देखभाल कंत्राटाचा प्रस्तावही मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. दरम्यान, शहरातील फेरीवाल्यांसाठी हॉकर्स धोरणाबाबतही यासभेत महत्त्वपूर्ण निर्णय होण्याची शक्यता आहे.या सभेसाठी नगरसेवकांकडून मोठ्या प्रमाणात प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. एकूणच १७ मार्चची ही आमसभा राजकीयदृष्ट्या गाजण्याची शक्यता व्यक्त होत असून, अनेक महत्त्वाच्या निर्णयांमुळे शहराच्या प्रशासकीय कामकाजावर कामकाजावर ज्यादा त्याचा परिणाम होणार आहे.

निधनवार्ता

शांताबाई खंडारे

अमरावती - लघुवेतन कॉलनी, काँग्रेस नगर रोड अमरावती येथील विजय खंडारे यांच्या मातोश्री स्व.शांताबाई वसंतराव खंडारे (वय ७८) यांचे दि १६ मार्च २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात ४ मुल, २ मुली, सूना,नातु नातवंड असा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर हिंदू स्मशानभूमी अमरावती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच नातेवाईक, मित्रपरिवार व राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे शोक व्यक्त केला.

पार्वताबाई बारागोंळे

अंजनगाव बारी - येथील नेहरू चौक स्थित पार्वताबाई शंकरराव बारागोंळे (७०) यांचे वृद्धापकाळाने दि.१४ मार्चला सकाळी ५ वाजता निधन झाले. त्याच्या पश्चात दोन, दोन मुली व नातूपंतू असा बराचसा आप्त परिवार आहे. त्याच्यावर हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या अशोक बारागोंळे महानगर पालिका अमरावती वरिष्ठ लीपीक याच्या आई होत्या.

दहिगाव रेचा येथे शुक्रवारी 'गाळबगाळ' सोहळा

शंकर काळमेघ सात बैलगाड्या ओढून साकारतील अनोखी परंपरा

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील दहिगाव रेचा येथील प्राचीन व जागृत आई जगदंबा देवीच्या मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सव आणि यात्रा महोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. फाल्गुन–चैत्र शुक्ल पक्षात साजऱ्या होणाऱ्या या उत्सवात गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी, दि. २० मार्च २०२६ रोजी पारंपरिक 'गाळबगाळ' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्याकडे संपूर्ण पंचक्रोशीचे लक्ष लागले आहे.

या उत्सवातील सर्वांत आकर्षणाचा केंद्रबिंदू म्हणजे जगदंबा देवी संस्थानचे पुजारी ह.भ.प. भानुदास महाराज काळमेघ यांचे सुपुत्र ह.भ.प. श्री. शंकर काळमेघ यांचा आद्वितीय पराक्रम. दरवर्षीप्रमाणे यंदाही शंकर काळमेघ हे एकाच वेळी लोकांनी भरलेल्या सात बैलगाड्या ओढून गाळबगाळ परंपरा साकार करणार आहेत. शारीरिक ताकद, श्रद्धा आणि परंपरेचा संगम असलेला हा सोहळा पाहण्यासाठी तालुक्यासह आसपासच्या गावांमधून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहतात.गाळबगाळ सोहळ्याची मिरवणूक विलास भगत यांच्या घरापासून प्रारंभ होऊन चावडी चौक, गाईचे गौठान मार्गे देवीच्या मंदिरापर्यंत निघते. यात्रा महोत्सवाची पुढील सांगता गुढीपाडव्याच्या तिसऱ्या दिवशी म्हणजेच दि. २१ मार्च रोजी होणार आहे. त्या दिवशी सकाळी गावातून आई जगदंबा देवीची पालखी प्रदक्षिणा काढण्यात येणार आहे. त्यानंतर शंकरराव रेचे यांच्या घरातून राधा–कृष्णांची भव्य मिरवणूक निघेल. ही मिरवणूक भुषण रेचे यांच्या घरी भोजनानंतर देवीच्या मंदिरात पोहोचणार आहे.

मंदिरात पारंपरिक नवनिर्माण ढोलाच्या गजरात धार्मिक कार्यक्रम पार पडतील. यामध्ये ह.भ.प. साहेबराव भगत, ह.भ.प. अनंतराव मानकर व त्यांच्या साथ-संगत मंडळाकडून काल्याचे कीर्तन सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर दहीहंडी उत्सव आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे.या भव्य यात्रा महोत्सवासाठी जगदंबा देवी उत्सव समितीकडून व्यापक तयारी करण्यात येत असून गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत आहे.या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गावकरी, जगदंबा देवी उत्सव समिती तसेच छत्रपती ग्रुप, दहिगाव रेचा यांचे सहकार्य लाभत आहे.

वरुड तालुक्यातील ३१ मजुरांना घेऊन जाणारा पिकअप उलटला, १९ मजूर गंभीर जखमी

वरुड/प्रतिनिधीः- वरुड तालुक्यातील मजुरांना घेऊन जाणाऱ्या पिकअप वाहनाचा नागपूर जिल्ह्यातील मोवाड परिसरात वर्धा नदीच्या काठावर भीषण अपघात झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या अपघातात तब्बल १९ मजूर गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती असून जखमींना तातडीने उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वरुड तालुक्यातील जरूड, बहादा आणि इसंब्री या गावांतील सुमारे ३१ मजूर पिकअप वाहनातून कामासाठी जात होते. दरम्यान नागपूर जिल्ह्यातील मोवाड जवळ वर्धा नदीच्या काठावर वाहन जात असताना चालकाचे अचानक नियंत्रण सुटले. त्यामुळे वाहन रस्त्याच्या कडेला जाऊन भीषण अपघात झाला.

अपघात इतका तीव्र होता की वाहनातील अनेक मजूर गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतीला धाव घेत जखमींना बाहेर काढले आणि रुग्णवाहिकांच्या मदतीने त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथे दाखल करण्यात आले.

या अपघातात १९ मजूर गंभीर जखमी झाल्याचे समजते. मात्र बातमी लिहीस्तोवर जखमी मजुरांची संपूर्ण नावे व त्यांची प्रकृती ☞(पान २ वर)

जिल्हा बँकेचे १० संचालक निवडणूक लढवण्यास अपात्र

बँकिंग कायद्यात सुधारणेचा फटका

अमरावती/प्रतिनिधीः- सहकार क्षेत्रात वर्षानुवर्ष काम करणाऱ्या व आपली जहागीरदारी समजणाऱ्या दिग्गज सहकार नेत्यांना राज्य सरकारने एक मोठा झटका दिला आहे. बँकिंग कायद्यात सुधारणा केल्याने बँकेमध्ये सलग दहा वर्ष संचालक पद भोगणाऱ्या नेत्यांना आता पुढची निवडणूक लढवता येणार नाही ,त्यांना सरळ सरळ निवडणूक लढवण्यास अपात्र मानले जाईल. या निर्णयाने सहकार क्षेत्रातील दिग्गज नेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

राज्य शासनाने बँकिंग कायद्यात सुधारणा केली आहे. या संदर्भात सहकार आयुक्त यांनी नुकतेच एक पत्र निर्गमित केले आहे. या पत्रानुसार एकाच बँकेत सलग दहा वर्षे संचालक पद

भोगणाऱ्या संचालकांना पुढचीं निवडणूक लढवण्यास अपात्र मानल्या जाईल.स्थानिक अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत दहा वर्तमान संचालकांवर या निर्णयाचा बडगा उगारल्याचे दिसून येत आहे. गेल्या दहा वर्षापासून संचालक म्हणून काम करणाऱ्या या दिग्गज नेत्यांना आता संचालक होता येणार नाही. त्यामुळे आमदार ,माजी आमदार आणि दिग्गज आपल्या जागेवर उत्तराधिकारी निवडतील अशी शक्यता आहे. राज्य सरकारच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे जिल्हा बँकेत गेल्या अनेक वर्षापासून संचालक पद भोगणाऱ्यांवर गडांतर आले आहे. बँकिंग कायद्यात झालेल्या सुधारणेमुळे पळवाट शोधून या जागेवर आपल्या ☞(पान २ वर)

अं. सुर्जी नवीन बस स्थानक परिसरात शालेय ऑटो पलटी, विद्यार्थ्यांना गंभीर दुखापत

मोठा अनर्थ टळला

अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- अंजनगाव सुर्जी येथे सोमवारी (दि.१६) नवीन बसस्थानक परिसरात सकाळी साडेसात वाजता विद्यार्थ्यांनी भरलेला ऑटो पलटी होऊन अपघात झाला. परिसरातील लोकांनी धाव घेत लगेच ऑटो उचलल्याने मोठा अनर्थ टळला परंतु काही विद्यार्थ्यांना दुखापत झाली. १०८ या रुग्णवाहिकेला फोन केला असता तिला यायला वेळ असल्याने लोकांनी एका खाजगी वाहनात विद्यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालयात पोहचवले. हे सर्व विद्यार्थि येथील सीताबाई संगई विद्यालय व कन्या शाळेच्या विद्यार्थीनी असल्याचे समजले.

अंजनगाव येथील अग्रसेन चौकातील नवीन बसस्थानक परिसरात सोमवारी (दि.१६) पांढरी गावातील एम एच २७ टी सी ४२७ क्रमांकाचा ऑटो शाळेत विद्यार्थ्यांना घेऊन जातांना समोरून ☞(पान २ वर)

मोर्शी येथील राज्य उत्पादन शुल्क ऑफिस केवळ नावापुरतेच!

अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष!

हातभट्टी व देशी दारूची खुलेआम अवैध विक्री

मोर्शी/प्रतिनिधीः- अवैध देशी दारू ऑटोमधून विक्रीसाठी नेत असतांना पोलीस स्टेशन मोर्शीच्या डीबी पथकाने धाड टाकून एकूण ३ लक्ष ५ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात यश प्राप्त केले. मात्र याकडे राज्य उत्पादन शुल्क खात्याचे अधिकारी अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहे.

मुस्लिम बांधवांचा प्रसिद्ध रमजान महिना सुरू असून पुढे गुढीपाडवा रामनवमी थोर पुरुषांचे जयंती उत्सव गुण्या गोविंदाने साजरे व्हावे. कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दखल घेण्यात येऊन पोलीस निरिक्षक राहुल आठवले ठाणेदार, पोलीस

स्टेशन मोर्शी यांनी त्यांचे अधिनस्त डी.बी.पथकाला पोलीस स्टेशन मोर्शी हद्दीत अवैध धंदे करणाऱ्या ईसमांविरूध्द कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश दिले.त्या अनुषंगाने आज दि.१६ मार्च रोजी गोपनिय माहीतीच्या आधारे येरला येथील प्रशांत किसनराव दामेदर (वय ३३), अंबादास हरिभाऊ वानखडे (वय ५५) हे मोर्शी ते येरला मार्गावरून त्यांचे ऑटोमध्ये ☞(पान २ वर)

पोलीस पाटील संघाची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

सेवानिवृत्तीचे वय ६५ करण्याची मागणी

अमरावती/प्रतिनिधीः- पोलीस पाटील संघाच्या वतीने पोलीस पाटील यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६५ करण्याच्या मागणी साठी आज सोमवार १६ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्य शासनाने राज्यातील काही मानधनावरील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६५ केले आहे. जसे अंगणवाडी सेविका यांचे सेवानिवृत्तीचे वय ६९ वरून ६५ केले आहे. त्याच धर्तीवर राज्यातील सर्व पोलीस पाटीलानी सेवानिवृत्तीचे वय ६५ करावे अशी ☞(पान २ वर)

शेतकऱ्याची शेतातच विष प्राशन करून आत्महत्या

मोर्शी/प्रतिनिधीः- मोर्शी तालुक्यातील घोडदेव येथील एका ५५ वर्षीय शेतकऱ्याने आपल्या स्वतःच्या शेतात विषप्राशन करून आत्महत्या केल्याची घटना आज दि.१६ मार्च रोजी उघडकीस आली.

मृतक इसमाचे नाव विजय महादेवराव अमदरे वय ५५ वर्षे रा. घोडदेव असे आहे. पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी सार्थक विजयराव अमदरे यांनी पोलीस स्टेशनमध्ये येऊन रिपोर्ट दिला की मौजा घोडदेव शेत शिवारात त्यांची एकूण १० एकर शेती असून त्यामध्ये संत्राचा बगीचा आहे.शेतामध्ये काही दिवसा अगोदर पासून संत्राची तोड सुरु असल्याने वडील शेतात राहत होते व तेथेच रात्री झोपत होते.आज दि.१६ मार्च रोजी दुपारी २ वा.चे दरम्यान सार्थकला त्याचे मामा नितीन ताकडे हे शेतामध्ये पाहणी करण्याकरीता गेले असता त्यांना शेतामध्ये विजय महादेवराव अमदरे हे विषारी औषध प्राशन करुन मृत अवस्थेत दिसून आले. त्यानंतर मामा यांनी ☞(पान २ वर)

सोशल मीडियावर आपत्तीजन पोस्ट वायरल केल्यास कारवाई

आज रात्रीपासून विशेष आदेश जारी

अमरावती/प्रतिनिधीः- गुढीपाडवा, संभाजी महाराज पुण्यतिथी, संत झुलेलाल जयंती ,रमजान ईद, श्रीराम नवमी ,महावीर जयंती, हनुमान जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव येणाऱ्या काही दिवसां मध्ये साजरे करण्यात येणार आहे. त्या निमित्त शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणे गरजेचे आहे. उत्सवाच्या दरम्यान सोशल मीडियावर पोलिसांचा वॉच राहणार आहे. या दरम्यान कोणतीही आपत्ती

जनक पोस्ट व्हायरल केल्यास कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आज सोमवार १६ मार्च रोजी दिली आहे.

त्यांनी स्पष्ट केले कि, सोमवारच्या रात्री १२ वाजेपासून १५ एप्रिल च्या रात्री १३ वाजेपर्यंत शहरात कलम १६१(१) (२) (३) अन्वये विशेष आदेश जारी करण्यात आले आहे. नियमाचे उल्लंघन करण्यावर कार्यवाही करण्यात येणार आहे. पोलीस आयुक्तांनी सांगितले की ☞(पान २ वर)

भरधाव कारची दुचाकीला जोरदार धडक

-वडिलासंह मुलीचा मृत्यू -हिट अँड रन

अमरावती/प्रतिनिधीः- शहराच्या जुना बायपास मार्गावरील एमआयडीसी चौकात रविवारी मध्यरात्री भरधाव वेगाने येणाऱ्या कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात बापलेकीचा मृत्यू झाला. हिट अँड रनचा हा प्रकार आहे. गजानन श्रीराम माकोडे (वय ५२) आणि त्यांची कन्या सपना गजानन माकोडे (वय २४) दोघेही रा. मायानगर अशी मृतकांची नावे आहेत. त्यांची दुसरी मुलगी प्रियंका ही गंभीर जखमी असून तिची प्रकृती चिंताजनक आहे. अपघात झाल्यानंतर कारचालकाने पळ काढला, मात्र सोमवारी पहाटे त्याने स्वतःहून राजापेठ पोलिस स्टेशन गाठून आत्मसमर्पण केले.

माहितीनुसार, गजानन माकोडे हे पुण्याला जाणाऱ्या ट्रॅव्हल्समध्ये बसून देण्यासाठी रात्री १२ वाजता त्यांच्या दोन्ही मुलींना सपना (वय २४) आणि प्रियंका (वय २२) यांना घेऊन दुचाकीने एमआयडीसी चौकात पोहोचले. त्याचवेळी नांदगाव पेठकडून बडनेराच्या दिशेने सुसाट वेगाने येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या कारने त्यांच्या दुचाकीला भीषण धडक दिली. अपघातानंतर पोलिसांनी जखमींना तातडीने इर्विन रुग्णालयात हलवले. मात्र, डॉक्टरांनी तपासून गजानन माकोडे आणि त्यांची मोठी मुलगी सपना यांना मृत घोषित केले. धाकटी मुलगी प्रियंका हिला पुढील उपचारासाठी खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले ☞(पान २ वर)

साई झुलेलाल जयंतीनिमित्त निघणार भव्य शोभायात्रा

राजकमल चौकात होणार महाआरती

खाटू श्याम व बालाजीचा देखावा ठरणार आकर्षण

अमरावती/प्रतिनिधीः- दरवर्षीप्रमाणे यावर्षीही साई वेल्फेअर फाउंडेशन व झुलेलाल जयंती महोत्सव समितीच्या वतीने साई झुलेलाल जयंती उत्सव साजरा करण्यात येत आहे. या निमित्य विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जात आहे. उत्सव अंतर्गत शुक्रवार २० मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता नेहरु मैदान परिसरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या मध्ये खाटू श्याम आणि बालाजीचा देखावा विशेष आकर्षणाचा केंद्र राहणार असल्याची माहिती आज सोमवार १६ मार्च रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये आयोजकांनी दिली.

त्यांनी सांगितले की नेहरू मैदानातून निघणारी ही शोभायात्रा राजकमल चौक, श्याम चौक, नाईक मार्केट, प्रभात टॉकीज, जवाहर रोड, आदर्श हॉटेल ते राम-लक्ष्मण संकुल, रामपुरी कॅम्प, नानक नगर, कृष्णा नगर होत सहकार नगर मध्ये समाप्त होणार आहे. शोभायात्रा राजकमल चौक वर पोहोचल्या वर तेथे महाआरती ☞(पान २ वर)

गाडगेनगर परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी मोहीम

एका आस्थापनावर ५ हजारांचा दंड

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती महानगरपालिकेच्या वतीने शहरात स्वच्छता व प्लास्टिक बंदी नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी सातत्याने मोहीम राबविण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून दिनांक १६ मार्च २०२६ रोजी झोन क्र.१ रामपुरी कॅम्प अंतर्गत येणाऱ्या गाडगेनगर परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी मोहीम राबविण्यात आली. ही कारवाई महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक ☞(पान २ वर)

राजापेठ क्षेत्रात ६५ धोकादायक इमारती

अमरावती/प्रतिनिधीः- महानगरपालिका क्षेत्रातील राजापेठ झोन क्रमांक २ मध्ये सी १ मध्ये १०, सी २ ए मध्ये १५, सी २ बी आणि सी ३ मध्ये ४० इमारती धोकादायक आहे. या इमारती कधीही कोसळून दुर्घटना होऊ शकते, म्हणून मनपा प्रशासनाने पावसाळयापूर्वी इमारतीची दुरुस्ती करण्याचे आवाहन मालकांना केले आहे. मनपा पथक लवकरच धोकादायक इमारती आणि घरांचा सर्वे करणार आहे. मनपा अधिनियम १९४९ कलम २६४(१),२६४(२)(३) अन्वये नोटीस देण्यात आली आहे. जर इमारत कोसळली आणि कोणतीही दुर्दैवी ☞(पान २ वर)